मुस्लिम समाज काळाची पावले
ओळखीत आहे का?

# साप्ताहिक माणूस





डॉ. रफि
झकारि
यांची
परख
मुलाख

४० पै

२८।१।

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : तिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४७१ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

**स. न.** **डिसें. २८**

'माणूस' साप्ताहिकास मी अत्यंत अभिनव साप्ताहिक समजतो आणि त्याचा प्रत्येक अंक आवडीने वाचतो. पण 'माणूस'मध्ये हंसा वाडकर पाहून 'माणूस'बद्दल माझे मत कलुषित झाले. 'माणूस' साप्ताहिकाचा दर्जा वरचा आहे. 'कला, राजकारण, आणि संस्कृती' यासाठी 'माणूस' असावा.

यापुढे 'माणूस'मध्ये असले आलतू फालतू न यावे. 'माणूस' वेगळा असावा. त्याने मराठी मनाचे नेतृत्व करावे.

**– चारुता सागर,**
खरशिंग. (जि. सांगली)

**स. न.** **जाने. २**

'हंसा-वाडकर' यांची आत्मकथा संपल्याबरोबरच वास्तविक पाहता 'ड्रॅगन जागा झाला' ही दीर्घ कथा चालू व्हावयास पाहिजे होती. परंतु तसे काही झाले नाही. हा विलंब का झाला? असल्या प्रकारच्या कथांना विलंब करू नये. कारण, अशा कथा नसल्या की, 'माणूस'चे वजन जरा कमीच वाटते.


आणखी गोष्ट सांगावयाची आहे ती म्हणजे, 'वेस्ट-इंडीज क्रिकेट संघाचा भारत-दौरा.' या दौऱ्याचे पडसाद बहुतेक साप्ताहिक-मासिकांतून उठले. परंतु 'माणूस'मध्ये त्यांचा 'उल्लेख'ही नाही. 'माणूस'मध्ये 'क्रीडा जगताला' स्थान नाही हेच त्याचे कारण असू शकेल.

**सुधीर नामदेव सावंत,**
मुंबई

# गोव्यातील पराभवाची शोकांतिका

गोव्यातील निकाल आपल्याविरुद्ध गेला आहे. महाराष्ट्राला हा पराभव मान्य केलाच पाहिजे. ' असं झाल्यामुळं तसं घडलं ' असला आत्मवंचनेचा आणि अर्थशून्य युक्तिवाद करण्यात काहीही अर्थ नाही. जनताकौलाचा हा निकाल जितका खेदजनक आहे तितकाच तो अनपेक्षितही आहे. या जनताकौलमध्ये ८५ टक्के गोमंतकियांनी मतदान केले आहे, अशी बातमी सोमवारी रात्री येथे आली तेव्हा राजधानीतील मराठी नेतृत्वाने 'आता आपले यश निश्चित आहे' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. पुण्या-मुंबईची प्रतिक्रियाही यापेक्षा वेगळी नव्हती. मतदानाचे प्रमाण कमी पडले असते तर ग्रामीण भागातील अडाणी शेतमजूरवर्ग उदासीन राहिला व त्यामुळे आपण पराभूत झालो असे कारण सांगता आले असते. परंतु कोणत्याही निवडणुकीत झाले नव्हते इतके मतदान या ' बिनचेहऱ्या 'च्या निवडणुकीत झाल्यामुळे ती सबब सांगायाची देखील सोय उरलेली नाही.

एवढे प्रचंड मतदान होऊनही हा पराभव का झाला ? या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, ख्रिश्चनांप्रमाणेच बऱ्याच हिंदू नागरिकांनी विलीनीकरणाच्या विरुद्ध मत दिले. हा वर्ग कोणता हे न सांगताही कळण्यासारखे आहे. गोवे केंद्रशासित राहिल्याने ज्या वर्गाचा फायदा होणार आहे, असा हा वर्ग आहे. यांत जमीनदार येतात. गोव्याच्या सार्वजनिक जीवनात किंवा सरकारी नोकऱ्यांमध्ये ज्यांचे स्थान सुरक्षित आहे, असा सुशिक्षित आणि पुढारलेला समाज येतो. चोरट्या मालाची खरेदी-विक्री करून अमाप धन गोळा करणारे व्यापारी येतात. वस्तुत: बांदोडकरांसारखा, गोमंतकीय समाजाच्या सर्व थरामध्ये अतीव लोकप्रिय असलेला, निस्पृह नेता या चळवळीला लाभलेला असताना गोव्यातील हितसंबंधी वर्गाने आपले



नैतिक विजय

वैयक्तिक संकुचित स्वार्थ बाजूला ठेवून गोव्याच्या विशाल हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विलीनी-करणाच्या बाजूने ठामपणे उभे राहा-वयास हवे होते. या विशिष्ट हित-संबंधी वर्गाप्रमाणेच गोव्याचे स्वतंत्र स्थान नाहीसे झाले की आपल्या महत्त्वाकांक्षा सफल होणार नाहीत असे मानणारे राजकीय पक्षांचे कार्य-कर्तेही बांदोडकरांच्या पाठीशी उभे राहिले नाहीत. पुरुषोत्तम काकोडकर आणि मृतावस्थेतही वळवळ करणारी त्यांची गोवा काँग्रेस हिने तर पहिल्या-पासूनच महाराष्ट्रविरोधी भूमिका घेतलेली होती. परंतु असा उघड प्रचार करण्याचे ज्यांच्यात धाष्टर्य नव्हते असे इतर पक्षांचे कार्यकर्तेही छुप्या रीतीने विलीनीकरणाच्या प्रचाराला साथ देत नव्हते.

आज बांदोडकर पराभूत झालेले आहेत. परंतु तरीही विलीनीकरणाच्या चळ-वळीसाठी त्यांनी केलेले कार्य विसरता येण्याजोगे नाही. अगदी एकाकी अव-स्थेत ते एखाद्या धीरोदात्त नायकाप्रमाणे ठाम उभे होते. जनताकौलाचा दिवस निश्चित झाल्यापासून त्यांनी क्षणाचीही विश्रांती घेतली नाही. अहोरात्र कार्य-कर्त्यांना मार्गदर्शन करण्यात, त्यांच्यासाठी पैसा उभारण्यात ते गर्क होऊन गेले होते. जनताकौलाच्या दिवशी त्यांची ज्यांनी प्रकृती पाहिली त्यांना बांदोडकरांनी गेल्या काही दिवसांत किती परिश्रम केले असतील, याची कल्पना आली.

बांदोडकर निस्पृह आणि सत्ताविन्मुख म्हणूनच त्यांनी जनताकौलाचे आव्हान स्वीकारले. १९६३ च्या गोवे विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षामागे समर्थपणे उभे राहिले ते एकटे बांदोडकर. त्या निवडणुकीत मतदारांनी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षास बहुमताने निवडून दिल्यानंतर पक्षाच्या आग्रहाखातर बांदोडकरांनी मुख्यमंत्रिपदाची धुराही स्वीकारली. त्यांच्या जागी अन्य मुरब्बी राज-

कारणी व्यक्ती मुख्यमंत्रिपदावर असती तर तिने आपले हे स्थान कायम राहावे म्हणून स्वतःच्या हाती घेतलेली विलीनीकरणाची चळवळ ' बदलत्या परिस्थितीच्या संदर्भात ' स्वतःच्याच हाताने मृतवत केली असती. परंतु बांदोडकरांच्या हिशेबी मुख्यमंत्र्याच्या खुर्चीला काही किंमत नव्हती व म्हणूनच एकदा या प्रश्नाचा निकाल लावा, असा त्यांनी काँग्रेसश्रेष्ठांपुढे प्रारंभापासून आग्रह धरला. परंतु या ना त्या कारणाने निर्णय करण्याचे काँग्रेसश्रेष्ठ टाळाटाळ करीत आहेत असे आढळून आले, तेव्हा त्यांनी अन्न सत्याग्रह करण्याचे ठरविले. अशा वेळी श्री. स. का. पाटील यांनी कुचेष्टेने ' जनताकौलाला तयार होता काय ? ' असे विचारले. बांदोडकरांना एकदा या प्रश्नाची तड लावून घ्यावयाची होती व भारतात यापूर्वी अन्यत्र कोठेही हाती घेण्यात न आलेला हा प्रयोग गोव्यात होऊ देण्यास मान्यता दिली. इतकेच नव्हे तर या जनताकौलाच्या पक्षपाताचा आरोप येऊ नये म्हणून आपण होऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. साध्या जिल्हापरिषदेच्या अध्यक्षपदाकरिता होत असलेल्या मारामाऱ्या पाहिल्या की, स्वतःहून मुख्यमंत्र्याची खुर्ची सोडून सचिवालयातून बाहेर पडणाऱ्या बांदोडकरांचे मोठेपण प्रतीत होते.

बांदोडकरांची चूक झाली असेल तर ती एवढीच की ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसवर विसंबून राहिले. विलीनीकरण हवे की नको यासाठी घेण्यात येणाऱ्या जनताकौलापूर्वी विलीनीकरणाच्या प्रचारासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आपल्या पाठीशी उभी राहील असे त्यांना वाटत होते. परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सूत्रधार आणि सारेच सरदार-बारगीर आपल्या निवडणुकीच्या घोषात इतके गुंतले आहेत की त्यांना गोव्याकडे पाहायला फुरसतच झाली नाही. शेवटी मोहन धारियांसारख्या एका सामान्य वकुबाच्या कार्यकर्त्यास धाडून आपली जबाबदारी संपली असे महाराष्ट्र काँग्रेसने मानले. खरे म्हणजे अशा मोक्याच्या वेळी आचार्य अत्रे, श्री. अ. डांगे, एस्. एम्. जोशी, जयंतराव टिळक आदी संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या नेत्यांच्या प्रचारदौऱ्यांनी गोमंतकाचा परिसर दुमदुमून जावयास हवा होता. काही प्रमाणात हे विरोधी पक्षनेतेही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकर्त्यांप्रमाणे निवडणुकांच्या राजकारणात व्यग्र झाले होते व त्यामुळे त्यांचेही दुर्लक्ष झाले ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही. याला अपवाद होता तो फक्त बॅ. नाथ पै यांचा.

### जागृत ख्रिश्चन धर्मसंस्था

गोव्यातील ख्रिश्चन धर्मसंस्था मात्र या जनताकौलाबाबत अतिशय सावध होत्या. त्यांचा प्रचार गाजतवाजत नव्हता. परंतु चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जमणाऱ्या ख्रिश्चन जनसमुदायापुढे त्यांचे धर्मगुरू धर्माच्या नावाखाली विलीनीकरणास विरोध करण्याचे आवाहन करीत होते. जनताकौलाच्या आदल्या दिवशी म्हणजे रविवारी सकाळी चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी कोणती बौद्धिके घेण्यात आली याचा वृत्तांत ज्यांच्या हाती पडला असेल त्यांना या विधानाची सत्यता पटावयास हरकत नाही.

टोनी फर्नांडिस किंवा अँथनी डिसोझा यांच्यासारखे अक्षरशः मूठभर ख्रिश्चन सोडले तर बाकीच्या सर्व ख्रिश्चनांनी विलीनीकरणाच्या विरोधी मत नोंदविले आहे. संघप्रदेश म्हणून राहिले तर गोवे भारतातच राहणार आहेना, मग हा ख्रिश्चनां-बाबतचा पक्षपाती दृष्टिकोन का, असाही प्रश्न काही उदारमतवादी लोकांकडून विचारला जाण्याची शक्यता आहे. आणि म्हणूनच त्याचेही येथे स्पष्ट उत्तर द्यावयास हवे. सर्वसामान्य ख्रिश्चन मतदार ज्यांचे ऐकतो व ज्यांच्या सांगण्या-प्रमाणे वागतो त्या धर्मोपदेशकांचा खरे म्हणजे केवळ विलीनीकरणालाच विरोध आहे असे नव्हे. भारतीय संघराज्यातच राहण्यास त्यांना नको आहे. परंतु आता तसे त्यांना उघडपणे बोलता येत नसल्यामुळे ते जाहीर रीतीने गप्प आहेत एवढेच. पोर्तुगीज सत्ता गेली म्हणून अद्यापही ते हळहळतात. पोर्तुगालचे राज्य गेले म्हणजे पोपचे अधिराज्य मानणारी राज्यसत्ता येथून गेली याची बोच या ख्रिश्चन नेत्यांच्या मनातूनही मुळीच गेलेली नाही. गोव्याची मुक्ती झाल्यानंतर जो पहिला प्रजासत्ताक-दिन गोव्यात साजरा करण्यात आला त्यात या ख्रिश्चन धर्मगुरूंच्या सांगण्यावरून ख्रिश्चन धर्मीय गोमंतकियांनी त्यात भाग घेतला नव्हता. पोर्तुगीज राजवट ज्या दिवशी विलयास गेली त्या दिवशी तेथला सारा हिंदुसमाज आनंदोत्साहाने न्हाऊन निघाला असताना धर्मगुरूंच्या आदेशानुसार ख्रिश्चन धर्मीयांनी सुतकी चेहरे करून तो सोहळा पाहिला होता. या गोष्टी विसरण्याजोग्या आहेत असे ज्यांना वाटत असेल त्यांची गोष्ट वेगळी. परंतु वास्तव परिस्थितीकडे ज्यांना डोळेझाक करावयाची नाही त्यांना हा सारा इतिहास ध्यानी ठेवावयास हवाच. ज्यांनी गेल्या सोमवारी विलीनीकरणाच्या विरुद्ध मते नोंदविली, त्यांना केवळ महाराष्ट्राचाच दुस्वास वाटत आहे असे नाही. त्यांना भारताचाच दुस्वास वाटत आहे. गोव्यातील पराभवाने मन खिन्न होते ते यामुळे.

आणि एवढी रणधुमाळी चालू असताना राजकारणापासून सोवळी असलेली आपली धर्मसंस्था तरी काय करीत होती ? वस्तुतः कथा-कीर्तनकारांचे ताफेच्या ताफे तेथे जावयास हवे होते व कथा-कीर्तनांच्या प्रभावी माध्यमाच्या द्वारे हिंदू जनमानसात एकात्मतेची भावना निर्माण करण्याचे अतिशय तातडीचे आणि महत्त्वाचे कार्य त्यांनी करावयास हवे होते. परंतु गाय वाचविण्याच्या फिकिरीत असलेली आमची संतमहंत, स्वामी महाराज मंडळी गोव्याबाबत उदासीन राहिली.

महाराष्ट्राबाहेरचे स्वतंत्र गोवे हे एक स्वतंत्र ख्रिस्तीस्तान होण्याचा धोका खचित उपेक्षणीय नाही. ही ख्रिस्तीस्ताने कशी उपद्रवकारक होतात आणि शेवटी भार-तीय संघराज्याला ती कशी आव्हाने देऊ लागतात, ही गोष्ट नागाप्रदेश, मिझोरॅम या आंदोलनांवरून ध्यानात येण्यास हरकत नसावी. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर होते ते हे असे. गोव्याच्या बाबतीत धोका आहे तो हाच.

●

—सदाशिव पेठकर

# मुक्ताफळे



## ☐ मिजासी जिलास

मार्शल टिटो हे आपल्या चांगल्या परिचयाचे आहेत. लष्करी पद्धतीने युगोस्लाव्हियात 'समाजवाद' आणणाऱ्या या महा-पुरुषाचा उजवा हात मिलोवन् जिलास नावाचा एक हुशार माणूस होता. संघटना टिटोची व डोके जिलासचे अशी ही युगोस्लाव्हियातली समाजवादी संघटना होती. परंतु या जिला-सने १९५४ साली अमेरिकन वृत्तपत्रांत व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधी काही स्वतंत्र विचार प्रसिद्ध केले. आता याबद्दल टिटोने त्याला ताकीदही दिली. पण या माणसाने हंगेरीत कम्युनिस्टांच्या विरुद्ध जो उठाव झाला, जो इम्रे नागी याने लाल रण-गाड्यांनी चिरडला त्याबाबत अमेरिकन पत्रांत पुन्हा १९५६ साली मतप्रदर्शन केले. मार्शल टिटो याने त्या वेळी मात्र याची गय न करता जिलासला तुरुंगात टाकले व तीन वर्षे शिक्षा दिली. आता तुरुंगात तरी याने स्वस्थ बसावे! त्याने 'न्यू क्लास' नावाचे पुस्तक लिहून ते परदेशी प्रसिद्ध केले! आता मात्र टिटो खवळला. त्याने शिक्षा सहा वर्षांची केली.

१९६१ मध्ये शिक्षा भोगून जिलास सुटला. सुटल्याबरोबर त्याने "कॉन्व्हर्सेशन्स वुइथ स्टॅलिन' या नावाचे, स्टॅलिन हा कसा क्रूर हुकुमशहा होता याचे चित्रण करणारे पुस्तक लिहिले व १९६२ मध्ये ते परदेशी प्रसिद्ध केले! (याच पुस्तकाची 'मी पाहिलेला लाल हुकूमशहा' अशी ओळख कुणा रा. म. शास्त्र्याने 'माणूस' मधूनच वाचकांना सांगितली.)

आता मात्र टिटो फारच रागावला ! त्या वेळी स्टॅलिन हे टिटोचे परमदैवत होते. आपल्या परात्पर गुरूविषयी इतके सत्य सांगणारे पुस्तक जिलासने लिहावे, याचा त्याला इतका राग आला की त्याने जिलासला पुन्हा आठ वर्षे आठ महिने शिक्षा ठोठावून तुरुंगात टाकले.

पूर्ण शिक्षा भोगण्यापूर्वीच जिलास आता ५५ वर्षांचा झाला आहे हे ध्यानी घेऊन मार्शल टिटो याने दयाळूपणे त्याची नुकतीच मुक्तता केली आहे. फक्त त्याने यापुढे कुठल्याही सार्वजनिक समारंभात भाग घ्यावयाचा नाही व मतप्रदर्शन करावयाचे नाही, अशा माफक अटी त्याच्यावर लादलेल्या आहेत.

स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याची मिजास मारणाऱ्या जिलासची टिटोने अशी खाशी जिरवली ! टिटो हा भारताचा परममित्र असल्याने आपण एवढाच धडा घ्यायचा की टिटोच्या राजवटीत जिलासला तुरुंगात जागा असते व 'जिलास' कधी 'टिटो' होऊ शकत नाही.

आपल्या पुरोगामी विचारवंतांचे प्रधान कार्य हेच की आरती जिलासची करायची व हार टिटोला घालायचा !

## □ व्यर्थ चिंता

श्री. चिंतामणराव देशमुख यांनी नुकतीच एक मुलाखत दिली. देशात विशेष उंची नसलेला नेता तूर्त नाही अशी त्यांची चिंता आहे. आम्हांला हे कळत नाही की इतकी थोर माणसे कॉंग्रेसमध्ये असताना देशमुखांनी ही मणभर चिंता का व्यक्त करावी ! राजकारण ही एक रंगभूमी आहे. आणि रंगभूमीचा एक नियम आहे— The stage gets the Shakespeare it deserves —रंगभूमीच्या लायकीप्रमाणे शेक्सपिअर लागतो. रंगभूमीला तूर्त दिवस चांगले आहेत. शेक्सपियर कोण याची चिंता चिंतामणरावांनी करू नये. लाकडी तलवारी, सोनेरी सिंहासने, मतांचा मळा, भालदार चोपदारांच्या ललकाऱ्या या सर्व गोष्टींकडे नीट लक्ष दिले तर आपली चिंता व्यर्थ आहे हे त्यांच्या लक्षात येईल. •

# 'जागृत नागरिक'

( श्रीमंत कुटुंबाचा बंगला. गर्भ-श्रीमंतीचा थाट. वडिलार्जित आलेल्या श्रीमंतीमुळे व्यवसाय-नोकरी करण्याची विशेष कुणालाच गरज नाही. कुटुंब-प्रमुख — टक्कल पडलेले मध्यमवयीन गृहस्थ — रेडिओवरील टेस्टची कॉमेंटरी ऐकतच माझ्या प्रश्नांना उत्तरे देत आहेत.)

गृ. : ऑफ कोर्स. आय ॲम इंटरेस्टेड इन पॉलिटिक्स. खरं म्हणजे मला राजकारण, समाजसेवा, वाङमयसेवा, कला या साऱ्याच गोष्टींत इंटरेस्ट आहे. आमच्या क्लबतर्फे तर आम्ही किती तरी समाजसेवा करतो.

मी : मी निवडणुकांचे विचारत होतो.

गृ. : ॲज ए कॉन्शस सिटिझन, निवडणुकांत मला इंटरेस्ट घेतलाच पाहिजे.

मी : आपण ॲक्टिव इंटरेस्ट घेता ?

गृ. : तसंच काही नाही. पण सगळ्या डेव्हलपमेंट्सकडे माझं अगदी कीन्ली लक्ष असतं. म्हणजे आय मीन, आय हॅव टुबी. ओह्-डाऊन इंजीनियर डाऊन. च्. च्. बॅड लक.

मी : मतदारांच्या यादीत तुम्ही तुमचं नाव तपासून पाहूचलंच असेल ?

गृ. : अं. ? हं. हो. म्हणजे काय आहे, माय वाईफ लुक्स आफ्टर इट. प्रॅक्टिकल गोष्टी या सगळ्या, मी बॉदर करीत नाही. कुणी प्रचारासाठी आमच्या घरी आलं म्हणजेदेखील तीच लक्ष घालते.

मी : निवडणुकांच्या सभांना तरी जात असाल ?

गृ. : छे ! छे ! नो. नेव्हर. आय डोण्ट लाईक इट. पण हां. आय ॲम कॉन्शस. रोज पेपर्स अगदी काळजीपूर्वक वाचतो. खरं म्हणजे टाईम्स वाचल्याशिवाय मला चैन पडत नाही.

मी : मतदान तरी तुम्ही करणार आहात ना ?

गृ. : तर ! व्हॉट डू यू मीन. अहो, लोकशाहीतला हा सामान्य नागरिकाचा सर्वोच्च अधिकार. विशेषत: माझ्यासारख्या कॉन्शस सिटिझनची तर ही ड्यूटीच आहे. परवा मी आमच्या क्लबच्या लंच पार्टीत हेच पटवून देत होतो. द ग्रेटेस्ट राइट ऑफ...माय गुडनेस व्हॉट ए लव्हली शॉट...वा...

मी : मागच्या तिन्ही निवडणुकींत तुम्ही मतदान केलंच असेल ?

गृ. : वेल... आता आठवायचं म्हणजे...अं हो...पहिल्या निवडणुकीचं आठवत नाही. पण पुढचं अगदी स्पष्ट आठवतं. बिइंग अ कॉन्शस सिटिझन, मी अगदी सकाळीच बूथवर गेलो होतो. पण क्यू फारच लांब होता. आय वॉज व्हेरी कीन. म्हणून दुपारी गर्दी कमी झाल्यावर जायचं ठरवलं. पण अनफॉर्च्युनेटली दुपारी जेवण झाल्यावर मी वामकुक्षीसाठी म्हणून जो पडलो तो उठलो तेव्हा

# आणि निवडणूक

इट वॉज ऑल ओव्हर. आय वॉज व्हेरी मच डिसअपॉइंटेड. अँड आय फेल्ट इट.

मी : (सुस्कारा सोडून) मागच्या निवडणुकीत तरी ?

गृ. : तेव्हा मात्र अगदी अशक्यच झोतं बरं का. म्हणजे त्याचं काय झालं, बऱ्याच दिवसांची प्लॅन केलेली एक ट्रिप तेव्हाच जुळून आली होती...आणि ...

मी : असो—असं होतंच कधी कधी पण तुम्ही तुमच्या पसंतीचे काही उमेदवार ठरवीत असाल ना ?

गृ. : जनरली म्हणजे मी एक कॉंग्रेसला व्होट देण्याची पॉलिसी ठेवतो. एक आहे चांगला प्रोग्रेसिव्ह पक्ष-स्वातंत्र्यपूर्व काळातील कामगिरी आहे. स्टेबल गव्हर्नमेंट आहे. म्हणून एक सहानुभूती आहे. पण जनरली आय कन्सल्ट माय वाईफ. अँड वुई बोथ डिसाईड. तसा आता माझा मुलगाही मतदार झाला आहे. पण त्याचा विचार घेत नाही. ही इज स्पॉईल्ट.

मी : निवडून येणाऱ्या लोकांनी, पक्षांनी काही तरी करावं असं तुम्हांला वाटत असेलच ?

गृ. : ऑफ कोर्स. बिईंग अ कॉन्शस सिटिझन. अशी मतं मला असलीच पाहिजेत. कुणी भेटलं म्हणजे त्यांना मी ही मतं सांगतच असतो. अहो, कितीतरी असे प्रॉब्लेम्स् आहेत की जे चांगले सोडविले पाहिजे. आणि आपलं गव्हर्नमेंट अगदी दुर्लक्ष करतं. आता उदाहरणार्थ हेच पाहाना-आपलं...कसला बरं हा-बेबी कारचा प्रश्न किती वर्षं लटकत पडलाय. लोकांची किती गैरसोय होते. आणि इंपोर्टस्‌वर रेस्ट्रिक्शन्स किती, टॅक्सेस किती—अहो, परवा माझ्या एका कझीननं नुसता साधा एक मूव्ही कॅमेरा अमेरिकेहून येताना बरोबर आणला. सेंट परसेंट टॅक्स—आणखी असे कितीतरी प्रॉब्लेम्स् आहेत. झालंच तर गरीबांचा प्रश्न आहे. अन्नधान्याचा...महागाईचा...

मी : (पुन्हा एक सुस्कारा सोडून...) आलं..ध्यानात आलं. पण हे प्रॉब्लेम्स् प्रेस करण्यासाठी म्हणून तुम्ही काही एफर्टस् करता की नाही— ?

गृ. : तर अॅज अ कॉन्शस सिटिझन आपणांला ते केलंच पाहिजे. या प्रश्नावर आम्ही क्लबात व्याख्यानं ठेवतो. व्याख्यात्याला खडसावून प्रश्न विचारतो. आपआपसांत चर्चा करतो. आह, आह मार्व्हलस्. व्हॉट ए शॉट...

(रेडियोवरचा कॉमेंटेटर जोराजोरात ओरडत असतो...लव्हली. द मोस्ट ब्युटिफूल शॉट आय हॅव एव्हर सीन इन माय लाईफ. इट विल गो डाऊन इन द ॲनल्स ऑफ वर्ल्ड क्रिकेट अॅज द..मी सुस्कारा सोडून कागद गुंडाळून घेतो आणि आता आणखी यापुढे कुठल्याही कॉन्शस सिटिझनची निवडणुकीबाबत मुलाखत घ्यायची नाही असे ठरवून टाकत बाहेर पडतो—)

□

## आसाम

# पोकळ विरोधामुळे काँग्रेस बिनघोर

आसाम राज्य म्हणजे एक छोटा भारतच. भारतातील सर्व तऱ्हेची वैशिष्ट्ये, साऱ्या समस्या आसामात प्रतिबिंबित होतात. पूर्व पाकिस्तान आणि भूतान यांच्यामध्ये असलेल्या एका चिंचोळ्या भूप्रदेशाच्या पट्टीने इतर भारताशी जोडलेल्या या राज्यात दळणवळणाची साधने मागासलेली आहेत. भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या जागी हे राज्य आहे. जवळ जवळ अर्धे राज्य डोंगराळ प्रदेशाने व्यापले आहे. आणि बंडखोर गिरिजनांच्या व नागांच्या कारवायांनी राज्य बेजार झाले आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या या प्रश्नांबरोबरच आसामी-बंगाली भाषेचे वाद, मुस्लिमांची वाढती संख्या, अन्नधान्याचा तुटवडा, वाढती महागाई, त्यामुळे निर्माण झालेला असंतोष, विद्यार्थ्यांच्या दंगली या भारतातील इतर सामान्य समस्याही या राज्याच्या पाचवीला पुजून आहेतच. राज्यामध्ये राज्यकर्त्या काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा खूप खाली आली आहे. इतके असूनही येत्या सार्वत्रिक निवडणुकीत विजयी होण्याच्या बाबतीत काँग्रेस बिनघोर आहे.

इंदिरा गांधींनी नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे येत्या निवडणुकीनंतर आसाम राज्याची पुनर्रचना करण्यात येणार आहे. आसामचे मुख्यमंत्री श्री. चालिहा यांना हेच हवे होते. या निर्णयामुळे असंतुष्ट गिरिजन आणि इतर गट थोडेफार खूषच होऊन काँग्रेसचे पारडे अधिकच जड होण्याचा संभव आहे.

आसाम राज्यातही काँग्रेस इतकी अप्रिय असताना लोक काँग्रेसलाच पुन्हा का मते देतात, याला कारण आहे. एका बाजूला पाकिस्तान आणि दुसऱ्या बाजूला चीन या दोन्हीही शत्रुराष्ट्रांचा पहिला धोका आसाम राज्याला आहे. शिवाय पाकिस्तानी गुंड अधूनमधून भारतीय हद्दीत शिरून उपद्रव देत असतात. अशा तंग परिस्थितीत काँग्रेसशिवाय दुसऱ्या कुठल्या पक्षाला मते देऊन प्रयोग करण्याच्या मनःस्थितीत आसाम राज्यातील जनता नाही. त्यामुळे कुठल्याही डाव्या विचारप्रणालीच्या पक्षाला आसामात अद्यापपर्यंत मोठे अनुयायी मिळविण्यात अपयशच आलें आहे.

आणि शिवाय येत्या निवडणुकीत काँग्रेसच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन तिला राज्यावरून खेचण्याचे एकत्र प्रयत्न करण्याची शक्तीही आसामातील विरोधी पक्षांत नाही. इतर राज्यांप्रमाणे येथेही विरोधकांत भांडणे आहेतच. त्यामुळे राज्यकर्त्या काँग्रेस पक्षाला यशाची जवळ जवळ खात्री आहे.

त्यामुळे गेल्या पंधरा-वीस वर्षांत आसाम विधानसभेत काँग्रेसचे बहुमत सतत वाढतच आलेले आहे. विधानसभेच्या १०५ जागांपैकी सध्या ७९ उमेदवार काँग्रेसचे आहेत. १९५२ आणि १९५७ सार्वत्रिक निवडणुकांनंतर हीच संख्या अनुक्रमे ७६

आणि ७१ होती. या वेळी काही प्रजासमाजवादी आणि स्वतंत्र आमदारही काँग्रेसला येऊन मिळाले आहेत. १९५२ साली नागाप्रदेशातील तीन जागा रिकाम्याच होत्या. कारण नागांनी निवडणुकांवर बहिष्कार टाकला होता.

## एकच प्रतिस्पर्धी

राज्यातील काँग्रेसचा प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष म्हणजे सर्वपक्षीय गिरीजन सभा. या सभेची गिरीजनांसाठी स्वतंत्र राज्य हवे ही प्रथमपासूनची मागणी आहे. डोंगरी जिल्ह्यात त्यांना प्रचंड पाठिंबा आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत डोंगरी जिल्ह्यात या सभेने आपल्या स्वतंत्र राज्याच्या मागणीवरच निवडणुका लढविल्या आणि या जिल्ह्यामधील विधानसभेच्या १५ जागांपैकी ११ जागा प्रचंड बहुमताने मिळविल्या. या डोंगरी जिल्ह्यांत काँग्रेसएवढी दुर्बळ आहे की बऱ्याच ठिकाणी काँग्रेसला निवडणुका लढविण्यासाठी उमदवार मिळवणेदेखील कठीण जाते. या वेळी या जिल्ह्यातील १६ विधानसभेच्या जागांपैकी सात जागी काँग्रेसपक्षाने उमेदवार उभे केले नाहीत. कारण कुणी उमेदवारच मिळत नाही. सभेच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीला मिळत असलेला हा प्रचंड पाठिंबा बघूनच आसाम राज्याच्या पुनर्रचनेचा निर्णय घेण्यात आला आहे.

डावे व उजवे कम्युनिस्ट, रिव्होल्यूशनरी कम्युनिस्ट पार्टी, रिव्होल्यूशनरी सोशॅलिस्ट पार्टी आणि संयुक्त सोशॅलिस्ट पार्टी या पाच डाव्या पक्षांनी एक संयुक्त विरोधी आघाडी आसाममध्ये उभारण्याचा दुर्बल प्रयत्न केलेला आहे. परंतु या आघाडीत विशेष दम नाही. कम्युनिस्टांना आसामात मुळीच थारा मिळत नाही आणि आघाडीने आतापर्यंत फक्त ६९ उमेदवारच उभे करण्याचे ठरविले आहे. काँग्रेसला दहा-बारा जागा सोडल्यास या आघाडीपासून काहीही भीती नाही.

जनसंघालाही आसाममध्ये अजून कुठेच लोकांचा पाठिंबा मिळालेला दिसत नाही. १९६२ साली जनसंघाने विधानसभेच्या चार जागा लढविल्या होत्या त्या चारी जागा गमावल्या. फक्त प्रजासमाजवादी पक्ष आणि गिरीजन सभा आदी चीन-विरोधकांनाच आसामात स्थान आहे. मागील निवडणुकीत प्रजासमाजवाद्यांनी ६ विधानसभेच्या जागा आणि २ लोकसभेच्या जागा मिळवल्या होत्या. गिरीजनांनी ११ विधानसभेच्या आणि १ लोकसभेची जागा जिंकली होती.

स्वतंत्र पक्ष येत्या निवडणुकीसाठी प्रथमच काही जागा लढविणार आहे. परंतु स्वतंत्रांना अद्याप आसामात स्थान नाही. डावी आघाडी फारतर दहा ते बारा जागा पदरात पाडून घेऊ शकेल. प्रजासमाजवाद्यांमधील काही उमेदवार आधीच काँग्रेसमध्ये गेलेले आहेत. आणि आसामची पुनर्रचना करण्याची घोषणा करण्यात आल्याने काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा राज्यात थोडी तरी वाढलीच असली पाहिजे, म्हणजे एकूण काही तुरळक ठिकाणी मार बसण्याचा अपवाद सोडून दिला तर आपली विधानसभेतील संख्या विशेष घसरू न देण्यात काँग्रेस यशस्वीच होईल, असे दिसते. ●

# विचार वारे

## ☐ भारतीय प्रकाशन-व्यवसायाला चांगला वाव

रुपयाचे अवमूल्यन दुर्दैवाने टळू शकले नाही तरी आता त्यामुळे भारतीय प्रकाशन-व्यवसायाला विकासाची सुवर्ण-संधी लाभली आहे, असे उद्‌गार गेल्या आठवड्यात पर्‌गॅमॉन प्रेस या प्रसिद्ध प्रकाशन-संस्थेचे चालक श्री. रॉबर्ट मॅक्स्वेल यांनी दिल्लीत प्रकाशक व मुद्रकांच्या एका सभेत बोलताना काढले. ज्यांनी नीट विचार करून या व्यवसायातच राहायचे ठरविले आहे त्यांना यापुढे विकास व विस्ताराचा काळ येऊ शकेल. इंग्लंड-अमेरिकेतील प्रकाशकांनी हे हेरले आहे की हिंदुस्थानचे भविष्य उज्ज्वल असल्याने त्या देशात आपल्या व्यवसायाचा विकास होऊ शकेल. सध्याचा काळ जरी काहीसा अडचणीचा असला तरी या अडचणीवर मात करण्याची शक्ती हिंदुस्थानात आहे.

पर्‌गॅमॉन प्रेस ही संस्था मुख्यत: शास्त्रीय प्रकाशनांना वाहिलेली आहे. कारण शास्त्रीय माहितीचा प्रसार करणे हे महत्त्वाचे व हितकारक कार्य आहे, असे मला वाटते. शंभर वर्षांपूर्वी लढाऊ जहाजाच्या मागोमाग व्यापार जात असे, पण आता तो पुस्तके व शिक्षणाच्या मागोमाग जातो.

पर्‌गॅमॉन प्रेसतर्फे चेंबर्स ज्ञानकोशाची चौदावी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली असून तिचा प्रचार करण्यासाठी मॅक्स्वेल हे जगाच्या प्रवासाला निघाले आहेत. ते म्हणतात, हा ज्ञानकोश वाचणे हा हेवा करण्याइतकी बहुश्रुतता संपादन करण्याचा उत्तम मार्ग आहे. चेंबर्स ग्रंथाची संपादन-पद्धती एन्‌सायक्लोपीडिया ब्रिटानिका किंवा इतर ज्ञानकोशांपेक्षा अधिक तर्कशुद्ध आहे. त्यातली प्रत्येक नोंद मागच्या आवृत्तीनंतरच्या काळात झालेल्या सर्व घटनांचा विचार करून पूर्णपणे सुधारून लिहिण्यात आली आहे. प्रस्तुत आवृत्तीतला हिंदुस्थान व पाकिस्तानबद्दलचा उल्लेख हा याचा पुरावा आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या लेखकांना लेख लिहावयास सांगण्यात येते त्यांनी आपल्या प्रत्येक विधानाची योग्य तीं पुष्टी केली पाहिजे असा संपादकांचा आग्रह आहे. त्यामुळे पांडित्याच्या प्रथेला शोभेल असे लेखन पक्षातीत व विद्वत्ताप्रचुर होऊं शकते. लेखकांची निवड चाळीस जणांच्या संपादकीय-

मडळाकडून करण्यात येते. प्रस्तुत आवृत्तीच्या लेखकांत अर्थशास्त्रज्ञ प्रा. निकोलस काल्डर, संगीतकार सर इसामा बर्लिन, इंग्लंडातील समलिंगी अनाचाराच्या समस्येवर अहवाल तयार करणारे सर जॉन वुल्फडेन इत्यादी प्रसिद्ध मंडळी आहेत त्याचप्रमाणे भारतीय विद्वानही आहेत.

चेंबर्स ज्ञानकोशाची मागची आवृत्ती १९६५ मध्ये निघाली होती. पण यापुढच्या आवृत्त्या लवकर काढायचे ठरविले आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात हल्ली इतक्या घटना घडत आहेत व त्या इतक्या जलद घडत आहेत की ज्ञानकोशाच्या दोन आवृत्त्यांत फार काळ जाऊ देता येणार नाही.

## □ कायद्याचे समाजात स्थान

अमेरिकेत काय किंवा भारतात काय, वकिलांनी नेहमीच महत्त्वाची सामाजिक कामगिरी बजावलेली आहे. समाज कुठल्याही प्रकारचा असला तरी त्यात कायदा असतोच; पण कुठल्या प्रकारचा कायदा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. स्वतंत्र समाजात कायद्याचे कार्य निरनिराळ्या समाज-घटकांत व कार्यक्षेत्रांत सत्तेची समान वाटणी करण हे असते, असे उद्गार अमेरिकेतील येल विश्वविद्यालयातील "कायद्याचे स्थान" या विषयावर भाषण देताना काढले. ज्या प्रमाणांत एखाद्या समाजात ज्ञानाची व संपत्तीची वाटणी झालेली असते त्या प्रमाणावर सत्तेची वाटणी अवलंबून राहते.

शासनकर्त्यांच्या निर्णयालाच कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. परंतु समाजाची शासनकर्त्यांबद्दल जी अपेक्षा असते ती लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आला पाहिजे. समाज आणि शासक यांच्या परस्पर-संबंधावरच कायद्याचे अधिष्ठान असते. स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा यांची जोपासना करणारी समाजरचना करणे हे कायद्याच्या अभ्यासाच एक प्रमुख अंग आहे. हल्लीच्या वकिलांना आव्हान देणारी समस्या आहे ती पाशवी शक्तीच्या जागी कायद्याची सत्ता प्रस्थापित करणे ही नसून मानवी प्रतिष्ठेचे ध्येय प्राप्त करण्यासाठी ज्या समाजात निर्भयपणे प्रयत्न करता येईल असा समाज निर्माण करणे ही आहे.

परंतु कायदेपंडितात येवढी क्षमता यायची असेल तर कायद्याचे अधिक सखोल अध्ययन व्हायला पाहिजे. या अध्ययनासाठी व संशोधनासाठी विश्वविद्यालयांनी व तत्सम संस्थांनी व्यवस्था केली पाहिजे. स्वतंत्र समाजात अधिकाधिक वकिलांची आवश्यकता आहे, पण त्यासाठी कायद्याचा अभ्यास वाढला पाहिजे. एखाद्या देशात कायद्याच्या शिक्षणात जेवढी सुधारणा होईल तेवढी तेथल्या कायदेकानू व्यवस्थेत सुधारणा होईल व कायदेव्यवस्था जेवढी अधिक चांगली तेवढी समाजात सुव्यवस्था अधिक नांदेल.

●



# पुरोगामी राष्ट्रवादाचे प्रभावी पुरस्कर्ते

## डॉ. रफिक झकारिया

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच आधुनिक भारतात हिंदु-मुस्लिम समन्वयाचा प्रश्न गंभीर होऊन बसला आहे. हिंदू आणि मुस्लिम यांचा परस्परांबद्दल असलेला अविश्वास व भीती, बहुसंख्य हिंदूंच्या मनात मुस्लिमांच्या राष्ट्रवादाबद्दल असलेली शंका आणि मुस्लिमांच्या मनात असलेले बहुसंख्य हिंदूंच्या बळाचे भय या

कारणांमुळे हा प्रश्न सतत चिघळत राहिलेला आहे. आणि अधून मधून होत असलेल्या हिंदू-मुस्लिम दंग्यामुळे या प्रश्नाला वाचा फुटत आली आहे. काँग्रेस व इतर राजकीय पक्षांतील नेते वारंवार मुस्लिमांना अभय देतात. हिंदूंना त्यांच्या जीवनाशी समरस व्हा असे सांगतात. मुस्लिमांनाही बराच उपदेश होतो, पण वस्तुनिष्ठपणे या प्रश्नाची चर्चा करण्याचा धीटपणा सहसा कोणी दाखवीत नाही. आणि असा धीटपणा दाखविण्याच्या भानगडीत निवडणुकांच्या धामधुमीत तरी कुणीच पडणार नाही. काही नियतकालिकांतून या समस्येची सैद्धांतिक चर्चा होते. पण निवडणु-कांच्या रिंगणात उतरणारा साधारणतः या विषयावर बोलायचे टाळतोच. एखाद्याने असा धीटपणा दाखवला तर त्याला कदाचित एकदम लोकमताचा प्रचंड पाठिंबा मिळण्याची जशी शक्यता आहे, तसेच तो निवडणुकीत आपले सारसर्वस्व गमावून बसण्याचा धोकाही खूपच आहे.

असा धीटपणा औरंगाबाद मतदारसंघातून काँग्रेस पक्षातर्फे विधानसभेसाठी निवडणूक लढविणारे महाराष्ट्र राज्याचे नगरविकास खात्याचे मंत्री डॉ. रफिक झकारिया दाखवितात तेव्हा खरोखरच आश्चर्ययुक्त कौतुक वाटते. त्यांच्या मतदार-संघात सुमारे तीस टक्के मतदार मुस्लिम आहेत.

"कोण म्हणतो हिंदू आणि मुस्लिम या दोन समाजांत परस्पर अविश्वास, भीती आणि संशय नाही म्हणून ?" पत्रकाराला साजेशा परखडपणाने डॉ. झकारिया 'माणूस' प्रतिनिधीशी यासंबंधी बोलत होते — "तसे म्हणणे म्हणजे इतिहासाकडे सरळसरळ दुर्लक्षच केल्यासारखे होईल. जातीयतेचे विष ब्रिटिशांनी पेरले आणि फाळणीपूर्वी ते जोपासले मुस्लिम लीगने. फाळणीनंतर झालेल्या दंग्यांनी त्याला खतपाणी मिळाले. या सत्य आणि स्वाभाविक गोष्टी नाकारून चालणार नाही."

परंतु हा परस्पर अविश्वास, संशय आणि भीती अद्याप अस्तित्वात असल्याचे मान्य करूनही "एवढ्या कडवट जातीयतेच्या पार्श्वभूमीतून व विषारी परिस्थितीतून आपण यशस्वीपणे बाहेर पडत आहोत हेही तेवढेच खरे," असे डॉ. झकारिया मानतात.

हिंदू-मुस्लिम प्रश्नांचा बराच अभ्यास केलेले, त्यांच्या प्रश्नांची खोल जाणीव असलेले, प्रखर राष्ट्रवादी आणि कर्तबगार व बुद्धीवादी राजकारणी म्हणून डॉ. झकारिया राजकीय क्षेत्रात ओळखले जातात. स्वर्गीय लाल बहादूर शास्त्रींनी त्यांचे हे गुण आणि वादपटुत्व हेरून भारत—पाक युद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या आम-सभेत भारताची बाजू मांडण्यासाठी त्यांची नियुक्ती केली होती. या संधीचा त्यांनीही भरपूर उपयोग करून घेतला होता. त्यांच्या भाषणाचे वृत्तांत ऐकून देशा-तील जनसंघासकट सर्व पक्षांच्या नेत्यांनी त्यांची प्रशंसा केली होती. त्यांच्या भाषणाला मिळालेली ही सर्वांत मोठी पावती असे ते मानतात.

## समस्यांचे मूळ आर्थिक दुर्बलतेत

मुस्लिमांचा जातीयवाद, त्यांचा राष्ट्रवाद, त्यांच्या सामाजिक समस्या या साऱ्या प्रश्नांची कारणे सारखीच आहेत, असे डॉ. झकारिया यांना वाटते. सामान्य मुस्लिमांची निकृष्ट आर्थिक परिस्थिती, ती तशी होण्यास कारण झालेले मुस्लिम लीगचे भूतपूर्व पुढारी, समाजातील कर्मठ, प्रतिगामी व एकांतिक गट आणि हिंदू समाजातील प्रतिगामी कडवा गट ही ती कारणे आहेत असे ते मानतात.

मुस्लिमांच्या बऱ्याच प्रश्नांची मुळे मुख्यतः त्यांच्या आर्थिक दुर्बलतेत आहेत असे प्रतिपादन करताना डॉ. झकारिया म्हणतात, "स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम लीगचे नेते, बडे जमीनदार व इतर श्रीमंत पुढारी यांनी पददलित मुस्लिम समाजाला पिळून काढले होते. आणि गरीब मुस्लिमांच्या धार्मिक भावनांना चेतवून त्यांच्यात आणि हिंदूंमध्ये त्यांनी एक पडदा निर्माण करून ठेवला होता. हे श्रीमंत मुस्लिम पुढे पाकिस्तानात पळून गेले आणि त्यांनी पेरून ठेवलेल्या विषबीजांचे परिणाम मात्र मागे राहिलेल्या गरीब मुस्लिमांना भोगावे लागतात. या पददलित समाजाला आता नव्या परिस्थितीशी जुळवून घ्यायचे आहे आणि म्हणून या समाजाला सर्वांच्या सहानुभूतीची आवश्यकता आहे. या समाजाच्या स्वतःच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या जाणिवेतूनच त्यामधील समाजविरोधी शक्ती नष्ट होतील असा माझा विश्वास आहे."

आणि म्हणून डॉ. झकारिया आपल्या भाषणांमध्ये नेहमी मुस्लिमांना सांगतात, "आपली सामाजिक अलिप्तता सोडून देऊन बहुसंख्याकांशी मिसळून, त्यांच्या भावना समजावून घेऊन आणि आपल्या भावना व प्रश्न त्यांना समजावून सांगून राहण्यातच आपली प्रगती आहे. संरक्षणासाठी आपण केवळ सरकारच्या तोंडाकडे न बघता आपल्या शेजारच्या हिंदूंकडेसुद्धा पाहिले पाहिजे."

"स्वतःच्या आर्थिक उन्नतीसाठी मुस्लिम समाजाने स्वतःहूनच काही चळवळ करायला नको का?" एक प्रश्न.

## तरुण मुस्लिम पिढी

**डॉ. झकारिया :** मुस्लीम समाजाने स्वतःपुरतीच तशी चळवळ केली तर तिला लगेच जातीयतेचा वास येण्याचा संभव आहे. मुस्लिम समाजाच्या आर्थिक उन्नतीची चळवळ ही अलग न राहता सर्व समाजाच्या आर्थिक उन्नतीच्या चळवळीशी एकरूप राहण्यातच तिचे हित आहे. सर्व सामाजिक चळवळींशी एकरूप राहूनच मुस्लिमांनी स्वतःच्या हुशारीवर आणि परिश्रमाने स्वतःची उन्नती साधली पाहिजे.

**प्रश्न :** राष्ट्रीय हितसंबंधांना बाध आणणारे व हिंदू-मुस्लिम ऐक्याला विरोध करणारे जसे काही प्रतिगामी मुस्लिम गट आहेत तसेच काही उदारमतवादी पुरोगामी मुस्लिमही आहेत ना? अशा सुधारणावादी मुस्लिमांना राज्यकर्त्यांकडून कितपत पाठिंबा मिळतो?

**डॉ. झकारिया :** आपण या विषयाची मूलभूत चर्चाच करू या. राष्ट्रीय ऐक्याच्या आणि राष्ट्रीय प्रगतीच्या आड येणारा एक कर्मठ प्रतिगामी मुस्लिम गट आहे हे खरे आहे. परंतु असे समाजविरोधी गट सर्वच समाजांत असतात हेही खरे नाही काय ? तेव्हा केवळ याच गटामुळे हिंदू-मुस्लिम ऐक्याची गती खुंटते असे म्हणता येणार नाही. हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजांत पुरोगामी आणि प्रतिगामी शक्ती आढळतात. कोणती शक्ती कोणत्या समाजात अधिक हाच काय तो फरक.

परंतु आता माझी खात्री झाली आहे की, कर्मठ प्रतिगामी मुस्लिम गट यापुढे सामान्य मुस्लिम समाजावर अधिक प्रभाव टाकून त्याला मूर्ख बनवू शकणार नाही. काळाची पावले ओळखून सर्व समाजांत मानाची जागा मिळविण्यासाठी मुस्लिमांना नव्या परिस्थितीशी जुळते घ्यावे लागेल. ही जुळते घेण्याची प्रक्रिया आता वेगाने घडत आहे. आणि मला असे वाटते की ज्या काही जातीय आणि अराष्ट्रीय प्रवृत्ती मुस्लिमांत पूर्वी होत्या त्याही आता वेगाने नाहीशा होत आहेत. या प्रक्रियेच्या आड येणारे काही मूठभर लोक अद्याप उरले असण्याची शक्यता आहे. परंतु त्यांचा प्रभाव पडणार नाही. आपल्या आर्थिक उन्नतीकडे लक्ष ठेवून मुस्लिम समाजही आता सर्व समाजांशी मिळते घेण्याचा प्रयत्न करू लागला आहे. पाकिस्तान-विषयीच्या ज्या काही भावना पूर्वी काही मुस्लिमांत होत्या त्या आता उरल्या नाहीत. आणि इतर मुस्लिम राष्ट्रांप्रमाणेच पाकिस्तान हेही भारतीय मुस्लिमांच्या दृष्टीने एक परके आणि दूरचे राष्ट्र बनू लागले आहे हे खरे आहे.

**प्रश्न :** मुस्लिम तरुण पिढीच्या राष्ट्रवादाविषयी काय भावना आहेत ?

**डॉ. झकारिया :** माझ्या अंदाजाप्रमाणे राष्ट्रवादाची भावना तरुण मुस्लिम पिढीत फार जोराची पकड घेत आहे. या बाबतीत मलाही आश्चर्य वाटेल अशा काही गोष्टी आहेत. उत्तर भारतातील कित्येक मुस्लिम तरुणांना असे मनापासून वाटते की जनसंघात सामील होणे हेच मुस्लिम हितसंबंध रक्षण करण्याच्या दृष्टीने अधिक उपयोगाचे आहे. आणि म्हणून आम्ही जनसंघात का जाऊ नये असे ते आम्हांला विचारतात. त्याचप्रमाणे हजारो मुस्लिम तरुण कम्युनिस्टांकडेही आकर्षित होत आहेत. अर्थातच माझे विचार वेगळे आहेत. मुस्लिम तरुणांतील विचार-प्रवाह कोणत्या दिशेने वाहतात आणि अगदी टोकांच्या विचारांचे मुस्लिम कम्युनिस्टांकडे आणि जनसंघाकडेही कसे आकर्षित होतात हे दाखविण्यासाठी मीं सांगितले.

**प्रश्न :** पुरोगामी, उदारमतवादी मुस्लिमांच्या हिंदूंकडून काय अपेक्षा आहेत ? हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या चळवळीत हिंदूंकडून कितपत अडथळा होतो ?

**डॉ. झकारिया :** आपल्या देशाचे धर्मातीत धोरण न आवडणारा असा एक गट हिंदूंतही आहे. मुस्लिमांच्या प्रगतीसाठी, फायद्यासाठी केलेली कोणतीही गोष्ट या गटाला आवडत नाही. परंतु या कडव्या गटाचा उपयोग करून घेऊन मुस्लिमांतील

एकांतिक जातीय गट मुस्लिमांत कडवटपणा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. या प्रतिगामी हिंदू गटाकडे बोट दाखवून ते म्हणतात, "बघा, देशात धर्मातीतताच नाही. हिंदूंमधील या प्रतिगामी गटाचा परिणाम हा असा उलटा होतो.

परंतु त्यामुळे मुसलमानांना विषमतेची वागणूक मिळते असे डॉ. झकारिया यांना मुळीच वाटत नाही. सर्व ठिकाणी हिंदूंप्रमाणेच मुस्लिमांनाही न्यायाच्या सवलती मिळतात. नोकरीच्या वेळी कुठे कुठे अन्याय होत असला तर तो एकंदर धोरणामुळे नव्हे तर त्या त्या ठिकाणी असलेल्या काही पूर्वग्रहदूषित व्यक्तींमुळे, असे त्यांना वाटते. आणि नोकऱ्या देण्याच्या बाबतींतील जातीयता सर्वच जातींच्या बाबतीत सारखीच पसरली आहे असेही ते कबूल करतात.

**प्रश्न** : मघाचा एक प्रश्न अनुत्तरीतच राहिला. पुरोगामी सुधारणावादी मुस्लिमांना राज्यकर्त्यांचा कितपत पाठिंबा मिळतो ?

**डॉ. झकारिया** : आमची परिस्थिती मोठी कठीण आहे बघा. तुमच्यामागे किती मते येऊ शकतात यावर राज्यकर्त्यांमधील तुमचे वजन अवलंबून असते. आणि पंचाईत अशी आहे, की तुम्ही पुरोगामी वृत्तीचे व्हायला लागला की तुमची मते गेलीच म्हणून समजा. मग तुम्ही राज्यकर्त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी ठरता. तुमच्या लोकांत तुमचे वजन किती आहे, असे विचारले जाते. आणि मग मते मिळविण्यासाठी थोडीशी तरी पुरोगामी वृत्तीला मुरड घातली की लगेच तुम्ही जातीयवादी ठरता. अशी मोठी कठीण स्थिती आहे.

## पाकिस्ताननिर्मितीला विरोध

विद्यार्थिदशेपासून डॉ. झकारिया हे राष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या पुरोगामी चळवळीत अग्रक्रमाने भाग घेत होते. आपल्या निवडणुकांच्या निमित्ताने जरी ते १९६२ नंतर औरंगाबाद शहराशी आणि मराठवाड्याशी निगडित झाले असले तरी त्यांचे पूर्वायुष्य मुंबई-पुण्याकडेच व्यतीत झाले आहे. ठाणे जिल्ह्यातील सोपारा या गावी १९२० साली त्यांचा जन्म झाला. वडील बाबूमियाँ हे एक संपन्न जमीनदार होते. बालपणीच त्यांचे आईवडिलांचे छत्र नाहीसे झाले. भिवंडी येथील अँग्लो-उर्दू हायस्कूलमध्ये इंग्रजी चौथीपर्यंत शिक्षण घेतल्यावर वयाच्या चौदाव्या वर्षी बाकीचे पुण्याच्या अँग्लो-उर्दू हायस्कुलात झाले आणि ते एक हुशार विद्यार्थी म्हणून गाजले. वाचनाच्या आणि विशेषतः वृत्तपत्रवाचनाच्या आवडीने राजकारणातही त्यांना रस वाटू लागला. आंतरशालेय वादविवाद स्पर्धाही त्यांनी याच वेळी गाजविल्या. अशाच एका वादविवाद स्पर्धेच्या वेळी कै. न. चिं. केळकर अध्यक्ष म्हणून आले असता झकारियांना त्या स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाला होता. या मुस्लिम राष्ट्रप्रेमी विद्यार्थ्याबद्दल कुतूहल वाटून केळकरांनी झकारियांना मुद्दाम भेटीला बोलावले होते. झकारियांचा त्या नंतर केळकरांशी बराच संबंध आला. केळकरांच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा ठसा आपल्या मनावर कायम उमटला असल्याचे डॉ. झकारिया अजून सांगतात.

उर्दू वार्ता

## विधायक धक्का

आरडाओरडा, घोषणा, पुढाऱ्यांचा प्रचार, खेळ, करमणूक, लग्नादी कार्यातील गोंधळ... ही हमखास मुसलमानांची क्षेत्रे ! कार्यक्षमता, कर्तृत्व या बाबतींत या जमातीत कमालीचे औदासीन्य. परंतु या सर्व नियमांना, संकेतांना गोड धक्का देणारी घटना घडल्याचा उल्लेख 'मिदाई मिल्लत'चे मौलाना अब्दुल हसन नदवी यांनी लखनौच्या 'सदके जदीद' या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या आपल्या लेखात केला आहे. ते लिहितात –

द. महाराष्ट्रातील विजापूर जिल्ह्यातील गोकार्क या गावी मुसलमान सद्गृहस्थांनी १०-१० पैसे वर्गणी गोळा करून दोन कोटी रुपयांइतकी प्रचंड रक्कम उभी केली व एक सिमेंट फॅक्टरी सुरू केली आहे. सदर फॅक्टरीचें उत्पन्नाचा ग्रामीण भागातील उर्दू माध्यमातील कॉलेजसाठी विनियोग होणार आहे. पूर्वी या गावी प्राथमिक शाळादेखील नव्हती. लोकांनीच स्वतःच्या पैशानं व श्रमानं येथे प्राथमिक व माध्यमिक शाळा उभ्या केल्या. ही गोष्ट केवळ अभिनंदनीयच नव्हे तर अनुकरणीयही आहे. लग्नसोहळे, मेजवान्या, विलासात पैसा उधळणारे म्हणून ज्यांचा पूर्वलौकिक, त्याच जमातीतले हे कर्तृत्व व दातृत्व म्हणजे रखरखीत वाळवंटात दिलासा देणारं 'ओॲसिस'च नव्हे काय ? ही चळवळ केवळ गोकार्कपुरतीच मर्यादित न राहता तिचे लोण जिल्ह्यात, प्रांतात किंबहुना, संपूर्ण देशापर्यंत पोचायला हवं. म्हणजे ऊठसूठ सरकारच्या अकार्यक्षमतेवर आसूड ओढणाऱ्या व सरकारी मदतीसाठी अडून बसणाऱ्या अडेलतट्टूंचे पितळ उघडे पडू शकेल !

**[ संकलक : हिदायतखान, 'उर्दू टाइम्स', (मुंबई) ५-१-६७ ]**

मॅट्रिक झाल्यावर त्यांनी मुंबईला अंधेरीच्या इस्माईल कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. अभ्यासाबरोबर इतर महाविद्यालयीन चळवळीतही ते हिरीरीने भाग घेत. अखिल भारतीय विद्यार्थी कॉंग्रेसमध्ये डॉ. झकारियांनी दिनकर साक्रीकर, रवींद्र वर्मा, प्रभाकर कुंटे, पद्मनाभंत आदींच्या बरोबरीने काम करून त्यांचा विश्वास संपादन केला. आपल्या प्रभावी वक्तृत्वामुळे ते इस्माईल कॉलेजच्या स्टुडंट युनियनचे जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आले होते. युनियनतर्फे 'भारतातील आजची राजकीय परिस्थिती' या विषयावर १९३९ साली झकारियांनी एक व्याख्यानमाला आयोजित केली होती. पहिले व्याख्यान बॅ. जीनांचे झाले आणि त्याने भलतीच खळबळ उडाली. बॅ. जीना त्या वेळेपर्यंत राष्ट्रवादी म्हणून ओळखले जात होते. फाटाफुटीची जाहीर भाषा ते कधीच बोलले नव्हते. पण याच भाषणात त्यांनी प्रथमच 'हिंदूंनो याद राखा, देशाच्या राष्ट्रीय सरकारात आम्हांला भाग्य स्या हवे' अशी भाषा वापरली. डॉ. झकारियांना हे भाषण मुळीच आवडले नाही. आपल्या आभाराच्या भाषणात

नापसंती व्यक्त करताना हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी धडपडणारे नेते अशी आपली बॅ. जीनांबद्दल कल्पना होती असेच त्यांनी सांगितले. जीनांना चांगले प्रत्युत्तर मिळावे म्हणून त्यांनी सरदार पटेलांचे व्याख्यान ठेवण्याचा प्रयत्न केला. ते त्यांना जेव्हा जमले नाही तेव्हा त्यांनी कन्हैयालाल मुन्शी, सुभाषचंद्र बोस, सर कावसजी जहांगीर या राष्ट्रवादी पुढाऱ्यांची एकामागून एक भाषणे ठेवली. भाषणमाला गाजली पण झकारिया मात्र काही मुस्लिम विद्यार्थ्यांत त्यामुळे अप्रिय झाले. जीनांच्या हटवादी वृत्तीशी तेव्हापासूनच त्यांचे बिनसले आणि पुढे जेव्हा जीना मुस्लिम लीगच्या व्यासपीठावरून पाकिस्तानच्या घोषणा करू लागले तेव्हा अनेक वृत्तपत्रांतून पाकिस्तानची निर्मिती कशी घातक आहे हे सांगणारे लेख लिहिण्याची झकारियांनी आघाडीच उभारली. अनेक राजकीय चळवळींत सहभागी होत असतानाच त्या वेळी गाजणाऱ्या 'शिसर' वक्तृत्वस्पर्धेत त्यांनी १९४३ साली भाग घेऊन पहिला क्रमांक मिळवला होता. स्पर्धेचे अध्यक्ष होते जस्टिस छगला आणि परीक्षक होते न्यायमूर्ती बी. एन्. गोखले, सी. जी. मोदी आणि कपिला खांडवाला. विषय होता, 'भारताची राजकीय फाळणी करण्याचे प्रयत्न भारताच्या हिताच्या दृष्टीने पूरक नाहीत.'

पाकिस्तानच्या मुळावरच कडाडून हल्ला चढविताना झकारिया त्या वेळी म्हणाले होते, "पाकिस्तानचे प्रचारक इतिहासाचा पुरावाच पायदळी तुडवीत आहेत. मुस्लिमांना वेगळे राष्ट्र हवे ही कल्पनाच चुकीची आहे. धर्म वेगळा असला तरी भारतातील मुस्लिम इतर भारतीयांप्रमाणेच आहेत." काळाची पावले ओळखून धर्माला राजकारणापासून दूर राखा, असे आवाहन त्यांनी नेत्यांना केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात छगलांनी झकारियांच्या वक्तृत्वशैलीची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

**युद्धवार्ताहर झकारिया**

याच काळात ते ब्लिट्झ, संडे स्टँडर्ड आणि टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रांत


फ्री – मोफत – फ्री

मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोबर आजच लिहा

**महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस**

ब्रांच पोस्ट ऑफिस गुन्डिआली

सब-पोस्ट–मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य

विपुल लेखन करीत. लॉ कॉलेज युनियनचे जनरल सेक्रेटरी या नात्याने त्यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या स्मृतिदिनाची मोठी सभा मुंबईत आयोजित केली होती. त्यांना स्वत:ला टागोरांविषयी नितांत आदर आहे

आणि एवढ्या सर्व धावपळीत भाग घेऊनही १९४४ साली ते एम्. ए. ची परीक्षा 'चॅन्सेलर्स गोल्ड मेडल' चा सर्वोच्च सन्मान मिळवून उत्तीर्ण झाले.

मुंबई विद्यापीठाची सर करीमभाई इब्राहिम स्कॉलरशिप मिळवून लंडनवरील ऐन बाँबहल्ल्याच्या वेळी झकारिया उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमध्ये आले. विद्यापीठ सुरू होण्यास अवधी होता म्हणून त्यांनी लंडनच्या न्यूज कॉनिकल या वृत्तपत्रात बातमीदारी पत्करली आणि या नव्या क्षेत्रात अल्पावधीतच चांगलेच यश संपादून युद्धवार्ताहराची बढती त्यांनी मिळविली. पॅरिस शहराची मुक्तता झाल्यावर अवघ्या सहा दिवसांनी ते तेथे युद्धवार्ताहर म्हणून गेले. या धामधुमीत त्यांनी सारा युरोप पालथा घातला. मुंबईच्या ब्लिट्झ् या पत्रातही ते युद्धवार्तापत्रे लिहीत.

युद्ध संपल्यावर डॉ. झकारियांनी पी. एच्‌डी. च्या अभ्यासाला सुरुवात केली. बार अॅट–लॉसाठीही प्रवेश मिळविला आणि दरम्यान लंडनच्या ट्रिब्यून, न्यू स्टेट्स्‌मन यांसारख्या भारदस्त नियतकालिकांत एक चुरचुरीत स्तंभलेखक म्हणून नाव कमावले. इंग्लंडमधील भारतीय विद्यार्थ्यांच्या चळवळीशीही त्यांचा निकटचा संबंध होता. इंडिया लीगच्या व्यासपीठावरून ते सतत पाकिस्तानच्या कल्पनेला विरोध करीत आले. लीगशी संबंधित असतानाच श्रीकृष्ण मेनन यांच्याशी घनिष्ट संबंध आले होते. इंग्लंडमधील त्यांच्या वास्तव्याविषयी एका ठिकाणी श्री. मेनन यांनी लिहिले आहे– "डॉ. झकारिया यांच्यातील नेतृत्वाचे गुण, जबाबदारी उचलून ती परिश्रमाने पार पाडण्याची त्यांची वृत्ती, हे जवळून पाहण्याची संधी मला मिळाली होती. त्यांचे हे गुण माझ्या विशेष नजरेत भरले. विद्यार्थ्यांचा नेता म्हणून, चळवळीतील जोमदार चैतन्य आणि हेतू मुळीही दृष्टिआड होऊ न देता त्यांनी चांगलेच कसब आणि खंबीरता दाखविली. त्यांची देशप्रीती, देशाच्या वर्तमानावर आणि भविष्यावर त्यांची असलेली श्रद्धा आणि त्यासाठी कष्ट सोसण्याची त्यांची तयारी यांमुळे त्यांच्याविषयी मला आदर वाटतो हे मला विशेष आनंदाने नमूद करावयाचे आहे. आपल्या देशातील तरुणांमध्ये जे गुण असणे आज आवश्यक आहेत ते त्यांच्यात आहेत : ध्येयनिष्ठ, नेतृत्वाची क्षमता, शिस्तीची व प्रामाणिकपणाची जाणीव."

१९४६ साली प्रागला आंतरराष्ट्रीय विद्यार्थी परिषदेचे उद्‌घाटन झाले, तेव्हा तेथे भारतीय विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. झकारिया हजर होते. भारताच्या फाळणीची योजना जाहीर झाली तेव्हा ते इंग्लंडमध्येच होते. 'कॅन इंडिया बी सेव्हड्' या मथळ्याखाली त्यांनी त्या वेळी ट्रिब्यूनमध्ये एक दीर्घ लेख लिहून भारताची फाळणी करणे ही केवढी मोठी घोडचूक आहे हे सांगितले होते. १९४९

च्या जानेवारीत पी. एच्‌डी. मिळवून आणि बॅरिस्टरी संपादन करून ते भारतात परतले तेव्हा भारताची फाळणी होऊन कश्मीरमधील भारत-पाकिस्तान युद्ध पेटून विझलेही होते.

## राजकारणात प्रवेश

मुंबईत वकिली व्यवसायात डॉ. झकारियांनी चांगलाच जम बसविला व थोड्याच काळात व्यवसायातील आपल्या हुशारीने त्यांनी स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटरची जागा मिळवली. टाईम्स ऑफ इंडिया, बाँबे क्रॉनिकल, ब्लिट्झ आदी वृत्तपत्रांत त्यांनी चौफेर लिखाण करणे चालूच ठेवले होते. ब्लिट्झसारखा डाव्या वृत्तपत्रांत 'द मच मिसअंडरस्टुड मि. मोरारजी देसाई' असा मोरारजींबद्दलचे गैरसमज दूर करणारा एक लेख लिहून त्यांनी वृत्तपत्रीय विक्रमच केला होता.

याच सुमाराला 'अमेरिकन इन्स्टिटयूट ऑफ सोशल स्टडीज' या संस्थेतर्फे मुंबईत गरीब मुलांची शाळा चालविणाऱ्या फातमा नावाच्या युवतीशी त्यांचा प्रेमविवाह झाला. आता सौ. झकारिया इलस्ट्रेटेड विकलीमधील बालविभाग चालवितात. आपल्या पतीच्या राजकीय जीवनाशी त्या संपूर्ण समरस झालेल्या आहेत.

डॉ. झकारियांच्या वैविध्यपूर्ण लिखाणामुळे आणि वक्तृत्वामुळे अनेक राजकीय नेत्यांचे त्यांच्याकडे लक्ष वळ लागले होते. एक तरुण हुशार कार्यकर्ता म्हणून श्री. यशवंतराव चव्हाणांनी त्यांना १९५७ साली नागपाडा येथील विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसतर्फे उभे केले होते.

संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार श्री. तुल्ला यांच्याशी डॉ. झकारिया यांना सामना द्यावा लागला. आणि अवघ्या ५०० मतांनी झकारिया या निवडणुकीत पराभूत झाले.

याच सुमाराला टाईम्स ऑफ इंडिया प्रकाशन संस्थेने आपला 'स्टडी ऑफ नेहरू' हा विख्यात ग्रंथ संपादित करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविली. डॉ. झकारिया यांनी ती मोठ्या कुशलतेने पार पडली. या ग्रंथाला खूपच प्रसिद्धी मिळाली आणि त्यामळे अनेक जाणत्यांचे त्यांच्याकडे अधिकच लक्ष वेधले जाऊ लागले.

१९६२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी औरंगाबादच्या विधानसभा मतदारसंघात उमेदवार निवडण्याचा प्रसंग आला तेव्हा यशवंतराव चव्हाणांसमोर झकारिया यांचेच नाव आले. सामना अटीतटीचा होता आणि त्यांच्याविरुद्ध उभे असलेले भाई गोविंददास श्रॉफ ही मराठवाड्यातील बडी असामी होती. तोपर्यंत झकारियांचा औरंगाबाद शहराशी किंवा मराठवाड्याशी काहीही संबंध नव्हता. औरंगाबादला ते फक्त एक-दोन वेळाच गेले होते. पण तरीही डॉ. झकारियांनी श्रॉफ यांचा चार हजार मतांनी पराभव केला. त्यांची बांधकाम खात्याचे उपमंत्री म्हणून नेमणूक झाली. १९६३ मध्ये मुख्यमंत्री कन्नमवारांचे निधन झाल्यावर

नवे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी त्यांच्याकडे नगरविकास खात्याचे मंत्रिपद सोपविले.

बांधकाम खात्याचे मंत्री असताना त्यांनी मुंबई–अहमदाबाद रस्ता, ठाणे खाडी पूल, रत्नागिरीजवळील मिऱ्या बंदराची योजना या कामांना धडाडीने चालना मिळवून दिली. तसेच नगरविकास खात्याचे मंत्री म्हणून नागरी कायद्याच्या एकसूत्रीकरणासाठी त्यांनी झटून प्रयत्न केले. नगरनियोजनाकडेही त्यांनी बारकाईने लक्ष पुरवून त्यासाठी अनेक कार्यक्रम मंजूर केले.

औरंगाबाद शहरावर आणि मराठवाड्याच्या लोकांवर आपण बाहेरचे म्हणून लादले गेलो नाहीत ना, अशी डॉ. झकारियांना प्रथमपासून रुखरुख होती. बांधकाम विभागाचे उपमंत्री असताना त्यांनी मराठवाड्यातील रस्त्यांचा विकास करण्याकडे तातडीने लक्ष पुरविले. मौलाना अबुल कलम आझाद कॉलेज हे औरंगाबादचे विख्यात कॉलेज स्थापन करण्यामागे डॉ. झकारिया यांचे मोठे परिश्रम आहेत. औरंगाबाद शहराचा तर त्यांनी आता कायापालट करून टाकण्याचे ठरविले आहे. जवळच असलेल्या वेरूळ आणि अजिंठा या प्राचीन जगप्रसिद्ध लेण्यांना भेटी देण्यासाठी येणारे थोर थोर परदेशी पाहुणे औरंगाबाद शहरातूनच जातात. या लेण्यांचे प्रवेशद्वार म्हणून औरंगाबाद शहराची शोभा वाढविली पाहिजे असे ते म्हणतात. त्यासाठी त्यांनी बऱ्याच योजनाही आखल्या आहेत.

**सर्वोच्च सन्मानाचा क्षण**

भारताची बाजू संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडण्याची संधी मिळणे हा आपल्या आयुष्यातील सर्वोच्च क्षण होता, असे डॉ. झकारिया मानतात. ही संधी मिळेल असे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. १ ऑक्टोबर १९६५ ला मुख्यमंत्री नाईक यांनी त्यांना मुंबईहून पुण्याला फोनवरून त्यांची निवड झाल्याचे कळवले तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. पुढे दोन दिवसांनी ते दिल्लीत शास्त्रीजींना भेटले तेव्हा त्यांना कळले की शास्त्रीजी त्यांची भाषणे आणि लिखाण नेहमी वाचत असत. विशेषतः, टाईम्स ऑफ इंडियातही त्यांनी लिहिलेली ‘इंडिया-पाकिस्तान अँड इस्लाम’ ही लेखमाला आणि भारत-पाक युद्धाच्याच वेळी लोकराज्यात प्रसिद्ध झालेली कश्मीरवरील कविता (डॉ. झकारिया अधूनमधून कविताही करतात. शेर-शायरीत तर त्यांना खूपच रस!) शास्त्रींना आवडली होती.

युनोत बोलण्यासाठी आधी भरपूर तयारी करावी लागते. प्रत्येक शब्द काटेकोरपणे मांडावा लागतो. आणि तरीही सभेचा कितपत प्रतिसाद मिळतो याची शाश्वती नसते. अधिकारक्रमानुसार स्वर्णसिंग, पार्थसारथी यांची भाषणे झाल्यानंतर डॉ. झकारिया बोलण्यासाठी उठले. त्यांच्यानंतर अमेरिकेचे आर्थर गोल्डवॉटर बोलणार होते. त्यामुळे सगळी सभा आणि प्रेस गॅलरी खच्चून भरली होती. या संधीचा

[ पृष्ठ ६२ वर ]

लग्नं अनेक होतात–
काळजी ही प्रत्येक लग्ना-
तली एक प्रमुख देवता
असते – गौरीगणपतीबरो-
बरच या देवतेलाही लग्न-
समारंभांत साग्रसंगीत पूजा
मिळत असते –
पण काही लग्नं
अशीही—



दोन जुनीपुराणी झिजलेली पायतणं दाराशी हलकेच ठेवली जातात – आवाज न होऊ देता – घराच्या दारामध्ये थोडंसं वाकावं लागतं – शरीर घरात प्रवेश करतं अन् डोळ्यांच्या साहाय्यानं मन भिरभिर चारी भिंतींवर – वस्तूंवर फिरू लागतं यजमान आतल्या खोलीतून बाहेर येतात – नमस्कार – एक लाचारी नमस्कारातून आपलं तोंड मध्ये घालण्याचा विचार करताना दिसते – एक जराजर्जर शरीर आतल्या खोलीत पलंगावर विसावलेलं असतं – चार पावलं आतल्या खोलीकडे जातात – पुन्हा नमस्कार – पलंगावरचं शरीर तक्क्याला टेकून बसतं – ओळख करून दिली जाते –

" हे दादासाहेब जामदार – अकोल्याला फॉरेस्टमध्ये हेडक्लार्क होते – आता रिटायर्ड झालेत–सध्या इथंच असतात. "


" हे आमचे वडील. "

" हो – मीसुद्धा पेन्शन घेतल्याला २५ वर्षं झाली– त्या वेळचा तो काळच निराळा होता – सारंच निराळं – त्या वेळी १५० रुपयांवर पेन्शन घेतलं – तुम्ही – ?"

" मी – ना – मी इतक्यातच रिटायर्ड झालोय् – तरी ७-८ वर्षं झालीत– फॉरेस्ट-मधून हेडक्लार्कच्या ग्रेडवर रिटायर्ड झालो – "

" कोणत्या वर्षी घेतलं पेन्शन ? "

" पंचावनलाच घेऊन टाकलं – हातपाय काम देईनात – म्हटलं खटाटोप पुष्कळ झाला – बत्तीस वर्षं काम केलं एकंदर – " तरीही लाचारी मधून डोकावतेच –



# चालली शकुंतला...



## श्याम तारे

" तुम्हांला मुलंबाळं किती ?"

" दोन मुली नि तीन मुलं."

" मुलं काय करतात ?"

" मोठा सी. आय्. डी. ऑफिसर आहे – दिल्लीला असतो सध्या – त्याहून धाकटा एम्. एस्सी. झालाय् – अॅटॉमिक एनर्जीत असतो मुंबईला – तिसरा लहान आहे – एफ्. वाय्.ला बसतोय् – "

" अस्सं. " पलंगावरून समजुतीचा, समाधानाचा एक स्वर – " म्हणजे घरातली माणसं शिकली–सवरलेली दिसतायत् – ठीक – ठीक – "

" ही माझी दुसरी मुलगी लग्नाची आहे – आशा नाव तिचं. एफ्. वाय्. केलं गेल्या वर्षी – आता यंदा कॉलेजमध्ये नाव नाही घातलं – शिवणकामाच्या परीक्षेला बसतेय् यंदा –" ऐकणारांच्या चेहऱ्यावरचे भाव हळूच डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्यांच्या लक्षात न येईल अशा रीतीनें निरखले जातात – चला – समाधान दिसतंय् – ठीक – पुढं बोलायला हरकत नाही.

" माझ्या मोठ्या मुलीचं लग्न केलं मी दोन वर्षांपूर्वी – नागपूरला दिलीय् – लक्ष्मीनगरमध्ये – देशमान्यांकडे – जावईबुवा – ब्रुकबाँडमध्ये असतात – सेल्समन –"

" बरं. वय काय मुलीचं ?"

' तिचं वय एकवीस वर्षांचं – पंचेचाळीस सालचा जन्म – पण – तुम्हांला पत्रिका बघायचीय् म्हणून ऐकलं – " शंकेला प्रश्नरूप मिळतं –

" हो – अहो, आम्ही जुन्या वळणाची माणसं. तेव्हा पत्रिका बघायचीच."

" पत्रिका आणलीय् मी."

" मग देऊन द्या."

" बरंय् – येतो हं – केव्हा येऊ साधारणपणे विचारायला ?"

" परवा सकाळी या – तोपर्यंत विचारून ठेवतो."

समोर आलेल्या तबकातली पानसुपारी घेताघेताच मग ताण कमी होण्यासाठी गोष्टी काढाव्याशा वाटतात – सहकाऱ्यांच्या – आता वार्धक्यानं वाकलेल्या – स्वत:सारख्याच बापूकाका पालेकर अन् जगदळे – त्यांच्याच ऑफिसातले – आठवणी चघळल्या जातात – राहिले – गेले – इत्यादींच्या नामावलींची थोडीशी उजळणी – अन् मग वाकलेलं शरीर मनाला घेऊन चालू लागतं – फाटक आठवणीनं लावायला हवं – रस्त्यावर आल्यानंतर जरा हलकं वाटतं – माणसं तर खरोखरच सुंदर आहेत – आशाचं नशीब जोरदार दिसतंय् – पण मोठे लोक आहेत – त्यांच्या बरोबरीनं उतरायला हवं – नाहीतर नावं ठेवतील – त्यांच्याकडचे लोक – पण नाहीतरी नावं ठेवतातच म्हणा – कुन्दाच्या लग्नातसुद्धा असंच झालं – चालायचंच् – कालाय तस्मै नम: – आज ऊन थोडंसं जास्तच तापलंय् – छत्री घ्यायला हवी होती – पण जाऊ द्या – घर जवळ येतं – पावलं संथ धीमी पडू लागतात ––

" आशा ! अग, थोडं पाणी घे बरं प्यायला."

" हो."

एक आतुर चेहरा दारातून परत जातो – अल्लडता अजून गेलेली नसते – सारखं जिवात धडधडतं – काल काकांनी सांगितल्यापासून दादांना मुळी चैनच पडलं नाही – लगेच सकाळी उठून त्यांच्याकडे जातो म्हणाले – पण बरंच झालं नाही गेले ते – सकाळी मी क्लासला गेले असते अन् दादा त्यांच्याकडे जाऊनसुद्धा आले असते – मग मला घरी आल्यानंतर सगळं समजलं असतं – आता कसं सगळं साग्रसंगीत समजेल – दादा–आईला सांगताना कसं अगदी अ–आ–इ–ई – सारखं समजावून सांगतात–––

" अग, पाणी आणतेस ना ?" पुन्हा हाक ऐकू येते.

" हो. पाणी आणायलाच आत गेले होते – पण आई म्हणाली, की इतक्या उन्हातून आल्यावर थोड्या वेळानं पाणी प्यावं––"

किती काळजी आहे आशूला – चांगला संसार करील––

भैय्याजी देसायांबद्दल त्यांनी खप ऐकलंय् – त्यांचा नातू लग्नाचा आहे – खूप हुशार आहे म्हणतात – पुन्हा एकुलता एक – घरचं खूप नसलं तरी आनंदात आहे – आशूला अगदी असंच ठेवायचं ठरवलं होतं मनाशी – सध्या तरी आपल्याला काही कमी नाही – श्रीकांतचं दिल्लीहून पत्र आलंय् – बाळसुद्धा तसंच

लिहितो – आशूवर त्यांचा जीव आहे – श्रीनं लिहिलं – तुम्ही काहीही काळजी करू नका – आशूचं लग्न अगदी थाटात झालं पाहिजे – कुन्दाच्या लग्नात नाही म्हटलं तरी फारच त्रास झाला – पेन्शन घेऊन वर्षं उलटलेली – श्रीला नोकरी लागली नव्हती – अजून आठवतं – पण आता सगळं बदललंय् – आशूचं लग्न थाटात व्हायला हवं – मैय्याजींना माणसाची पारख आहे – पत्रिका देऊन आलोय् – बघूया काय होतंय् ते – पत्रिका जुळली तर उत्तमच – तावडतोब श्रीला लिहायला हवं – व्यवस्था करायला हवी––

"दादा, अजून कोटटोपीसुद्धा काढली नाहीत तुम्ही – पाणी केव्हाचं आणून ठेवलंय्" – खरंच – आशू कुणालाही आपलंसं करील – किती गोड बोलते––

स्वयंपाकघरात आशूनं दादांसाठी केव्हाचा पाट मांडून ठेवलाय् – आई अजून स्वयंपाकघरातच काम करतेय् – आणि आईशी काही बोलायचं झालं की दादा स्वयंपाकघरातल्या दारापाशी पाटावर येऊन बसतात – आई आपली सारखी कामातच असते – दादा सुरुवात करतात. आशूचे कान अधीर झाले आहेत – ती समोरच काहीतरी काम काढून बसते – मग पुन्हा बैठकीत जाते – पुन्हा परतते – प्रत्येक शब्द – दादांचा – तिला मन लावून ऐकायचा आहे – त्या प्रत्येक शब्दानं तिला त्या प्रतिमेचा एक–एक कोपरा – भाग स्पष्ट दिसतोय् – हुशार आहे म्हणतात – तोच का परवा सुलभा सांगत होती तो. खूप सांगत होती – तो म्हणे तिचा दूरचा भाचा लागतो. तिच्याबरोबर आपण एकदा त्यांच्या घरी जायला हवं होतं. सुलभानं तर कित्ती वेळा म्हटलं. पण – आम्हांला काय माहिती की – तिला मनाशीच हसू येतं – दादांच्या बोलण्याकडचं तिचं लक्ष क्षणभर उडतं अन् लगेच तिला वाटतं.. चुकलंच आपलं. दादा काहीतरी महत्त्वाचं बोलले असणार इतक्यात – पण दादांना विचारायचं कसं – पुन्हा ती लक्ष देऊन ऐकते – पण आता मुळी 'लिंक'च लागत नाही – मग ती अस्वस्थ होते. उगाचच – आईचं बोलणं मग तिला ऐकूच येत नाही. आई मोठ्यांदा हाक मारते – आणि तिला जाग येते––

सकाळची वेळ – आंघोळ आटोपून दादा पूजेला बसलेले आहेत – आशू वेणी घालतेय्. तिला काहीतरी आठवतं – ती स्वयंपाकघरात जाते – ती आईशी काहीतरी बोललेलं दादांना ऐकू येतं. ते चुटक्या वाजवतात – पूजेत बोलायचं नसतं ना. दादा तरी अस्से आहेत. कधीकधी तर पूजेच्या वेळी रेडिओ मोठ्यानं चालू असला तर पळी वाजवतात पेल्यावर – इतकी चांगली गाणी लागतात. अन् मग आवाज कमी करावा लागतो – आशू देवघरापाशी येते. दादांनी सारं ऐकलंय् – तिला आज क्लासला जायचं नाही. दादा मान हलवतात. आशू खूष आहे – ती आज घरीच राहणार आहे – दादांना सकाळीच देसायांच्याकडे जायचंय्––

––'वक्रतुंड महाकाय' – म्हणत दादा देवघरापाशी येतात – कोटटोपी घालून ते बाहेर जाण्याच्या तयारीत आहेत – आशूकडे एकदा बघतात अन् दादा बाहेर

पडतात – आशू दारात येते – दादा आता वळणापर्यंत गेलेले असतात – आशूल एकदम रेडिओची आठवण येते. ती रेडिओचं स्विच ऑन् करते – थोडयाच वेळा गाण्याच्या लहरींनी सारी बैठकीची खोली भरून जाते. आशूला सध्या काही काम नसतं – मग ती शेजारच्या वहिनींकडे जाते – त्या स्वयंपाकात असतात – म ती परतते – रेडिओचा आवाज मोठा करून देते – लगेच भराभर स्टेशनं बदलायल सुरुवात करते––

दादा आता थोडेसे परिचितांसारखे आतल्या खोलीत जातात. भैय्याजी पुढ्या तल्या भागवतामधून ओव्या वाचताहेत – दादांचा नमस्कार घेऊन ते त्यांना बसायल सांगतात – कुमारच्या वडिलांना – बापूसाहेबांना – हाका मारतात – काही हाक कुमारच्याही नावानं – मोठ्यांदा – दादांना उगाचच वाटतं – इतकी घाई करून बोलावण्याची काही आवश्यकता नाही – मला तर खूप वेळ आहे––

हाका संपतात अन् प्रथम कुमार येतो – दादांना बघून तो भैय्याजींकडे प्रश्नार्थक मुद्रेनं बघतो – भैय्याजींची नजर त्याला चांगली माहिती असते – भैय्याजी त्याल बसायला सांगतात – तो दादांच्या जवळच बसतो – बैठकीवर – पांढरा शुभ्र पैजाम अन् सिल्कचा झब्बा – गोरापान – डाव्या मनगटावर छोटंसं रिस्टवॉच अन् उजव्य बोटात एक खड्याची अंगठी – वा: – वा: – भैय्याजींचा नातू खरंच छान दिसतो हं! – दादा मनाशीच आनंदतात – तितक्यात कुमारचे वडील येतात – कुमार लागलीच उठून उभा राहायला लागतो – भैय्याजी त्याला बसायला सांगतात – दादांच्या डोळ्यांत सारी आतुरता जमा झालीय् – त्यांची नजर खिळते बापूसाहेबांच्या हातातल्या कागदांवर – त्यांपैकी एक – त्यांच्या ओळखीचा – आशूची पत्रिका – ते बघतात – बापूसाहेब बोलायला सुरुवात करतात. बापूसाहेबांचा आवाज जरा करडा आहे – पण तरीही त्यात आपुलकी असते – दादांना बरं वाटतं – ते ऐकत राहतात. मधूनच त्यांची नजर कुमारकडे जाते – तो बोटातल्या अंगठीची चाळवाचाळव करतोय् – शान्त – सुन्दर चेहरा – केसांचा भांग पाडलेला – छान – भैय्याजी शांतपणे बसलेले असतात – ते मधूनच समोरच्या भागवतातल्या ओव्या वाचतात – बापूसाहेब दादांना काही सांगताहेत – अपूर्वाईचे ते शब्द ऐकण्यासाठी दादा आतुर झाले आहेत.

पत्रिका तर जुळतेय् – मुलीला दाखवायला आणायला हरकत नाही – दादांचा चेहरा उजळून निघतो. त्यांना खूप हलकं हलकं वाटतं – इतक्यात कुमार उठून घरात जातो – थोडया वेळातच तो परत येतो – चहाचा ट्रे घेऊन – छानपैकी चहा अन् ट्रेसुद्धा – भैय्याजी बोलत असतात – त्यांनाही नातसून बघायची घाई झालीय् वाटतं – चालायचंच – चहाबरोबर गप्पाही पुन्हा रंगू लागतात – दादांना वाटतं हे सारं जमणार – पण कसं जमायचं – पैशाचं सोंग कसं आणणार – यांनी भलतंच काही मागितलं तर – हजार प्रश्नचिन्हं – पण दादांना त्याची तमा नाही – कुमारला त्यांनी बघितलंय् – आशू तर घरचीच – छान शोभेल – त्याच्या आवडीनिवडींबाबत

भय्याजी बोलत असतात – इतकी साधी राहणी – अन् म्हणूनच कुमारवर भैय्याजींचा अती लोभ – असायचाच – एकुलता एक नातू अन् त्याचं लग्न ठरवायचं – असंच होत असतं – पण दादांची एकुलती नसली तरी – एकच मुलगी लग्नाची राहिलीय् – सारं काही थाटानं झालं पाहिजे – देसायांना सांजेसं – त्यातच आपण शोभून दिसणार आहोत – मग आपण देसायांचे व्याही – म्हणजे त्यांच्याच तोलाचे – अजून बाळचं – राजूचं लग्न व्हायचंय् – बाळचं लग्नसुद्धा एक-दोन वर्षांत उरकून टाकू – राजू अजून लहान आहे – त्याला अवकाश आहे – देसायांच्या व्याह्याशी नातं जोडायला वधणारे बरेच लोक असतील. त्यांच्याचपैकी एखादी – भैय्याजींच्या पसंतीनं –हो – भैय्याजी तर हवेतच – त्यांना एकदा बाळची ओळख करून दिली पाहिजे–बाळला म्हाताऱ्या लोकांचा फार अभिमान – तसा श्री थोडासा व्रात्यच – काय असेल नसेल ते बोलून टाकण्याची सवय त्याला – पण बाळ – अगदी आईच्या वळणावर गेलाय् – तीसुद्धा किती शांत – चाळीस वर्षांवर झालीत संसाराला – पण सारं कसं अगदी काल घडल्यासारखं वाटतं – अनेक अडचणी आल्या – पोरांची आजारपणं – त्यांच्या शाळा – भांडणं – सारंसारं आणि त्यांत बदल्या – वारंवार – पण तिनं कधी शब्दानं त्यांत भर टाकली नाही – घराची काळजी करायची तिनं – किती खस्ता खायच्या – एकटी असायची घरात – पण मला कधी घराची म्हणून काळजी करावी लागली नाही – मग पोरंबाळं शहाणी झाली – पण तिचे कष्ट कमी झाले नाहीत – दादांच्या मनात त्या आनंदानं, समाधानानं, हजार आठवणी उभ्या राहतात – त्यांचा ऊर भरून येतो.

चहाचा ट्रे घेऊन जायला म्हणून कुमार आत येतो तेव्हा त्याच्या बरोबर तबक असतं – छोटंसं – शानदार – दादा समाधानानं पानाच्या शिरा काढू लागतात – बापूसाहेबांचा करडा आवाज आता त्यांना अधिक आपुलकीचा वाटायला लागतो – पानसुपारी घेऊन दादा उठतात – त्यांना वाटतं – भैय्याजींच्या पायांवर डोकं ठेवायला हवं – का कुणास ठाऊक – पण त्यांना भैय्याजी दैवताच्या रूपात दिसू लागतात – या दैवताचं अधिष्ठान आहे देसायांच्या घरात – म्हणून सारं काही ठीक चाललंय् – उत्तम चाललंय्.

दादा परततात – खूप वेळ झाला आहे – आशूला बसून बसून कंटाळा येतो – दादा अजून आले नाहीत – कदाचित् आणखी कुणी भेटलं असेल – कुणास ठाऊक – कदाचित् – अन् तिला एकदम आनंद होतो – ती स्वतःलाच हाका मारते – 'अहो – तिच्या मनात तिच्याच नावाचा विचार येतो – पण ती स्वतःशीच म्हणते – माझं नाव मुळी आशाच राहणार – कारण देसायांना एकच मुलगा आहे – म्हटलं – 'अहो – अहो – मिसेस् आशा देसाई ' – इश्श – आशा की आशू – कोण जाणे बाई – नाहीतर दादा असे आहेत – बोलता बोलता त्यांच्या तोंडात आशाच्याऐवजी 'आशू' येईल अन् – तिला हसायला येतं – म्हणू देत की – आहेच मुळी आमचं नाव – आशू –

असू दे – तुला काय करायचंय् नावाशी –

दादा येतात – तेही आशूला समजत नाही – ती कुठंतरी हरवलेली असते – दादा येतात – अन् एकदम स्वयंपाकघरात जातात – आशूची आई स्वयंपाकात गुंतलेली असते – ती वळून पाहते. त्यांच्या नजरेतच तिला साऱ्या प्रश्नांची उत्तरं मिळतात – आता खूप घाई करावी लागणार आहे – सारं काही करायला हवं – पापड – कुरडया – शेजारच्या दोन-चार बायकांना बोलवायला हवं – धान्य वगैरे सारं आलंच – तिला कुन्दाचं लग्न आठवतं – किती छान केलं होतं सारं – पण तिच्या सासरच्या माणसांनी मुळीच कौतुक केलेलं नव्हतं – आता पुन्हा सारं तसंच करायचं – ही माणसं खूपच चांगली आहेत – कौतुकाचे शब्द या वेळी आपल्याला मिळतीलच – हे सारं श्रेय आपण आशूला द्यायचं – तिच्या संसारात तिला खूप उपयोग होईल त्याचा – नाहीतरी तिला खूप आवड आहे – सारं काही तिला शिकवून घ्यायचं – पोळी करपल्याचा वास येतो – आशूची आई लगबगीनं तवा साफसूफ करते – दुसरी पोळी लाटते –

दादा आत येतात – नेहमीच्या सवयीप्रमाणे दाराजवळच्या पाटावर बसायला जातात – पण आज आशू पाट मांडायला विसरली आहे – ते तिला हाका मारतात – खूप मोठ्यांदा – आशू एकदम भानावर येते – चटपट स्वयंपाकघरात येऊन दादांना पाट मांडून देते – दादा हसतात – मोठ्यानं – आशूला लाजल्यासारखं होतं – दादा आशूची थट्टा करायला म्हणून काहीतरी बोलतात अन् आशूला वाईट वाटतं – दादा म्हणतात – आता आशू देऊन टाकायची – खूप दिवस राहिली – सगळं सांभाळून घेतलं – आता तिला हाक मारणं विसरायला हवं – आता ती कशी येणार पाट मांडून द्यायला – आशूला काळजाचा लचका तोडल्याचा भास होतो – कुठंतरी जाऊन हुंदका द्यावासा वाटतो – पण ती तशीच उभी राहते – तिला काही सुचतच नाही – मग तिला रडू येतं – हुंदका आवरत नाही – ती बैठकीत येते – पलंगावर बसून हुंदके देत राहते – आत दादा अन् आशूच्या आईच्या डोळ्यांत आसवं दाटी करतात – काळजाचा तुकडा तर खरीच – पण अखेर लेकीला पाठवावंच लागतं दुसऱ्याच्या घरी – 'प्रदास्यामि – प्रदास्यामि' – करावंच लागतं – ही रीत आहे – नेहमी हेच होत आलेलं आहे – कुन्दाच्या लग्नाच्या वेळीसुद्धा असंच झालं होतं – आणि तरीही दादांना अन् आईला अश्रू आवरत नाहीत –

घरी इतर कुणीच नसतं. राजू कॉलेजला गेलाय् – जेवणं आटोपतात तीसुद्धा मुक्यानंच – दादांना आता आशूची थट्टा करावीशी वाटत नाही – त्यांना पुढल्या तयारीला लागायचंय् – राजू कॉलेजमधून घरी येतो अन् जेवण आटोपून तो श्री अन बाळला टेलिग्रॅम्स् करायला बाहेर जातो.

दादा मधल्या घरात – देवासमोर चटई पसरून वही काढतात – हिशेब काढायला हवेत – आशूच्या आईला आता उसंत नसते – ओच्याला हात पुसतच ती

बाहेर येते – मग बराच वेळ चर्चा चालते – काहीतरी शेवट होतो अन् दादा जरासे आडवे होतात – आशूला काहीच काम नसतं – मग ती रेडिओकडे लक्ष द्यायचा प्रयत्न करते – पण त्यालाही मेल्याला आजच खूळ लागलेलं असतं – सारखी भावगीतच गातो – आशूची आवडती – पण तिचं लक्ष त्याच्याहीकडे नसतं –

श्रीकान्त, बाळ सारेजण आलेत – आशूला पसन्त केलंय् भैय्याजींनी – कुमार आज येणार आहे – संध्याकाळी – कुठंसं जायचंय् म्हणाला – पण आशूची आई म्हणते – कशाला हवंय् – चांगलं नाही दिसत – जाऊ दे त्यांना जाताहेत तर – श्रीचंही म्हणणं तेच – आई काहीच बोलत नाही – श्रीला थट्टेला विषय मिळतो – आशूला आज आईचं फारच प्रेम येतं – सारखी विचारते – " आई, मी ती आकाशी साडी घेऊ का ग ? की ती पांढरी फुलाफुलांची – ए – सांगतेस का ? " – आई रागावलेली असते. असं लग्नाआधी भटकायला जाणं – एकटं – तिला पसंत नसतं – मग हळूच आशू सांगते अगदी जवळ जाऊन – अग ! त्यांची आईसुद्धा येणाराय् बरोबर – मला एका ठिकाणी जायचंय् – आशूच्या आईचा जीव भांड्यात पडतो – जामानिमा करून आशू तयार होते – तिला देसायांच्याकडे जायचंय् – ती बाळला विचारते – पण बाळ मुळीच ऐकत नाही – हे रे काय ? – चलत नाहीस नं ! – बरंय् वच्चंजी – मग बाळ तयार होतो – एका अटीवर – अच्छा बाबा – मग बघीन तुझ्या अटी – मला उशीर होतोय् –

पत्रिकांची मग झुंबड सुरू होते – बाळचं अक्षर सगळ्यांत सुंदर – मग प्रत्येक


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड
राजगड पुरंदर आग्रा
मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

पत्रिका बाळनंच लिहायची – श्रीनं बाजार आणि राजू – राजू तर आहेच – कामं आपोआपच वाटली जातात – मग कुणाच्या पायांत कुणाचा पायपोस नसतो दिवसभर – रात्री सारीजणं गोळा होतात – श्रीला पसे हवे असतात – ॲडव्हान्स द्यायला हवा – बाळ आपला मश्गुल आहे आपल्या कामात – राजू मात्र आपलं काम करून ढाराढूर झोपलाय् – दादांना मात्र झोप येत नाहीय् – वयोमानामुळं आधीच कमी झालेली झोप आता मुळीच येईनाशी होते – सकाळचे पाच साडेपाच झाले असावेत – आता उठायला हवं – दादा अंगणात येतात – अजून नीटसं उजाडलेलंही नसतं – मग ते फिरायला निघतात – हळूहळू – त्यांना खूप भक्तिगीतं अन् ओव्या पाठ आहेत – हातांत एक परडी घेतली की निघाले दादा –

सकाळचे सहा वाजताहेत – दादांचा आवाज आता मोठ्यानं ऐकू येतो – म्हणजे दादा परत आले आहेत – आता उठायलाच हवं – दादांच्या हाका ऐकू येतात – आशूची झोप चाळवलेली असते – तिला छानछान स्वप्नं पडत असतात – तरी ती उठते – राजू मात्र मुळीच उठत नाही – मग त्याच्या अंगावरची चादर ती ओढून घेते – डोळ्यांच्या कोपऱ्यातून राजू बघतो अन् ओरडतो – पण लगेच आपण झोपलो आहोत हे त्याच्या लक्षात येतं – पण आता उपयोग नाही – चुकीचं प्रायश्चित्त आहे हे लवकर उठणं – पण उठलं पाहिजे –

आईच्या पापड–कुरडया सारं आटोपलेलं असतं – तिथी दोन-तीन दिवसांवर आलेली – देसायांकडचे निरोपावर निरोप येऊ लागतात – आईची अन् दादांची तारांबळ उडते – अन् –

एक संध्याकाळ उजाडते – घरात तर जिकडेतिकडे पाहुण्यांनी ठिय्या दिलेला असतो. आशूची थट्टा करायची प्रत्येकाला लहर आलेली असते – आशूला आज त्या थट्टेची मजा वाटतेय् – त्या प्रत्येक थट्टेला आज ती साजे उत्तर पण देतेय् – प्रत्येकजण खूष होतो – या सगळ्या आनंदाच्या केन्द्रस्थानी आज आशू असते –

आज सायंकाळी सीमान्तपूजन – कन्यानिरीक्षण – सारं काही व्यवस्थित व्हावं म्हणून सगळे झटताहेत – दादांच्या भावना आज खूप भरून आलेल्या असतात – नवं कोरं धोतर–शर्ट – कोट – टोपी – अन् उपरणं – एक उपरं – चौरंगाच्या चारही बाजूंनी मंडळी बसलेली असतात – एका लोडाशी बसलेले भैय्याजी – त्यांच्या शेजारी त्यांच्याच वयाची काही मित्रमंडळी – काही तरुण – पण सर्वांच्या गप्पा रंगलेल्या – भैय्याजींना जास्त बोलवत नाही – पण आज म्हातारा फुललाय् – प्रत्येकाशी खूप बोलताहेत – बाळच्या एका मित्रानं फ्लॅशचा कॅमेरा आणलाय् – भैय्याजींच्या एका भावाविष्कारावर त्याचा कॅमेरा ' क्लिक् ' करतो – अन् भैय्याजी रागावतात – लटकंच – भैय्याजींचा राग तर मुळीच खरा नसतो – पुन्हा ते हसायला लागतात – अरे, माझा काय फोटो काढताय् – पण हा फोटोग्राफ खूपच सुंदर येणार असतो – बाळ खूष झालाय् आपल्या मित्रावर –

गुरुजी मंत्रोच्चार करतात. – 'वक्रतुंड महाकाय–' दादा विचार करतात. – हे शेवटलं कन्यादान. परमेश्वरानं दोन कन्यादानांचं पुण्य आपल्या हाती दिलंय्.– समाधान आहे. – पण निभावणारा तोच आहे. त्यांची अढळ श्रद्धा आहे परमेश्वरावर.

कुमार चौरंगावर बसतो. त्याची यथासांग पूजा केली जाते. टेरिलिनचा नेव्ही ब्लू सूट अन् पांढरा शुभ्र शर्ट तोही टेरिलिनचाच. वर टोपी जरीची. कुमारला पाहताच डोळे स्तिमित होतात. बाळचा मित्र दोन-चारदा 'क्लिक्' मारतो. सीमांतपूजन आटोपतं. बापूसाहेब आसनावर बसतात.

आशूला बोलवायला हवं. कुणीतरी आतपर्यंत आवाज पोचवतं– मैत्रिणींच्या घोळक्यात हळूच ती पुढं येते – मैत्रिणी मागे राहतात. – त्या तशाच राहणार आहेत– यापुढे आशू एकटी जाणार आहे – सासरी – कुमारांच्या सहवासात. आशूची पावलं संथ पडताहेत. तिला चौरंगावर बसायला सांगितलं जातं– आशू बसते.– थोडी अवघडल्यासारखी– बापूसाहेब पूजेला सुरुवात करतात– 'यं ब्रह्मा वरुणेन्द्र रुद्र...' पूजा संपता संपता आशूला सारे कपडे दिले जातात. – आशू आत जाते.– भारल्यासारखी– आता तिचा ताबा तिच्या मैत्रिणींनी घेतलाय्. आशू एकदाच आईकडं बघते–तिचे डोळे काहीतरी अमाप समाधानानं भरलेले– आशू पुन्हा आई-कडे बघण्याचा विचार सोडून देते–मैत्रिणींनी सारं काही व्यवस्थित केलंय्. स्वतःला आरशात बघून ती स्वतःशीच खूष होऊन जाते– बाहेरून हाक येते. – आता जायलाच हवं–

हळूहळू पावलं टाकीत आशू बाहेर येते– सुंदर सुकुमार आशू त्या पेहेरावात खूपच छान दिसते– कॅमेऱ्याची 'क्लिक्' होते – आशू क्षणभर थबकते– कोण बरं हा– अच्छा. बाळचा मित्र. मग हरकत नाही– म्हणजे आपल्याकडलाच आहे. पण पुन्हा एकदा फ्लॅश उडतो. हा त्यांच्याकडचा वाटतं... असू द्या. हे सगळे सोपस्कार व्हायचेच– आता तर सुरुवात आहे – होऊन जाऊ द्या – हळूच ती चौरंगावर बसते– पुन्हा मघाच्यासारखीच– पण थोडी परिचित् – किंचित्.–

कन्यानिरीक्षण आटोपतं अन् पदरात बांधलेली ओटी घेऊन आशू परत निघते – छे– ही ओटी घेऊन चौरंगावरून उठायचं अन् उतरायचं म्हणजे कमालच– हं– चला आता हळूहळू. खरं म्हणजे कपाळावरचं कुंकू पसरलंय्. सासूबाईंनी अगदी हलक्या हातानं लावलं होतं– पण–पण दोन्ही हात गुंतले आहेत– नजरसुद्धा – पण कुमार कुठं दिसत नाहीत – भैय्याजी तर म्हणाले होते, 'त्याला समोरच उभा करीन म्हणून –' कन्यानिरीक्षणाला म्हणे नवऱ्या मुलानं हजर राहायचं नसतं अन् सीमांतपूजनाला म्हणे मुलीनं हजर राहायचं नसतं...' म्हणूनच भैय्याजी म्हणाले होते– जाताजाता ती एकदा पुन्हा वळून बघण्याचा प्रयत्न करते– अन् काय. कुमार तर तिथंच असतो – अगदी भैय्याजींच्या जवळ म्हणजे कमाल आहे बाई – पावलं

लगबगीनं पडायला लागतात. समोर मैत्रिणी आहेत हे विसरून आशा घाडकन् त्यांच्यावर आदळते –त्यांचं मात्र पूर्ण लक्ष असतं– पण आशू त्यांच्यावरच उसळते. लगेच तिला आपली चूक उमगते अन् ती लाजते – मैत्रिणींच्या हसण्यात ती स्वतःला हरवून बसते.–

रात्रीचे अगदी बारावर दोन वाजल्यानंतर आईचं अन् मावशीचं काम आटोपायला होतं... मग त्यांच्या गोष्टी चालतात. आशूला झोप येत असते तरी ती अर्धवट झोपेचं सोंग करून सारं ऐकत असते – केव्हातरी तिला झोप लागते –

सकाळचा मुहूर्त म्हणजे घाईच होते – लवकर उठायला हवं – आशूला आज पहिला नंबर मिळतो प्रत्येक ठिकाणी – अन् मग घटका भरत जाते. – गुरुजींची तयारी आटोपलीय् बरं का – चला – तिची रवानगी केली जाते – एका कोपऱ्यात – तिथं गौरीहराची बोळकी मांडली आहेत – मध्ये गौरीहर – आशूजवळ कुणी असलं नसलं तरी तिला वाटतं आपण एकटयाच आहोत – या मंदिरात जिथं आपण पूजा करतोय् – ही परीक्षा आहे आपली – एकटीची – खरं म्हणजे तिला बाहेर जायचं असतं – तिच्या खूप मैत्रिणी येणाराहेत लग्नाला. कोणकोण आलंय् ते बघावंसं वाटतं – पण ही पूजा – मनोभावानं केलीच पाहिजे – मन अगदी एकाग्र करायचे तिचे प्रयत्न चालतात – बाहेर लाऊडस्पीकरचा आवाज आता स्पष्ट ऐकू येतो – कुठली बरं ही रेकॉर्ड – सनई लावलीय् वाटतं – दादांनी लाऊडस्पीकरवाल्याला अगोदरच बजावलंय् म्हणून बरं – नाहीतर मेले काहीही वाजवतात – अन् तिलाच हसू येतं – दादांची बाहेर लगबग चालू असते – राजूला करमत नाही – दोन-चार वेळा तो आत येऊन जातो – पण आशू त्याच्याशी बोलतच नाही – त्याला आता जाणीव झालेली असते – आशू दुसऱ्याच्या घरी जाणार आहे – त्याला आशूताईला खूप गोष्टी सांगायच्या असतात – परीक्षेच्या अभ्यासामुळं बऱ्याच दिवसांत तो तो आशूशी बोललेला नसतो – मोकळेपणानं – अन् आज त्याला खूप खूप बोलायचं असतं – तर आशू ही अडकलेली – त्याच्या चकरा थांबत नाहीत – आशूला त्याची तगमग जाणवते – एक प्रतिसाद तिच्याही उरात उठतो – अन् कुणीतरी आत येतं – श्री अन् बाळ मंडळींना बोलवायला निघालेत – सहजगत्या छोटसं मनगटी घड्याळ बघितलं जातं – हे घड्याळ श्रीनं दिलेलं – त्याच्या पहिल्या पगारातलं – वेळ झालेली असते – ती पूजेकडे लक्ष लावू लागते – पण एकाग्रता येत नाही – बॅन्डचा आवाज वाढत जातो – अन् वरात मांडवाच्या दाराशी येते – आले वाटतं – उरातली धडधड वाढायला सुरुवात होते –

दादा समोर यजमानांचं, व्याह्यांचं स्वागत करतात – श्री अन् बाळ अजूनही बाहेर उभे – कुमारचे वडील त्याला सोडून बैठकीकडे जातात – त्यांच्याकडले गुरुजी त्याला घेऊन जातात – साधंसंच पण कागदाचं रंगीबेरंगी छोटंसं छत–

त्याच्याखाली दोन पाट मांडलेले असतात — नक्षीदार — समोरासमोर — कुमार खूष होतो — रंगांची संगती फारच सुंदर जमवलेली असते — वालगोपाल उगीचच गर्दी करतात — हातात श्रीफल घेऊन अवघडलेला कुमार एकटाच उभा असतो — गुरुजी आता घाई करतात — कुमार घड्याळाकडं बघतो — वीस मिनिटं उरलीयत्— धडधड वाढल्याचा मास होतो — लाऊडस्पीकरवर आता सनई अन् व्हायोलिनची जुगलबंदी लावलेली असते — सनई अन् व्हायोलिन — मंद मंद सूर वातावरणात भिनू लागतात अन् त्याचबरोबर भिनतात सुवास — मंद — मधुर — अत्तरगुलाब अन् कोरे करकरीत कपडे यांचे — शिवाय पावडर-स्नो — कुमार आजूबाजूला बघतो —मागं त्याची बहीण उभी असते —अगदी त्याच्यासारखी सुंदर — गोरीपान — लग्नानं तिला छानपैकी झिलई आलेली असते — छोटा विक्रम तिच्या पायांत घुटमळतोय् वाटतं — मामाचं लगीन — किंवा असल्याच काहीतरी विचारात कुमार गुरफटतो — गुरुजी त्याला हाका मारतात — तो पाटावर येऊन उभा राहतो —सनई वाल्याची सनई चालूच असते अन् आशू तिच्या मैत्रिणींच्या पुढे हळूहळू पदक्षेप करीत येते — कुमारचं लक्ष जातं — शाल किती सुंदर — काल तर नव्हतीच कुठे — कुणी दिली — केव्हा घेतली — विचारायला हवं — कुमारला वाटतं — पण पण बघायचं तरी कसं आशूकडे — तो इकडे तिकडे बघतो — सगळ्यांच्या नजरा त्याच्याकडे — तो मान वर करून न बघता डोळ्यांच्या कोपऱ्यातून बघायला सुरुवात करतो — गुरुजींनी एक शाल धरलीय् मध्ये — त्याला आशूचा चेहरा दिसत नाही — सनईचा आवाज थांबतो — गुरुजी आपल्या आवाजांत मंगलाष्टकांना सुरुवात करतात —

" — शुभमंगल सावधान — "

उरातली धडधड तर आता आणखी वाढतेय् — काय होतंय् कुणास ठाऊक — आशू खाली बघत राहते — अक्षता येऊन डोक्यावर — तोंडावर आदळतात — हातांतल्या हाराची फुलं किती सुंदर आहेत नाही — अन् सुवास — आ ऽऽ हा तिला ' फ्रेश ' वाटतं — गुरुजींचं सुरू असतं —

" सरस्वती भगवती निःशेष जाड्या पहा —

वधुवर्यो शुभमंगल — सावधान — सावधान — "

अक्षतांची आणखी एक मारपीट संपते — मैत्रिणी अवतीभवती उभ्या — कुमार हळूच बघतो — अजून चार मिनिटं — घड्याळ सकाळीच लावून घेतलंय् — गुरुजींचंसुद्धा — फरक पडायचा नाही — गुरुजी फार चोख आहेत — हातातल्या हारात थोडासा गुंता होतो तोसुद्धा कुमारला नकोसा वाटतो — आशूला आपल्या शालीची काळजी पडते — पण तिला आठवतं — समोरून पिन लावलीय् — म्हणजे हार घालताना शाल पडायची नाही —

गुरुजींची मंगलाष्टकं संपायच्या अगोदर दोन-चारदां अक्षतांचा वर्षाव होतो — आणि गुरुजी सुरू करतात.

" तदेव लग्नं सुदिनं तदेव--"

श्लोक संपतो अन् गुरुजी शाल दूर करतात — प्रथम आशूची पाळी — गुरुजींना सांगावं लागतं — आशूला गंमत वाटते — आशू धीटपणानं आता वर बघते — कुमारचा चेहरा गंभीर — तिला हसू येतं — हार घालताना टोपी पडायला नको — मग ती हात अगदी वर करून हार घालते — आता कुमार — पहिल्यानं तो हारातला गुंता सोडवतो अन् हळूच आशाच्या गळ्यात हार घालतो — पण कलावतूचा गुंता अजून निघालेला नसतो — कॅमेरा ' क्लिक् ' करतो अन् केसांवरल्या कलावतूसकट आशूचा फोटो घेतला जातो — मग ती गुंता सोडवते — तिच्या मैत्रिणींना उत्साह चढतो — त्याही मग तिच्या केसांमधल्या अक्षता काढू लागतात.

गुरुजी दोघांनाही बसायला सांगतात — सु-लग्न लावायला सुरुवात होते — पहिला मान दादांचा — ते तिथंच जवळपास असतात — त्यांना कुणीतरी बोलावतं — बाळ चटकन् त्यांच्या हातांत एक-दोन नोटा कोंबतो — ते बघतात — एक दहाची अन् एकची नोट — गुरुजींच्या हातातल्या अक्षता घेतात अन् तबकांत पैसे टाकतात — डोळ्यातल्या अश्रूंना बाळसं आल्यासारखं होतं — तिथून निघतात ते सरळ मांडवाच्या दाराशी — येणारे जाणारे — पानांनी रंगलेल्या ओठांनी अन् फुलझडया घेतलेल्या हातांनी — नमस्कार करतात — ओळखीचे लोक — जवळचे — काही बोलत राहतात — श्री दारात उभा आहे — तो प्रत्येकाला नमस्कार करतो — घेतो — बाळ बोहोल्याजवळ उभाय् — क्वचित त्याची नजर आशूच्या मैत्रिणींकडे जाते — मीरा, सुनीता अन् शालू — तिघींपैकी सुनीता त्याच्याचकडे बघत असते — तो लगेच दुसरीकडे बघायला लागतो — पोरासोरांची खूपच गर्दी उडालीय् — प्रत्येकजण सु-लग्न लावायला म्हणून येतो अन् धाडदिशी डोक्यावर डोकं आदळतं — मुंडावळीचे मोती जास्तच खुपायला लागतात. कपाळ दुखायला लागलंय् — आत कुठे कुमारला हसू येतं — त्याचे मित्र जागा रिकामी व्हायची वाट पाहत उभे असतात — बापरे ! — अजून हे पठ्ठे आहेतच का ? — बरंय् — आलिया भोगासी — आणखी एकदा कपाळ आदळलं जातं — ओळखीचे — विनओळखीचे अनेक चेहरे समोर येतात — दोन-चार अक्षता ओवाळून घंघाळात टाकल्या जातात अन् धाड्दिशी डोकं आदळलं जातं — क्वचित् एखादा नमस्कार करून माघारी वळतो अन् एखादा कुमारचा हात आशूच्या हातात देतो — कुमारच्या हाताला स्पर्श होतो — पहिल्या स्पर्शानं शहारतात रोमरोम — नंतर अनेकजण पुनरावृत्ती करतात आणि नकोसं वाटतं — एकदाचं सु-लग्न लावणं आटोपतं अन् दोघांनाही कोचावर आणून बसवलं जातं — येणाऱ्यांच्या हातांत प्रेझेन्टस् असतात — गुलाबी — निळ्या कागदांमध्ये गुंडाळलेली — राजू कोचाच्या हातावर टेकतो — तिकडून कुमारचा एक मित्र — काही मित्रांची व मैत्रिणींची

ओळख करून दिली जाते – औपचारिक – अनेक आमंत्रणं मिळतात – चहाला येण्याची – सहज – लक्षात मात्र फारच थोडी राहतात – उठून दिसणारी – अघळ-पघळ – पण तीही बोटांवर मोजण्याइतकी.

आणखी एक-दीड तास जातो – पाहुणेमंडळी पांगायला लागतात – गुरुजींची होमहवनाची तयारी झालेली असते – कुमारचे काही मित्र येऊन गप्पा मारायला लागतात – आशूला कुणीतरी आत बोलावून नेतं – होमहवनाला सुरुवात होते – आशूच्या अंगावर आता भरजरी शालू असतो – हातांत बांगड्या – दोन मोत्यांच्या अन् दोन सोन्याच्या – कुमारच्या गळ्यात बारीकशी चेन – त्यानं पीतांबर नेसलाय् – सुरुवात होते – हं – म्हणा – 'मम आत्मन: श्रुतिस्मृतिपुराणोक्त फलप्राप्त्यर्थं –' गुरुजी सांगतात – हाताला हात लावा – आता यजमानकृत्यं करावी लागणार – तेव्हा अर्धांगी बरोबर हवीच – होमहवन संपताना सप्तपदीला सुरुवात – मंत्रांच्या तालावर नकळत कुमार अन् आशूची पावलं सप्तपदीला सुरुवात करतात – एक – दोन – तीन – सात अन् आशूला आठवतं – 'आठवे पाऊल प्रीतमंदिरी – अर्धांगी मी सगुण साजिरी – सप्तपदी रे' – तिला वाटतं सगळीकडे हेच सूर घुमताहेत – ती थोडी मागे राहते – पदराला ओढ लागते – विसरलेच की – पदराला गाठ बांधलीय् – गाठ सोडायची म्हणजे नाव घ्यायला हवं – दोघींनाही – गाठ सोडणारीनंसुद्धा नाव घेतलं पाहिजे – साळकाया म्हाळकाया आग्रह करतात – कुमारची वहीण छानसं नाव घेऊन गाठ सोडते – आता आशूची पाळी – तिला खूप उखाणे पाठ असतात – पण वेळेवर मात्र एकसुद्धा आठवत नाही – सगळीजणं घाई करतात – मग ती त्यांतलाच एक वाऱ्यावर सोडून देते – सारीजणं खूष होतात – तिच्या लक्षात येतं – सासूबाईंच्या चेहऱ्यावर सुनेच्या कौतुकाचं हास्य चमकत असतं –

पंगत बसायला अजून वेळ असतो – मंडळी घरी जानोशावर गेलेली असतात – कुमारला आता मांडवातच राहावं लागणार – दोन-चार पोरं सोबतीला असतातच – सगळे आशूकडचे मग त्याला विचार पडतो – मध्येच तो हातांतली पवित्रकं चाळवतो – इतक्यात कुणीसं येतं – मग आशूला बोलावून घेतलं जातं – दोघांनाही अहेर होतो – आशू आत परतते – कुमारचा मित्र येतो – त्याला प्रेझेन्ट द्यायचंय् – काय द्यावं – ? – त्याला त्याच्या वहिनींचा विचार घ्यायचाय् – मग कुणा तरी पोराला पिटाळलं जातं – आत – तो आशूला निरोप सांगतो – त्यांनी विचारलंय् प्रेझेन्ट काय हवंय् म्हणून – आशू काहीच बोलत नाही – कुन्दा मग त्यांना पिटाळून लावते – पुन्हा निरोप येतो – लोटी पाहिजे की ताट ते विचारलंय्–ती उगाचच लोटी म्हणून सांगते – निरोप परत जातो – आशूच्या मैत्रिणी तिला उसन्त घेऊ देत नाहीत –

दादा मांडवात एका लोडाशी टेकून बसतात. चला लग्न तर लागलं – आता

पंक्तीची व्यवस्था व्हायला हवी – बिछायत उचलली जाते – अंगणात पाणी मारलं जातं – पाट मांडले जातात – ऊन चढत असतं – बाहेरचे भिकारी उन्हाच्या कल्लोळात आपला सूर बेमालूम मिसळून देतात – मांडवाच्या दाराला पूर्ण पडदा लावला जातो – आत उकडायला होतं – एखादा कुणीतरी त्या भिकाऱ्यांवर खेकसतो – वरून सूर्य आणखी तापतो – ताटं मांडली जातात – रांगोळ्या काढल्या जातात – रंगीबेरंगी – कुमारच्या पानाभोवती छान वेलबुट्टी कापलेला कार्डबोर्ड लावलाय् – त्याच्यावर मोती ओवलेले आहेत. – अगदी पुढे दोन मयुराकृती – त्याही कार्डबोर्डच्या – निळा, हिरवा कलावतूचा कागद लावलेल्या – एकमेकांकडे पाहणाऱ्या – कुमारच्या ताटासाठी अडणी ठेवली जाते – ताट जरा उंच होतं – ओळीच्या एका टोकाला त्याचा पाट मांडलेला असतो – काटकोनात आणखी एक पाट – रंगीबेरंगी नक्षीदार – इथं आशा बसणार असते – मैय्याजींचं पान कुमारच्या समोरच्या ओळीत असतं – बाजूला बापूसाहेब – कुमारच्या बाजूला त्याचा मित्र बसायचा – त्याच्या गळ्यात अजूनही कॅमेरा लटकावलेला असतो. मंडळींना बोलावणं जातं – श्रीच्या मनांत येतं – कदाचित् आता काही मागतील – जेवायला येणार नाहीत – अडून बसतील – मग मनस्ताप – पण तसलं काहीच घडत नाही – स्वत: बापूसाहेब येतात – पानं बघतात. मंडळींचा अंदाज घेतात – परततात –

मंडळी येऊ लागतात – कुमारनं मैय्याजींचा हात धरलाय् – मैय्याजींना चालवत नाही – म्हणून – कोरं धोतर अन् टेरिलीनचा शर्ट – या वेळी बदामी रंगाचा – बाह्या वर सारलेल्या – डाव्या मनगटाला रिस्टवॉच अन् उजव्या मनगटावर बंधन बांधलेलं असतं –

दारापाशी पाट ठेवला जातो – बादल्या भरभरून पाणी आणलं जातं – पाय धुतले जातात – मांडवात थोडी गडबड उडते – बापूसाहेब प्रत्येकाला बसायला सांगतात – हेही आधीच ठरवलंय् बापूसाहेबांनी – नाहीतर नवऱ्या मुलाजवळ कुणीही बसतं – तिथं त्याचा मित्रच हवा – म्हणजे गप्पा रंगतात – अवघडल्यासारखं वाटत नाही – सारीजणं जागा घेतात – मामुली गप्पांना सुरुवात होते – आशूच्या घरची माणसं अन् बायका भराभर वाढायला निघतात – एका रांगेत – एका ओळीनं सारं वाटप आटोपतं – दादा स्वत: एकदा फेरी मारतात – काही राहिलंसाहिलं बघून घेतात – तुपाची लोटी घेऊन स्वत: आशूची आई येते. – लगबगीमुळं – घाईमुळं – कामाच्या ताणामुळं चेहरा कोमेजलेला असतो – सर्वांना तूप वाढलं जातं – गुरुजी त्रिसुपर्णाला प्रारंभ करतात – त्रिसुपर्ण संपतं अन् –

" यन्तुनो देव वर्षतु पर्जन्या: – "

इत्यादी मंत्रांनी पात्रप्रोक्षण केलं जातं – शुद्धता – शुचिता – मिळण्यासाठी — ' पार्वती पदं ' – चा घोष होतो अन् मंडळी जेवायला सुरुवात करतात – पानात – इतके सारे पदार्थ वाढलेले असतात – कुठून सुरुवात करावी ? – कुमारला

प्रश्न पडतो – तो भात कालवतो – मंडळींच्या गप्पा सुरू झालेल्या असतातच – त्या आता रंगात येतात – वाढणाऱ्या बायका पंक्तीतून भराराा फेऱ्या मारू लागतात – वाळजवळ पाण्याचा तांब्या असतो – वाढणाऱ्या बायकांजवळच्या ताटांपासून बचाव करीत तो पाणी देत असतो – पाण्याच्या पिपांत सकाळीच बर्फाची लादी आणून टाकलेली असते – पाणी अगदी थंडगार – बर्फागत झालेलं असतं – मंडळी खूष होतात – बाळला धन्यवाद देतात.

दादा आशूला बोलवायला पाठवतात – ती येते – बरोबर पुन्हा मैत्रिणी – – साध्याच नव्या कोऱ्या साडीत आशूचं आणखी एक रूप उमलतं – कुमारच्या चेहऱ्यावर अनुरागाचं हास्य – आशू बसते – कुमार आपला जेवत असतो – त्याचा मित्र त्याला खुणावतो – मंडळींचे हात जिथल्या तिथं थांबतात – कुमार नाव घेतो– – 'आशा' – लाडवाचा घास कोंबला जातो – दुसऱ्याच्या हातांनी जेवायची लहानपणची सवय आता तुटलेली असते – आशूला स्वतःचा हात तोंडाला न्यावा लागतो – ती हळूहळू लाडू संपवते – मंडळींना नाव ऐकू आलेलं नसतं – पुन्हा आग्रह केला जातो – कुमार थोडा धीटपणाचा आव आणून मोठ्यानं नाव घेतो – 'आशू' – या वेळचा घास नीट भरवला जातो – सारीजणं हसायला लागतात – पण आशूच्या तोंडातला घास सगळा खारट – तिचं तोंड खारट होऊन जातं – कुमारनं दुसऱ्या घासात भरपूर मीठ घातलेलं असतं – मुद्दाम – आशू पाण्याचा घोट घेते – पण खारटपणा जात नाही – आशूची पाळी येते – तीसुद्धा लाडवाचाच घास देते – उखाण्यात नाव घेऊन – सगळ्यांना खूप आवडतं – पुन्हा एकदा तिला आग्रह केला जातो – आशू खाली मान घालून बसते – कुमारचा मित्र अजून जेवायला बसलेलाच नसतो. त्यानं दोन-चार स्नॅप्स घेतलेले असतात – आता तो जेवायला बसतो – कुमार त्याला आग्रह करतो – दादा आता पंक्तीमधून चक्कर घालतात – ' स्वस्थ होऊ द्या – ' म्हणून हात जोडून विनंती करतात – मग आत स्वयंपाकखोलीत जातात – आशूची आई लाडूचं पातेलं घेऊन येते – मग दादा परततात – प्रत्येकाला आग्रहाचा लाडू वाढला जातो–नंतर आशू येते पुन्हा,लाडू घेऊन – खरं म्हणजे आता अगदी अगदी ' रेट ' झालंय – पण मोतीचुराचा मोह सोडवत नाही–जेवणं आटोपतात–पानसुपारी घेऊन मंडळी परततात – कुमारही परतण्याचा विचारकरतो – पण बाळ त्याला थांबवून घेतो – आशूकडल्या काही जणांना अजून अहेर करायचा असतो – मग कुमारची आवडनिवड विचारली जाते. बरीचशी प्रेझेन्टस येतात – कुमार ती सगळी आशूच्या स्वाधीन करतो – बाळशी गप्पा मारतो मोकळेपणानं.

संध्याकाळपर्यंत जेवणाचा घोळ चालतो – अन् – वरातीची तयारी होते – आशूचा जामानिमा नीट चढवला जातो – वरातीची व्यवस्था वरपक्षाकडे असते – रंगीबेरंगी दिव्यांची हंड्याझुंबरं झगमगत असतात – एका उघड्या मोटारीत दिव्यांची एक मेहिरप तयार केलेली असते.

आशू आता बावरलेली असते – तिची नजर भिरभिर सारखी फिरत राहते – – घरातली प्रत्येक वस्तूसुद्धा तिला गदगदल्याचा भास होतो – आवंढा गिळण्याचा ती प्रयत्न करते – पण खूप खूप दाटून आल्यासारखं वाटतं – जवळ मावशी उभ्या असतात – त्यांचं लक्ष असतं आशूकडे – बॅन्डवाले येतात अन् कुमारकडली मंडळी आत येतात – कुमारसकट.

दोघं मिळून नमस्काराला सुरुवात करतात – तिच्या अंतरातली माया अश्रूंच्या पुरात वाहवत येते – पदर ओला होतो – डोळ्यांच्या कडांवर लालसर झाक – ओठांतून शब्द फुटत नाहीत – आशीर्वादासाठी हात वर केला जातो – थरथर कापत हात आशूच्या डोक्यावर क्षणभर विसावतो – अन आशूची घट्ट घट्ट मिठी पडते – आशूच्या डोळ्यांतून चाललेले पूर वाहत वाहत गालांवरून ओघळतात – कुमारच्या डोळ्यांत नकळत आसवं जमा होतात – पण त्याला ते तसेच ओघळू द्यावेसे वाटतात – त्याला कल्पना आहे – आशूची आई स्वत:ला सावरायचा प्रयत्न करते – तिला जमत नाही – समजवायचं तरी कुणी – आशू अन् कुमार मावशीला नमस्कार करतात – पुन्हा आवृत्ती निघते – अश्रूंचा पुन्हा एकदा लोट येतो.

दादा बाहेर बैठकीत उभे असतात – शून्य – आढयाकडे बघत – आशू अन् कुमार नमस्कार करतात – थरथरत्या हातांनी काही दिलं जातं – कुमारला – हा जावयाचा मान आहे नमस्काराचा –

आशू कशीबशी स्वत:ला सावरते – श्री अन बाळ – कसा निरोप घ्यायचा – – तिच्या तोंडातून अस्पष्ट शब्द बाहेर पडतात – " येते हं दादा " – हुंदका अनावर होतोय – तिघांच्याही मनावरचा ताबा सुटतो – " खूप त्रास दिला तुला दादा – आता रागावू नकोस हं – सारं काही विसरून जा – " कसेबसे शब्द संपतात – हृदयातलं रक्त गोठतं – अन् त्याचा एकेक लचका तुटत असतो.

कुमार पुढे होतो. पायऱ्या उतरून तीही चालू लागते. – सजवलेल्या मोटारीत दोघं बसतात – बॅंडवाले चालू लागतात – तशी मोटारही पुढं सरकते – आशू मागे वळून बघते – पुन्हा एक पूर – झालं – संपलं हे घर आता – आता नवीन घर – नवीन माणसं – इतकी वर्षे या घरात – या माणसांमध्ये काढलीत – प्रत्येकानं किती जीव लावला आपल्याला – अन् आज सारं सारं सोडून निघालो आपण –

दादा हळूहळू वरातीमागं निघतात – पायांतलं त्राण गेल्यासारखं होतं – पावलं पडायची नाकारतात – आशू निघाली – आता ती देसायांची सून – भैय्याजींच्या एकुलत्या एका नातवाची – कुमारची बायको – भैय्याजी तिला सांभाळून घेतील – कुमारला तर आशू आवडलीच आहे – अन् आहेही हुशार आशू – साऱ्या माणसांना ती आपलंसं करील – सारं काही व्यवस्थित होईल – दादा आपल्याच विचारांत गढून जातात – आशूला परत बोलवणं करायला हवं – जावईबुवांना – कुमारलासुद्धा – बोलावलं पाहिजे – सत्यनारायण करायला हवा.–

दादांना खूप हलकं वाटतंय् – एका आगळ्या समाधानाची अपूर्वाई त्यांना आज जाणवतेय् – आशूचं लग्न लागलं – थाटामाटानं – कुठं गडबडगोंधळ नाही – रुसवेफुगवे – अडवणूक – काही काही नाही–सारं कसं अगदी छान पार पडलं – त्यांना वाटतं – बापूसाहेबांविषयी आपलं मत आता बदलायलाच हवं आहे – करड्या आवाजाच्या बापूसाहेबाचं मन मात्र – स्वच्छ – कोमल – निर्मळ – दादांचं पाऊल अडखळतं – देसायांचं घर जवळ



आलंय् – रोषणाई केलेला बंगला छानदार दिसतो – इथं आशू राहणार – हे आता आशूचं घर – इथं यापुढे इतक्यात यायचं नाही दादांना – आशूच्या आईलासुद्धा – आशूचं पहिलं बाळ बघायला त्यांनी इथं यायचं आहे – त्याच्या आधी नाही –

दादा आता थकले आहेत – खूप झालं – कष्ट कष्ट – आणि आता समाधानाचे दिवस आलेत – दोन कलमा – स्वत:जवळच्या दादांनी दुसऱ्यांना देऊन टाकल्या आहेत – कायमच्या – त्यांचे बागबगीचे या कलमांनी सुशोभित – शोभिवंत होणार आहेत – या कलमा पुढे वृक्षांचं रूप घेतील – मोहरतील – अन् फुलाफळांनी हा बाग डवरून येईल – आपल्याजवळ आता फक्त आंब्याची झाडं राहिलीयत् – बाळ अन् राजू – आपलाही बाग सुंदर दिसला पाहिजे – राहिला पाहिजे – बाळचं लग्न करायला हवंय् – एक कलम हवीय् आता आपल्या बागेला.–

भैय्याजींशी बोलावंसं वाटतं – त्यांच्या कानावर घालून द्यावं – देसायांच्या घरातल्या दैवताचं अधिष्ठान आपल्याही संसाराला लाभावं अशी इच्छा असते – याचसाठी लग्नं होतात – हरवलेली दैवतं – एकमेकांना आधार द्यायला उभी होत असतात – भैय्याजींचा वरदहस्त आशूच्या लग्नानं दादांना लाभलेला आहे – वडीलकीच्या हक्कानं भैय्याजी त्यांना बाळच्या लग्नाबद्दल सल्ला देणार आहेत – दादांची काळजी करणारे वडील त्यांना मिळाले आहेत – दादांची काळजी आता भैय्याजी करणारायत – दादा आता मोकळे आहेत – समाधानी आहेत.–

●


# आणि ड्रॅगन जागा झाला

उत्तरार्ध : लेखांक चवथा

अरुण साधू

तातू नदी पार करून लाल सैन्याने आपल्या मार्गातील मोठाच अडथळा दूर सारला होता. आता ते स्झेचुआनच्या पश्चिम भागात उतरले होते. चँग-कै-शेकचे सैन्य येथे तोवर दिसू शकले नव्हते. पण निसर्गाने अद्याप पाठ सोडली नव्हती. दुसरा एक प्रचंड अडथळा त्यांच्यासमोर खडा होता. तो म्हणजे सतत बर्फाच्छादित असलेल्या १६,००० फुटांपेक्षाही उंच पर्वतशिखरांच्या रांगा. स्झेचुआन आणि तिबेट यांची सरहद्द एकमेकांना लागूनच आहे.

तातू नदी ओलांडताच लाल सैन्याला या सात प्रचंड रांगा एकामागून एक ओलांडाव्या लागल्या. ते उन्हाळ्याचे दिवस होते. पर्वत चढायला आरंभ करण्यापूर्वी त्यांना भयानक उष्णतेला तोंड द्यावे लागत होते. आता थंडगार बोचरे वारे चावे घेऊ लागले होते. त्यांच्याजवळचे कपडे अगदीच पातळ आणि कापडी होते. त्या भयानक थंडीने गोठून कित्येक सैनिक मृत्युमुखी पडले. उंची फार असल्याने हवा विरळ होती. त्यामुळे अनेकांना हृदयविकार जडला. हृदयविकाराने जेरीला येऊन जनरल लीन पियाओ हा तर जवळ जवळ मृत्युच्या दाराशी टेकला होता. माओ-त्से-तुंग अतिशय अशक्त झाला होता. तो आजारीच असायचा. त्याला उचलून न्यावे लागत होते. काही काही खिंडींमधून या सैन्याला स्वतःहूनच अगदी नवीन असे रस्ते शोधावे लागत होते. उन्हाळ्यामुळे बर्फ वितळत होता आणि ठिकठिकाणच्या खिंडींमधून पाण्याचे लोंढेच्या लोंढे वाहत जात होते. बर्फ निसरडे झाले होते.



या पर्वत शिखरांच्या रांगा ओलांडताना थंडीने गोठून, कड्यांवरून कोसळून अक्षरश: हजारो सैनिक आणि कित्येक जनावरे दगावली. या रांगा ओलांडून लाल सैन्य जेव्हा स्झेचुआनच्या वायव्य भागात पोचले तेव्हा त्याची संख्या ४५,००० पर्यंत उतरली होती. 'लाँग मार्च'ला सुरुवात होताना ही संख्या १ लाख होती. शिवाय सुमारे तीस हजार नवे तरुण वाटेत भरती झाले होते. वाटेतच लाल सैन्यातील सुमारे वीस हजार प्रचारकांना माओने ठिकठिकाणी पेरून ठेवले होते. पण तरीसुद्धा ही हानी भयंकर होती. मनोधैर्य हरवणारी होती. आणि तरीही त्याची पर्वा न करता लाल सैन्य शेन्सी प्रांताच्या रोखाने पुढे चाललेच होते. कारण पुढे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हत.

## जागोजाग लाल ठाणी आणि तळ

वायव्य स्झेचुआन प्रांतात माओ आणि चुह-तेह यांच्या लाल सैन्याला चांग-कु-ताओचे लाल सैन्य येऊन मिळाले. माओच्या सोव्हिएट तळाच्या बरोबरीनेच चांग-कु-ताओने हुपेई आणि अन्हवे प्रांतांच्या सीमांवर आपला सोव्हिएट तळ स्थापन केला होता. १९३३ मध्ये चांगने आपल्या लाल सैन्यासह तो तळ उठवून स्झेचुआन-मध्ये प्रयाण केले होते. त्याने, स्झेचुआनचा घेतलेला मार्ग सुकर होता. आणि त्याच्या पाठलागावर चँग-कै-शेक नव्हता. चांगने आपले सोव्हिएट नंतर स्झेचु-आनच्या वायव्य भागात स्थापन केले होते. तो माओच्या आणि चुह-तेहच्या लाल सैन्याला मिळाला तेव्हा त्याची सैन्यसंख्या सुमारे पन्नास हजार होती...

हुनान प्रांताच्या उत्तर विभागात माओच्या सोव्हिएटबरोबर जनरल हो-लुंगने स्थापन केलेले सोव्हिएटही तिकडे अद्याप तग धरून होते. चँग-कै-शेकचे सैन्य या सोव्हिएटला अद्याप उखडू शकले नव्हते. १९३५ च्या नोव्हेंबरनंतर माओ-त्से-तुंगकडून सूचना आल्यानंतरच हो-लुंगने आपले सोव्हिएट उठवून तेथील लाल सैन्य स्झेचुआन प्रांतात नेले.

माओ आणि चुह-तेहच्या आधिपत्याखालील लाल सैन्य अशा या ऐतिहासिक 'लाँग मार्च'वर असताना चीनमध्ये इतरत्रही ठिकठिकाणी छोटचा मोठचा लाल सेना आणि सोव्हिएट तळ हालचाल करीत होते. पण चँग-कै-शेकने आपली बहुतेक शक्ती माओच्या लाल सैन्यावर एकवटली होती. आणि म्हणूनच माओच्या लाल सैन्याला महत्त्व प्राप्त झाले होते.

'लाँग मार्च'वर असताना माओच्या लाल सैन्याने वाटेत ठिकठिकाणी शेकडो सशस्त्र प्रचारक खेडचापाडचांमध्ये, शहरांमध्ये पेरून ठेवले होते. श्वेत सैनिकांकडून जिंकलेल्या बंदुका वाटून टाकल्या होत्या. ज्या ज्या गोष्टी जड होत्या, प्रवासात वाहून नेण्यासारख्या नव्हत्या आणि टिकण्यासारख्या नव्हत्या त्या ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांना आणि खेडुतांना वाटून दिल्या जात होत्या. स्थानिक जमीनदारांकडून लुटलेले धान्य आणि इतर खाद्य पदार्थ लाल सैन्याला पुरून उरत ते ताबडतोब वाटून दिले जाई. अशा रीतीने सियांगशी सोव्हिएटपासून स्झेचुआन-पर्यंत 'लाँग मार्च'च्या आपल्या सबंध भागात लाल सैन्याने त्या त्या ठिकाणच्या लोकांत आपुलकी निर्माण करून ठेवली होती. लोकांची लाल सैन्याविषयीची भीती घालवली होती आणि ठिकठिकाणी कोमिन्टांगला हैराण करणारी छोटी छोटी भूमिगत लाल ठाणी निर्माण करून ठेवली होती.

स्झेचुआन प्रांतातल्या तिबेट सरहद्दीवरील उंचच उंच अशा बर्फाच्छादित पर्वत-शिखरांच्या भयानक रांगा ओलांडून माओची थकलेली लाल सेना वायव्य स्झेचुआनच्या सपाट विभागात मोकुंग येथे उतरली तेव्हा १९३५ चा जुलै महिना संपत आला होता. चांग-कु-ताओची लाल सेना त्याला मोकुंग येथे येऊन मिळाली. सैन्य थकले होते. त्याला विश्रांतीची गरज होती. लाल सैन्याने मोकुंगच्या आसपास काही आठवडे तळ ठोकला. कियांगसी सोव्हिएटपासून घोडचा, गाढवांच्या आणि माणसांच्या पाठीवर लादून आणलेली छोटी मोठी यंत्रे भराभरा बसवण्यात आली आणि छोटे छोटे कारखाने लगेच चालू करण्यात आले.

## धुमश्चक्रीतील नेतृत्वस्पर्धा

सैनिक विश्रांती घेत होते. परंतु अधिकाऱ्यांना विश्रांती घेणे शक्य नव्हते. दोन लाल सेना एकत्र आल्या होत्या. चांग-कु-ताओचा आपल्या सैन्यावरील प्रभाव जबरदस्त होता. स्वत: चांग आणि त्याचा सहकारी सहसियांग शेन यांचे माओ-त्से-तुंगशी अनेक बाबतीत मतभेद होते. माओच्या लाल सैन्याबरोबर त्याच्याशी मत-

भेद असणारे चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे काही सदस्यही प्रवास करीत होते. दोन सेना एकत्र होताच सत्ता-स्पर्धेमध्ये ते ताबडतोब चांगच्या बाजूने गेले. आणि या वेळेपर्यंत लढाईच्या धामधुमीत, पळापळीच्या गडबडीत थोडा काळ बाजूला पडलेली कम्युनिस्टांमधील नेतृत्वस्पर्धा स्झेचुआनच्या त्या तात्पुरत्या शांत वातावरणात तीव्रतेने सुरू झाली.

मतभेदांचे मुद्दे अनेक होते. लाल सैन्याने जावे कुठे, आपला तळ तिबेटमध्ये स्थापन करावा की उत्तरेस शेन्सी प्रांतात, आक्रमक जपान्यांविरुद्ध चीनच्या उत्तर सीमेवर लाल सैन्याची आघाडी उभारावी की सारी शक्ती कोमिन्टांगशीच लढण्यात खर्च करावी आणि चिनी कम्युनिस्ट पक्षाचे एकूण ध्येयधोरण काय असावे या बाबींवर कम्युनिस्ट नेत्यांमध्ये परोपरीचे मतभेद होते.

रोज बैठकी भरत होत्या. जोराचे वादविवाद होत होते. भांडणे होत होती. दिवस जात होते. पण भांडणांचा निर्णय लागत नव्हता. आपली भूमिका सोडायला कुणीच तयार नव्हते. लाल सैन्याने तेथेच तळ ठोकून राहावे तर चँग-कै-शेकच्या सेना स्झेचुआनच्या तळाभोवती हळू हळू आपले पाश आवळू लागल्या होत्या. उत्तरेकडे शेन्सी प्रांतात जाण्यासाठी रस्ता नव्हता. नवीन रस्ता शोधून काढावा लागणार होता. आणि पश्चिमेला तिबेट होता.

## माओची आगेकूच

नेत्यांमध्ये एकमत झाले नाहीच. लाल सैन्यात दोन तट पडले. माओ, लीन पियाओ, चाऊ-एन-लाय आणि पेंग तेह हुई हे आपल्या तुकड्यांसह उत्तरेकडे चालू लागले. चांग-कु-ताओने अद्याप निर्णय घेतला नव्हता. पण माओचे लाल सैन्य निघून गेल्यावर त्याला निर्णय घ्यायला वेळच मिळाला नाही. माओ निघून गेल्यावर त्याच्या आणि चांगच्या लाल सैन्यामधील भूभागात लवकरच चँग-कै-शेकचे सैन्य घुसले. त्यामुळे लाल सैन्याचे दोन स्पष्ट तुकडेच पडले.

चुह-तेह मात्र काही दिवस चांगबरोबरच राहिला. तो चांगबरोबर का राहिला हे कोडेच आहे. एडगर स्नो म्हणतो, माओचे लाल सैन्य निघून गेल्यानंतर उरलेल्या लाल सैन्याचा अधिपती म्हणून चुह-तेह मागे राहिला. त्याच्याबरोबर 'लाँग मार्च'-मधले काही सैन्यही होते. कम्युनिस्ट लेखक सांगतात की काही कारणांमुळे चांग-कु-ताओने चुह-तेहला जवळ जवळ बंदिस्त करून ठेवले होते त्यामुळ त्याला मागे राहावे लागले. तर इतर युरोपियन आणि अमेरिकन अभ्यासकांच्या मते चुह आणि माओ यांच्यांतही या काळात मोठा संघर्ष निर्माण झाल्यामुळेच चुह आपल्या सैनिकांसह मागे राहिला.

ते काहीही असो. पण काही दिवस चुह-तेह मागे राहिला होता हे खरे आहे. पण पुढे काही दिवसांनी तो माओला जाऊन मिळाला. सुमारे वर्षभरानंतर चांग-कु-ताओसुद्धा आपल्या सैन्यासह शेन्सी प्रांतात आला. पण त्याआधी त्याला श्वेत

सैन्याला चुकविण्यासाठी तिबेटमध्ये जावे लागले होते. तिथेच हुनान-अन्हवे सोव्हिएटचा नेता हो–लुंग त्याला येऊन मिळाला. आणि मग या दोन्ही लाल सेना माओच्या लाल सेनेला मिळण्यासाठी कान्सू आणि शेन्सी प्रांतात गेल्या.

स्झेचुआन प्रांतातून उत्तरेच्या दिशेने माओ निघाला तेव्हा त्याच्याबरोबर तीस हजार सैनिक होते. म्हणजे मोकुंग येथे एकत्र झालेल्या सुमारे ९५ हजार लाल सैन्यापैकी बहुसंख्य लाल सैन्य काही काळ तरी मतभेदांमुळे मागेच राहिले होते. आणि तरीदेखील माओच्याच या मार्चला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. कारण तो यशस्वी झाला. त्याने रचलेले आराखडे बरोबर निघाले. शेन्सी प्रांतात त्याने स्थापलेला सोव्हिएट तळ स्थिर झाला आणि जपानी आक्रमणाविरुद्ध त्याने उभारलेल्या आघाडीमुळे साऱ्या चीनमध्ये लाल सैन्याला लोकप्रियता किंवा किमान सहानुभूती तरी लाभली.

चिनी लाल सैन्यामध्ये अशी भांडणे आणि फाटाफूट चालू असताना स्टालीनने आणि कोमिन्टार्नने त्यांपैकी कुठल्याही एका गटाच्या किंवा नेत्याच्या डोक्यावर वरदहस्त ठेवला नाही. कोमिन्टार्नचे सातवे अधिवेशन मॉस्कोमध्ये जुलै–ऑगस्ट १९३५ मध्ये भरले होते. त्याच वेळी चिनी लाल सैन्यातील वादावादी जोरात होती. कोमिन्टार्नने या भांडणाकडे दुर्लक्ष केले. पण नेत्यांकडे दुर्लक्ष करणे शक्य नव्हते. आणि कुणा एका नेत्याच्या बाजूने वजन टाकूनही चालणार नव्हते. एकाच्या बाजूने वजन टाकून प्रत्यक्षात दुसराच नेता क्रांतीमध्ये यशस्वी झाला तर पंचाईत व्हायची. आणि ती वेळच अशी होती की कोण यशस्वी होतो हे सांगणेच कठीण होते.

म्हणून कोमिन्टार्नने सगळ्यात सोपा मार्ग स्वीकारला. कोमिन्टार्नच्या कार्यकारी समितीवर काही चिनी सभासद नेमायचे होते. हे सभासद त्यांच्या गैरहजेरीतच नेमले जाणार होते. माओ आणि चाऊ-एन-लाय यांची या समितीवर निवड झाली. पण त्याचबरोबर त्यांचे कडवे प्रतिस्पर्धी चांग-कु-ताओ आणि पो-कू यांचीही याच समितीवर निवड करण्यात आली.

आपल्या तीस हजार सैनिकांसह माओ-त्से-तुंग मोकुंगच्या फाटाफुटीतून निघून या 'लाँग मार्च'च्या अखेरच्या टप्प्यासाठी शेन्सी प्रांताच्या दिशेने निघाला तेव्हा त्याचे भविष्य अनिश्चित होते. पक्षामधील त्याचे स्थान अनिश्चित होते आणि त्याची ताकदही अनिश्चित होती. परंतु त्याचा आपल्या गणितावर विश्वास होता. शेन्सी प्रांतातल्या दुर्गम प्रदेशात तळ ठोकून आक्रमक जपान्यांविरुद्ध युद्धआघाडी उभारण्यातच लाल सैन्याचे आणि लाल क्रांतीचे हित आहे, याची त्याला खात्री होती. आणि त्याच आत्मविश्वासाने तो त्या अत्यंत धोक्याच्या प्रवासाला तयार झाला होता.

### जंगली टोळ्यांचा विरोध

'लाँग-मार्च'चा हा शेवटचा टप्पा लाल सैन्याला सर्वाधिक कष्टाचा आणि

खडतर होता. त्यांनी घेतलेला रस्ता हा अतिशय रानटी टोळयांची वस्ती असलेल्या अरण्यमय प्रदेशातून जात होता. या रानटी टोळयांचे चिनी लोकांशी परंपरागत वैर होते. लोलो टोळयांना वश करून घेणे जसे लाल सैन्याला जमले तसे इथे जमले नाही. लाल सैन्याजवळ पैसे असूनही या प्रदेशात कुठे खाण्यास अन्न मिळत नव्हते. लाल सेना जंगलाच्या ज्या ज्या भागांतून जाई त्या त्या भागातील रानटी टोळ्या लाल सेनेच्या मार्गातील घरेदारे साफ धुऊन ठेवीत. अन्नाचा एकही दाणा उरू देत नसत. मारून खाण्यासारखे एखादे जनावरही लाल सेनेच्या दृष्टीस पडत नसे.

घनदाट झाडीतून लाल सेना जाऊ लागली की ते लोक आजूबाजूच्या झाडांआडून विषारी बाणांचा वर्षाव करून सैनिकांना हैराण करीत. सेना एखाद्या खिंडीतून जाऊ लागली की ते वरून मोठमोठे दगड लोटीत. जमेल त्या तऱ्हेने ते लाल सेनेला त्रास देण्याचा प्रयत्न करीत. या जंगलातील मांत्झू या रानटी टोळीची राणी ही चिनी लोकांची अतिशय द्वेष्टी होती. तिने लाल सेनेच्या नेत्यांशी साह्यविषयक बोलणी करण्यास नकार तर दिलाच पण आपल्या जमातीतील जो कोणी लाल सैन्याला मदत करील त्याला जिवंत उकळून काढण्याचा हुकूम दिला. लाल सेनेला त्या जंगलातील रस्ते ठाऊक नव्हते. मांत्झू टोळीतीलच काही लोकांना जिवंत पक-डून त्यांना वाटाडे म्हणून बरोबर घेण्यात आले.

स्झेचुआन आणि कान्सू प्रांताच्या सीमेवरील ही जंगले पार केल्यानंतर एक लांबच लांब असा दलदलीचा गवताळ प्रदेश लाल सेनेला पार करावयाचा होता. या प्रदेशात पावसाची संततधार चालू असे. निवाऱ्याला झाडे, खडक, गुहा वगैरे काहीच या प्रदेशात नव्हते. माणसांची वसतीही नव्हती. या गवताळ सपाट प्रदेशाच्या मध्यभागी भयंकर धोक्याची दलदल होती. या दलदलीत अधून मधून गवतात दडलेल्या दगडावर पाय ठेवूनच हा प्रदेश पार करावा लागे. या रस्त्याची माहिती बाजूला राहणाऱ्या फक्त काही लोकांनाच असायची. सर्व प्रदेशात भयंकर मोठ्या डासांचे आणि किड्यांचे साम्राज्य पसरले होते. हा प्रदेश ओलांडायला कित्येक दिवस लागत.

### यातनामय प्रवासाची अखेर

काही कैदी वाटाड्यांच्या मदतीने लाल सेनेने ही दलदल ओलांडायला सुरुवात केली. एखाद्याचा पाय चुकून भलत्याच ठिकाणी पडला तर तो माणूस सरळ चिखलात आत ओढला जाई. अतिशय काळजीपूर्वक चालावे लागे. सारे गवत काळसर पिवळे होते. पाय खाली जमिनीवर ठेवला की गवताच्या पुंजक्यात काळे चिखलमय पाणी चमकत बाहेर येई आणि त्यात पाय बुडून जाई. हे पाणी विषारी होते. त्यामुळे पाय सुजून येत.

रात्री भयंकर थंडी पडे. त्यात पाऊस सतत चालूच. डासांपासून, थंडीपासून, पावसापासून निवाऱ्याला रात्री काहीच नसायचे. गवताचे पुंजके एकमेकांना

बांधून डोक्यावर निवाऱ्याची तुटपुजी सोय करावी लागे. सैनिक एकमेकांच्या पाठीला पाठ लावून झोपत. खाण्यासाठी अक्षरश: काहीच नव्हते. जवळ असलेले कच्चे धान्य, काही चांगल्या गवताची मुळे खाऊन किंवा चोखून जिवंत राहणे हाच मार्ग होता. या गवताळ प्रदेशाच्या मध्यभागी लाल सैन्याला दहा दिवसांच्या प्रवासात एकाही ठिकाणी मनुष्यवस्ती दिसली नाही. सैन्याच्या अनेक तुकड्या चिखलात रुतून मेल्या. कित्येक तुकड्या रस्ते चुकल्या. आणि त्या दलदलीतच गोल गोल फिरू लागल्या. तो एक खरोखरच भयानक प्रवास होता. शिवाय या प्रवासात घाई होती. मोकुंगहून निघाल्यानंतर चँग–कै–शेकचे श्वेत सैन्य लाल सैन्याच्या मागावर लागले होते. त्यामुळे त्यांना मोठ्या मजला माराव्या लागत होत्या. पण लाल सैन्य एकदा या दलदलीच्या प्रदेशात शिरल्यावर श्वेत सैन्याने पाठलागाचा प्रयत्न सोडून दिला.

चुह्-तेहने हा दलदलीचा प्रदेश तीनदा पार केला असे सांगतात. मोकुंगहून सुटल्यानंतर एकदा माओला गाठण्यासाठी. नंतर हरवलेल्या लाल तुकड्यांना एकत्र आणण्यासाठी तो परत मागे आला आणि पुन्हा मुख्य लाल तुकडीला गाठण्यासाठी.

हा गवताळ प्रदेश पार करून कान्सू प्रांताच्या दक्षिण भागात लाल सेना प्रवेशली तेव्हा तिच्या स्वागताला चँग-कै-शेकने नार्नकिंगहून पाठविलेली सेना आणि घोडदळ जय्यत तयार होते. परंतु आता निकराला आलेल्या लाल सेनेने ही फळी फोडली, अनेक घोडे जिंकून घेतले. अधून मधून चकमकी करीत, ज़ोराच्या मजला मारीत अखेर लाल सेना शेन्सी प्रांतातील उत्तर भागातील ऐतिहासिक ग्रेट वॉलच्या जवळ सुरक्षित प्रदेशात पोचली. अर्धीअधिक कापली गेलेली, वर्षभराच्या भयंकर यातनामय प्रवासाने दमलेली माओची लाल सेना २९ ऑक्टोबर १९३५ रोजी या सुरक्षित प्रदेशात उतरली तेव्हा बायका-मुले मिळून तिची एकूण संख्या अवघी वीस हजार भरत होती. ते निघाले तेव्हा ही संख्या एक लाख होती.

माओचा ' लाँग मार्च ' संपला होता.

[ अपूर्ण ]


**परसूच्या पशुकथा** — **वसंत सबनीस**

**सहा साहसे** — **दा. सी. देसाई**

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.**




*जखमी निरंजनसिंगाकडून कर्तारसिंगाचं नावही न निघाल्या-मुळे इन्स्पे. झझरासिंग बुचकळ्यात पडले. मग करमसिंगाबरोबरचे ते तीन लोक कोण? हरजितसिंगाचा खून झाला तेव्हा कर्तारसिंग कुठं होता? इन्स्पे. साहेबांच्या डोक्या-तून कर्तारसिंग हलत नव्हता. आणि कर्तारसिंगाचा...*

सब इन्स्पेक्टर हंसराज यांच्या सहज मनात आलेला विचार त्यांचा पिच्छा सोडीत नव्हता. कर्तारसिंगाची माहिती कुठल्यातरी पोलिस स्टेशनवरच मिळेल ही कल्पना निश्चितपणे डोक्यात ठेवून त्यांनी रात्रंदिवस चौकशी चालू ठेवली. सुरुवातीचे २-३ दिवस आलेले रिपोर्टस् निराशाजनकच होते. आणि अखेर लोहारमंडी पोलिस स्टेशनवरून माहिती आली की, ८ एप्रिल १९५४ ला रात्री ९ वाजता शहरातल्या मुख्य रस्त्यावर दोन पंजाबी शीख चिक्कार दारू पिऊन बेताल वागताना आढळले म्हणून त्यांना अटक करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी त्यांना मॅजि-स्ट्रेटपुढे उभे करण्यात आले असता त्या दोघांना जामिनावर सोडण्याचा हुकूम कोर्टाने

# ॲड. माधव कानिटकर

## लेखांक – चवथा

दिला ! सकाळी दारूची धुंदी उतरल्यावर त्यांनी आपली नावे कर्तारसिंग आणि गुरवचनसिंग–कुंदनसिंगाचा मुलगा–अशी सांगितली होती. कोर्टाने त्यांना पुढील सुनावणीसाठी १० तारीख दिली होती; पण त्या तारखेला दोघेही गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्यावर वॉरंट आहे व अजून ते मिळालेले नाहीत......! आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांना जामीन राहिलेल्या दोन्ही इसमांनी कोणतीही खळखळ न करता त्यांना झालेला दंड कोर्टात एकरकमी भरला व ते दोघेही कर्तारसिंगाचा व गुरबचनसिंगाचा पत्ता सांगू शकत नाहीत !

सब इन्सपेक्टर हंसराज यांच्या हातात आलेला धागा सुटला होता ! पण गाडी थोडी पुढे सरकली होती ! सब इन्स्पे. हंसराजनी ताबडतोब टेलिफोनवरून इन्स्पे. हझारासिंगांना ही नवी माहिती पुरवली आणि इन्स्पे. हझारासिंग बेहद्द खूष झाले !

कर्तारसिंगाबद्दल पूर्वी त्यांना फक्त संशय होता. आता त्यांची खात्री पटली होती ! कर्तारसिंगाने जाणून बुजून स्वतःला अटक करवून घेतली होती ! सहजासहजी बेताल होणाऱ्या दारुड्यांपैकी कर्तारसिंग नव्हता ! अनेक वर्षे चिक्कार दारू घेत आलेला कर्तारसिंग त्या स्थितीतदेखील चांगला सावध असे ! रस्त्यातून सरळ चालणारी माणसं दोन प्रकारची असतात–एक कधीही न पिणारी आणि दुसरी चिक्कार पिणारी ! काळजी असते ती आत्ताच सुरुवात केलेल्यांची......जेमतेम नवटाक घेऊन दीड बाटली घेतल्याचा आव आणणाऱ्यांची. कर्तारसिंगाने हेतुपुरःस्सर बेतालपणा केला, नाटक चांगले वठावे म्हणून त्याने गुरबचनसिंगाला बरोबर घेतला आणि खुनाच्या आरोपातून सुटण्याचा भक्कम पुरावा म्हणून लोहारमंडी पोलिसांची अप्रत्यक्षरीत्या मदत घेतली ! मॅजिस्ट्रेटपुढे गैरहजर राहण्याचा त्याचा प्लॅन पूर्वीपासूनचाच असला पाहिजे. कारण, जामीन राहिलेली व्यक्ती 'उगाच' लफड्यात येऊ नये म्हणून जामीनकीची रक्कम खुद्द कर्तारसिंगानेच जामीन राहिलेल्या इसमास आगाऊ दिली–आणि म्हणूनच त्या इसमाने ती काहीही खळखळ न करता भरली ! लोहारमंडी पोलिसांना कर्तारसिंगाने एका प्रकाराने बनविले तर मॅजिस्ट्रेटला दुसऱ्या प्रकाराने ! आणि हे सगळं कशासाठी तर स्वतःच्या बचावासाठी ! याचाच अर्थ खून होणार हे त्याला माहीत होतं ! त्याची बंदुक

# पंजाबमधील

# एक गाजलेला खून खटला

-या भयंकर कर्मात वापरली गेली पाहिजे. कर्तारसिंगाला करमसिंगाबरोबर 'खुनी' म्हणून कोर्टापुढे आणण्याइतका पुरावा इन्स्पे. हझारासिंगांच्या हातात आला होता ! कर्तारसिंग आणि करमसिंग दोघेही फासावर लटकणार हे निश्चित !

पहाट व्हायला अजून कितीतरी तास अवकाश होता आणि पंजाबमधलं कुत्रं-देखील फिरकणार नाही अशा निर्मनुष्य स्थळी साध्या कांबळ्यावर आडवी झालेली धन्नो डोळे उघडे ठेवून विचार करीत पडली होती ! कुठल्याही पुरुषाला एका नजरेत घायाळ करील व कुठल्याही स्त्रीचा मत्सर जागृत करील, अशी अलौकिक रूपसंपदा तिला परमेश्वराने दिली होती ! उगाचच कुशीवर वळत असताना तिच्या गोऱ्या हातांतली कांकणं वाजली आणि तिच्या संरक्षणासाठी भरलेली बंदुक घेऊन बाहेर पहारा करणारा जोगिंदरसिंग बेचैन झाला ! गेले अनेक महिने तो धन्नोला जवळून पाहत होता आणि प्रत्येक वेळी त्याला मनःस्ताप होत होता ! कधी कधी आपण तिच्याकडे फार वेळ पाहतो आहोत, हे धन्नोच्या लक्षात आलं की काय, असं वाटून तो उगाचच ओशाळत असे ! ४२ वर्षांचा कर्तारसिंग आणि १८–१९ वर्षांची धन्नो ! त्यांच्या न पाहिलेल्या श्रृंगाराची कल्पना मनात आणून जोगिंदर-सिंग अस्वस्थ होत असे. तो एकच डोळा असलेला क्रूरकर्मा या सुंदर नाजूक चेहऱ्या-वर चुंबनांचा वर्षाव करतो ? ती त्याला तसं करू देते ? वयाने २२–२३ च्या असलेल्या जोगिंदरसिंगाला सुंदर स्त्री म्हणजे काय ते खरे म्हणजे समजले नव्हते ? सहज म्हणून धन्नोचा स्पर्श व्हावा आणि जोगिंदरसिंगाला दुःख व्हावे असे प्रकार नित्य घडू लागले ! कर्तारसिंग महिन्याभरात न भेटल्यामुळे ही मुद्दाम 'तसं' करते की आईने मुलाला स्पर्श करावा ? भावजयीने दिराला करावा तितक्या निर्विकारपणे करते ? जोगिंदरसिंगाला काहीच समजत नाहीसे झाले होते. सुंदर स्त्री, म्हटलं तर काहीतरी आहे आणि म्हटलं तर काही नाही असं वागून पुरुषाला किती दुबळा करू शकते याचा अनुभव जोगिंदरसिंगाला प्रथमच येत होता ! त्याच्या विवेकाचा कबजा अनेकदा सुटत असे ! काय हरकत आहे ? धन्नो एकटी आहे ! आपण एकटेच आहोत ! असली कामं पुरुषाने पुढाकार घेतल्याशिवाय थोडीच होतात ? कदाचित तीदेखील त्याचीच वाट बघत असेल ! अनेकदा ती सहज

म्हणून जवळ येते....थोऽऽडं पुढं व्हायचं आणि......

....पण हे थोऽऽडं पुढे होणंच जोगिंदरसिंगाला जमत नव्हतं ! जमलं तर स्वर्ग-सुख मिळणार होतं ! पण नाही जमलं तर ? धन्नोने कर्तारसिंगाला ' सगळं ' सांगितलं तर ? कर्तारसिंग त्याला कुत्र्यासारखा गोळ्या घालून ठार मारील या-बद्दल त्याला खात्री होती ! धन्नोची पुष्ट देहयष्टी, गोरा रंग, अवयवांची गोलाई, नाजूक हालचाली हे सगळं अधाशीपणाने पाहत असताना मध्येच त्याच्या डोळ्यां-समोर कर्तारसिंगाचा उग्र चेहरा येत असे आणि त्याच्या अंगाला घाम फुटत असे ! पूर्वी प्रयत्न करून तो धन्नोबद्दलचे विचार डोक्यातून घालवून टाकीत असे. पण हल्ली त्याला तेही जमत नव्हते ! कर्तारसिंग जिवंत असेपर्यंत धन्नोवर हात न टाकलेला बरा, हा विचार कसाबसा मनात भरवून घेत तो बाहेर उगाचच मोठ्याने खाकरला आणि आत धन्नोने दुसऱ्यांदा कूस बदलली !

इन्स्पे. हझारासिंगांनी आपले जाळे नीट पसरायला सुरुवात केली. बक्षिसाच्या रकमेत त्यांनी फार मोठी वाढ केली ! गुन्हेगारांबरोबर अत्यंत क्रूरपणे वागणारे इन्स्पे. हझारासिंग गुन्हेगाराची खबर देणाऱ्या माणसाबरोबर फार प्रेमळ होत असत ! त्याच्याशी गोड बोलत ! त्याला पोलिस स्टेशनवर फार काळ थांबवून ठेवत नसत. त्याची साक्ष कोर्टात काढीत नसत. सरकारकडून पैसे मिळायला इतरेजनांना वर्षानु-वर्षं थांबावे लागते. हजार खेपा माराव्या लागतात. सरकारी अधिकाऱ्यांना 'भेटावे' लागते. पण गुन्हेगार सापडल्याबरोबर स्वतः खटपट करून इन्स्पे. हझारासिंग भली मोठी रक्कम जशीच्या तशी खबर देणाऱ्या इसमाला शक्य तितक्या लवकर मिळवून देत असत.

आतादेखील आपल्या खुर्चीत बसून गज्जनसिंग खुनाचे केस पेपर्स इन्स्पे. हझारा-सिंग फार काळजीपूर्वक वाचीत होते. कर्तारसिंग, धन्नो, करमसिंग किंवा बचन-सिंग यांपैकी कोणीही अजून मिळत नव्हते पण कोणीही एक मिळाला तर बाकी तिघं लगेच मिळणार होते !

.....आणि अचानक पोलिस स्टेशनच्या व्हरांड्यात मोठा हशा पिकलेला त्यांनी ऐकला व बाहेर पाहिले कोणीतरी एक गावंढळ तरुण विचारीत होता,

" कोण आहे ड्यूटीवर ?"

" अरे वा रे ऽऽवा ! तू कोण गव्हर्नर ? म्हणे कोण आहे ड्यूटीवर ऽऽऽ !"

हवालदाराच्या या उत्तरावर बाकीचे हवालदार मनमोकळे हसले ! इन्स्पे. हझारा-सिंगांनी जरा वेळ मुद्दामच लक्ष न घालण्याचे ठरविले !

तो मातीने माखलेला तरुण भेदरट आवाजांत पुन्हा पुन्हा सांगत होता, " मला आत जाऊ द्या. मला मोठ्या साहेबांना भेटायचंय......"

आणि या वेळी मात्र इन्स्पे. हझारासिंगांनी आतूनच मोठ्याने दरडावले, " काय आहे रे ऽऽऽ"

बाहेरचे हवालदार खाड् खाड् बूट वाजवीत उभे राहिले ! आणि त्यांच्यापकी एकाने आत येऊन खाड्कन् सलाम ठोकला.

" काय गडबड आहे...... ?"

" साहेब, बाहेर कोणीतरी एक माणूस......"

"त्याला आत पाठवून दे !"

" ...... पण साहेब !"

" त्याला आता पाठवून दे म्हणतोना ! पाठवून दे, म्हणजे पाठवून दे ! खलास. मला जास्त बोललेलं आवडत नाही !"

आत आलेला हवालदार चुपचाप सलाम ठोकून बाहेर गेला आणि एका सुमार वयाच्या खेडवळ तरुणाला घेऊन आत आला. त्या तरुणाकडे पाहून इन्स्पे. हझारासिंगांनी उजव्या हाताचा पंजा समोरच्या खुर्चीकडे 'बसा' अशा अर्थाने केला आणि हवालदाराकडे अशा नजरेने पाहिले की, तो काय समजायचं ते समजून बाहेर गेला !

त्याला समोर बसवून ठेवून मुद्दामच त्याच्याशी काहीही न बोलता खाली मान घालून इन्स्पे. हझारासिंग काहीतरी लिहू लागले व एकीकडे त्याच्या हालचाली बारीक नजरेने पाहू लागले. चेहऱ्यावरचा घाम पुसायचीदेखील त्याला शुद्ध नव्हती. छाती खालीवर होत होती ! तो फार लांबून आणि घाईत आला असला पाहिजे ! बसल्या जागेतच चुळबूळ करत तो पोलिस स्टेशनच्या खिडक्यांतून बाहेर पाहत होता ! कुणा माणसाची चाहूल लागली की झटकन् आत तोंड करीत होता. त्याच्या हालचालीवरून इन्स्पे. हझारासिंगांनी ताडले की, हा खबरी असला पाहिजे !

चाणाक्ष नटाप्रमाणे चेहऱ्यावरचे भाव बदलून इन्स्पे. हझारासिंगांनी खुर्चीच्या पाठीवर रेलून बसत सिगरेट पेटवली आणि गोड आवाजांत समोर बघत विचारले,

" काऽऽय रे बाबा ऽऽ काय काम आहे ?"

" खबर द्यायची आहे साहेब."

" अच्छा ? काय नाव तुझं ?"

" जोगिंदरसिंग ! सरकार ऽऽ "

" अरे, मग बोल ना ! घाबरू नकोस ! मी आहे ना इथे !"

" ५७२६ !"

" यस सर् ऽऽ"

" दोन चहा सांग स्पेशल ऽ ऽ"

" चहा नको साहेब " हे वाक्य कसेवसे उच्चारून जोगिंदरसिंगाने खुर्ची पुढे सरकवून घेतली व दोन्ही हातांची घडी टेबलावर टेकवीत पुढे झुकून तो म्हणाला,

" सरकार ! उद्या सकाळी कर्तारसिंग आणि कुंदनसिंग आग्र्याच्या रीजनल ट्रान्स्पोर्ट ऑफिसात ट्रक्सच्या लायसेन्सची मुदत वाढवून घेण्यासाठी येणार आहेत

आणि साहेब कदाचित त्याच वेळी करमसिंग त्यांना तिथे भेटेल...... "

"ब्रेव्हो ! माय फ्रेंड !" असे म्हणून इन्स्पे. हझारासिंगांनी 'खबरी 'ची पाठ थोपटली आणि त्याच्या हातावर १० रुपयांची नोट ठेवली !

"फक्त १० रुपये साहेब ?"

"अरे, हे माझ्यातर्फे आहेत ! कर्तारसिंग—करमसिंग आमच्या ताब्यात आले की सरकारी बक्षिसाची मोठी रक्कम मिळेल !"

'खबरी 'ची पाठ थोपटता थोपटता इन्स्पे. हझारासिंगांनी बाहेर पाहत म्हटले,

"५७२६...... "

"यस सर् ऽऽ!"

"इसको हवालातमें बंद कर दो ऽ !"

इन्स्पे. हझारासिंगांचा हुकूम ऐकून 'खबरी' थरथर कापू लागला ! इन्स्पे. 'हझारासिंगांकडे चिंतातूर चेहऱ्याने बघत तो म्हणाला,

"हे काय सरकार ! मी तुम्हांला मदत केली आणि तुम्ही ऽऽ "

"घाबरू नकोस माझ्या राजा ! तुझ्या आणि माझ्या कल्याणासाठीच तुला थोडा वेळ 'बंद' करावा लागेल !"

"म्हणजे ऽऽ "

"म्हणजे असं की तुझ्या माहितीप्रमाणे कर्तारसिंगाला अटक व्हायला अजून काही तास बाकी आहेत. तू दिलेल्या माहितीप्रमाणे गोष्टी घडल्या तर ठीकच. पण नाही तर......?

"नाही तर तुला कायम बंद व्हावं लागेल. इन्स्पे. हझारासिंगाला खोटी खबर देऊन फसविणं तुला वाटतं तितकं सोपं नाही ! मात्र तुझ्याकडे पाहिल्यानंतर तू तसा असशीलसं वाटत नाही !

"...... आणि दुसरी गोष्ट म्हणजे तुला इकडे येताना कर्तारसिंगाच्या माणसांपैकी कोणी पाहिला असला तर ? थोडा वेळ तू आत बसणंच चांगलं ! माझ्यावर विश्वास ठेव ! कर्तारसिंगाला ज्या सेकंदाला बेड्या ठोकीन त्याच सेकंदाला तू इकडं सुटशील, अशी व्यवस्था करीन ! पोलिस व्हॅनमधून फार दूरवर—अगदी तू सांगशील तिथे—तुला पोचवू. मग तर झालं ?"

इन्स्पे. हझारासिंगांच्या बोलण्यातल्या अर्जवावर जोगिंदरसिंगाचा कसा कोण जाणे पण विश्वास बसला आणि ५७२६ बरोबर लॉक अप् च्या दिशेने तो चालू लागला !

२८ एप्रिल १९५४ चा तो दिवस ! आग्र्याच्या रीजनल ट्रान्स्पोर्ट ऑफिसरबरोबर चित्रविचित्र बुशकोट आणि पांढरी पॅट घातलेला इसम बराच वेळ बोलत बसला होता व बाकीचे ऑफिसमधले वातावरण नेहमीप्रमाणेच होते. कुठल्या कौंटरवर रांग मोठी होती कुठे कमी ! टाइपरायटरचा आवाज कुठून तरी येत होता. बऱ्याच दिवसांत न पुसलेले, काळ्या रंगाची पुटे चढलेले पंखे तशाच स्थितींत

फिरत होते. सरकारी पिवळे कागद इकडून तिकडे ऑफिसमध्ये फिरवले जात हो.ते कारकून मंडळी आपसांत गप्पा मारता मारता "आज जरा जास्त गर्दी आहे. म्हणूनच साहेब लौकर आलेले दिसताहेत–" या नित्य घडणाऱ्या फडतूस कोट्या करीत बसले होते ! आणि तो रंगित बुशकोट घातलेला इसम व्हरांड्यातल्या भितीवरच चिकटवलेले वाहनें चालवण्याचे नियम वाचीत उभा होता !

११–११॥ ची वेळ असेल तीन धिप्पाड शीख हातामधले कसलेसे कागद घेऊन R. T. O. ऑफिसच्या आवारात शिरले. हळू हळू व्हरांड्यात आले आणि योग्य वेळी मुख्य अधिकाऱ्याच्या खोलीत शिरले. कडक पिवळा सरकारी गणवेश घातलेल्या R. T. O. ने त्यांना अदबीने बसवून घेतले व "येस् ऽऽ" एवढा एकच प्रश्नार्थक शब्द हवेत सोडला.

"लायसेन्स रिन्यू करायचंय साहेब–"

"पूर्वी लायसेन्स कुणाच्या नावावर होतं ?"

"आमच्याच नावावर !"

"अच्छा ? बघू फॉर्म्स !"

"कर्तारसिंग कोण आहे ?"

"मी कर्तारसिंग साहेब !"

"आणि कुंदनसिंग ?"

"–मी कुंदनसिंग साहेब !"

बाजूला उभ्या असलेल्या तिसऱ्या व्यक्तीकडे पाहून R. T. O. ने "तुम्ही कोण ?" या अर्थाने भुवया उंचावल्या त्याबरोबर–


समोरच्या खुर्चीतल्या दोघांनी अर्धवट उठून म्हटले, "त्याचं काही काम नाही आहे साहेब. तो आमच्या बरोबर आलाय !"

R. T. O. ने बराच वेळ त्यांचे फॉर्म्स काळजीपूर्वक वाचले आणि शिपायाला बोलावण्यासाठी म्हणून त्यांनी टेबलाच्या कडेला बसविलेली इलेक्ट्रिक कॉल–बेल दाबली...... आणि ती बेल वाजतच राहिली !

बाहेर चित्रविचित्र बुशकोट घालून वाहतुकीचे नियम वाचणारे इन्स्पेक्टर हझारासिंग भरलेले पिस्तुल हातात घेऊन तिघांच्याही मागे येऊन उभे राहिले होते ! व इतका वेळ निरनिराळ्या कौंटर्सवर उभे राहून लाईन उगाचच लांबविणारे साध्या वेषातले कॉन्स्टेबल्स् बेड्या घेऊन आता धावले. काय गडबड चालली आहे, हे कुणाला समजायच्या आधीच पोलिसांनी तिघांना बेड्या ! आणि दुपारी १२ च्या सुमारास कर्तारसिंग – करमसिंग आणि कुंदनसिंग पोलिस बंदोबस्तात मोघा पोलिस स्टेशनच्या लॉक अप्मध्ये बंदिस्त झाले !

[ अपूर्ण ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

## फेब्रुवारी १९६७ चे भविष्य

**मेष** :– सप्तम स्थानी मंगळाने पाऊल टाकताच संघर्षमय जीवनाला सुरुवात झाली. पण संघर्ष आहे म्हणूनच ठिणगी पडेल–प्रकाश दिसेल.

निवडणुकीमुळे भारतीय भवितव्याची-पर्यायाने तुमचीही–निर्णायक स्थिती याच महिन्यात समजणार आहे. निश्चितपणे सांगणे इष्ट नसले तरी ते भविष्यकालीन भवितव्य फारसे आकर्षक नाही !

हा महिना तसा तुम्हांला स्वास्थ्याचा आणि प्रगतीचा दिसत नाही. म्हणजे काही विपरीत घडेल असेही नाही. झगडत, धडपडत, ठेचाळतच तुम्हांला जावे लागणार आहे. पण यश तुमचेच आहे. कधी असे कधी तसे एवढे साडेसाती अपेक्षित असतेच. शक्यतो फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका.

दि. ५ ते ११, १६ ते २१, २५ ते २८ या काली अपेक्षित घटना घडू लागतील.

**वृषभ** :– फेब्रुवारी महिना उजाडताच प्रगतीचा एक नवा टप्पा आपण गाठणार आहात. अंतरिक्षातील ग्रह तुमच्यावर बेहद्द खूष असल्याचा हा पुरावाच. नैतिक आचारामुळे, चारित्र्यसंपन्न जीवनामुळे तुमच्याभोवती तेजोवलय विलसू लागेल. धनिकांची कृपा व वरिष्ठांचे सहकार्य यामुळे आपण कोणत्याही कामाला हात घातलात तरी यश अपेक्षेबाहेर लाभेल.

या महिन्यातील अंशपूर्ण गुरु-शनी त्रिकोण ( ६ फेब्रु. ) हाच तुमचा यशस्वी

जीवनाचा केंद्रबिंदू त्या कालाच्या आसपासच अनेक महत्त्वपूर्ण कार्ये आपल्या हातून घडवील. तुमचे आकर्षक व्यक्तिमत्त्व पाहून, तुमचा आवाज ऐकून प्रतिस्पर्ध्यांचे धाबे दणाणून जाईल. निवडणुकीच्या क्षेत्रात विक्रमी यश मिळू शकेल.

दि. ५ ते १४, १९ ते २५ या कालखंडावर सारे लक्ष केंद्रित करा.

**मिथुन** :– तुमची सारी अनिष्टता, तुमच्या मागच्या अनंत कटकटी फेब्रुवारीच्या मध्यानंतर इतिहासजमा होणार आहेत. भाग्यस्थानी रवी-बुध-शुक्र यांचे आगमन घडताच तुमच्या सभोवारचा आसमंत उत्साहाने ओसंडून जात असल्याचे दिसू लागेल.

ऐन निवडणुकीच्या कालात तुम्हांला इतके अनुकूल ग्रह येणार आहेत की; कधी ध्यानीमनी नसणारे यश एकाएकी तुमच्या पदरी पडेल. समाज अक्षरश: तुम्हांला डोक्यावर घेऊन नाचायला लागेल.

आजवरच्या साऱ्या कष्टाचे श्रेय लाभेल. नोकरीचाकरीत, व्यापारधंद्यात खूप मोठ्या उलाढाली घडून यायला लागतील आणि लाभही मोठ्या प्रमाणावर पदरी पडायला लागतील.

दि. ६ ते १०, १६ ते २८ या कालाचे महत्त्व अनन्यसाधारण असे जाणवेल.

**कर्क** :– सूर्य-मंगळावर तुमची सारी मदार. आणि या वेळी त्यांनीच तुमच्याकडे पाठ फिरवलेली असल्यामुळे, या वेळी अपेक्षेप्रमाणे फारच थोडे घडेल. या वेळच्या चौथ्या मंगळाचे लक्ष प्रामुख्याने तुमचे आरोग्य. हेच वरवर दिसायला ठाकठीक असले तरी अंतरंग पेटून निघाल्याची जाणीव होऊ लागेल. अधिक परिश्रम, वाढत्या जबाबदाऱ्या, सार्वजनिक कार्ये टाळू शकलात तर पुष्कळसा त्रास टळेल. आघाडीवर राहण्यापेक्षा पडद्याआड राहूनच बरीचशी कार्ये करणे परिणामी स्वास्थ्याचे ठरेल.

अंदाजपत्रक साफ कोलमडेल, इष्टमित्र कोणत्याही क्षणी दगा देतील. पहिल्या गुरूने थोडेफार यश पदरी पडेलही; पण या वेळी जे जे घडेल ते अती मंदगतीने–अविश्रांत परिश्रमाचे मोल देऊनच.

दि. ३ ते ९, १३ ते १९, २२ ते २६ थोडेफार यश याच काली मिळावे.

**सिंह** :– गुरू-शनीची सहानुभूती लाभण्याची शक्यता नसताही एकटा पराक्रमस्थ मंगळ तुमचे व्यक्तिमत्त्व उठावदार करायला उपयोगी पडेल.

आधीच तुम्ही माणसे स्पष्ट आणि निर्भिड, त्यातून पराक्रमस्थ बळ पाठीशी. निर्धार पेटून उठेल, जिद्द जागी होईल, अचूक शरसंधानामुळे शत्रू नामोहरम होईल. आपण आपले सारे कर्तृत्व पणास लावून राजकीय आखाड्यात उतराल आणि विरोधक खंबीर असूनही अपेक्षित यश मिळवून दाखवाल.

सांपत्तिक योग मात्र यथामथाच. पण कधी कुणाला न मिळणारी प्रतिष्ठा तुम्हांला लाभेल. प्रवास सतत घडेल. नोकरीधंद्यात नव्या आकर्षक घटना घडू लागतील.

दि. ६ ते १०, १५ ते २२, २६ ते २८ या काली आपले अनेक प्रश्न सुटावेत.

**कन्या :**– सध्याइतके चांगले ग्रहमान कधी काळी तरी लाभले असेल की नाही याची शंकाच आहे. शिवाय फार वर्षांनी घडून येणारा गुरू-शनी त्रिकोण.

व्यावसायिक व सामाजिक जबाबदाऱ्या खूपच वाढू लागतील आणि जिवाचे रान करून त्या पार पाडाव्या लागतील. सहजासहजी काही घडावे हे शनीसारख्या कष्टाळू ग्रहाला मंजूर नाही. या कालात आपणांस मोठेपद निश्चित मिळेल–पण मोठ्यापदावरील थोरही बिघडतो, याची जाणीव ठेवन वागलात तर आगामी २-३ महिन्यांचा काल अनन्यसाधारण यश देणारा जाणवेल. निवडणुकीत तर हां हां म्हणता यश मिळेल.

साहित्याबरोबर राजकीय क्षेत्रातही आवाज उठवाल. धनोत्पादनाच्या अनेक संधी दार ठोठावू लागतील. त्यांची योग्य वेळीच दखल घ्यायला हवी.

दि. ४ ते ९, १८ ते २६ या कालात चिरंतन स्मृतीच्या घटना घडाव्यात.

**तूळ :**– मंगळाचा तुमच्या राशीतूनच संचार सुरू आहे. तो खूप कष्ट देईल पण यशही घवघवीत देऊन जाईल. पहिला पंधरवडा काहीसा परिश्रमाचा जाणवेल. पण दुसऱ्या पंधरवड्यात मात्र हवं ते अपेक्षेप्रमाणे पदरी पडेल. निवडणुकीच्या क्षेत्रात आपण उतरला असाल तर काही वेगळ्या तंत्रमंत्राचा अवलंब करावा लागेल. पक्षत्याग, गटबाजी आणि अन्य आणखी काहीही असे करण्याची मनाची तयारी असेल तर यशाची आशा करता येईल. सरळ साधेपणाने वागलात तर हरि-हरि करीत बसावे लागेल.

मोठ्या प्रयासाने पैशा–अडक्याचा प्रश्न सुटेल. प्रकृतीला मात्र सतत जपा.

दि. ६ ते १०, १५ ते २१, २३ ते २६ या काली प्रयत्न कारणी लागावेत.

**वृश्चिक :**– बारावा मंगळ आला की अनेक समस्या निर्माण व्हायला लागतात. वाढता खर्च, कौटुंबिक अनारोग्य, गुप्त शत्रूंची कारस्थाने.

पण हे सारे अल्पकाळ. कोणतीही उणीव तुम्हांला भासू नये. म्हणून भाग्यस्थ गुरू तुम्हांला वचनबद्ध आहे. तो या मंगळाच्या कारवायांच्या ठिकऱ्या उडवून टाकील. विरोधकांना ठोकरून काढील.

व्यावसायिक क्रांतीला उधाण येईल, इष्टमित्रांचे सहकार्य न मागताही मिळू लागेल; राजकारण तर तुमच्या तळहातावरचा मळ !

हा महिना–विशेषतः, दुसरा–तिसरा आठवडा–फारच धाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल. दगदग खूप होईल पण त्या साऱ्या श्रमाचे श्रेय पुरेपूर मिळेल.

दि. ३ ते ९, १३ ते १८, २२ ते २७ संस्मरणीय. चांगल्या घटना याच काली घडून येतील.

**धनू :**– मंगळ एकादशात. हे एकटेएकच आशास्थान. अन्य ग्रह वेळेला कोणीच उपयोगी पडणार नाहीत. म्हणून तुम्हांलाच सारे काही जातीने करायला हवे. नोकरा-चाकरांवर, इष्टमित्रांवर विसंबून राहण्यात मुळीच अर्थ नाही. निवडणुकीची धकाधकी

तुम्हांला मुळीच मानवणार नाही. भावनेला बळी पडून त्या वातावरणात पाऊल टाकलेत तर ' गाढवही गेले—ब्रह्मचर्यही गेले ' अशी अवस्था होईल.

हे दिवस सर्वसाधारण अनुकूल असले तरी न झेपणारी उडी घेऊ नका. नोकरी-धंद्यातही सारे व्यवहार कुवत पाहूनच करा. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. १ ते ७ व २४ ते २८ एवढाच काल अपेक्षित यश, माफक लाभ देणारा आहे.

**मकर** :— फेब्रुवारी महिनाही तुमच्या प्रगतीच्या अध्यायात आणखी एक पान लिहील. मंगळ दशमात आहे. हवातसा आहे. त्या मंगळाच्या उग्र स्वरूपाकडे पाहून शनी-राहू तुमच्या वाटेस जाण्याचे साहस करणार नाहीत. आणखी एक लक्षात ठेवा→ दुर्बलांनाच ग्रह छळतात !

दि. २३ ला सूर्य कुंभेत प्रवेश करताच सूर्य-मंगळ त्रिकोण घडेल. तेव्हापासूच जगाच्या नजरा तुमच्यावरच खिळू लागतील. दि. ९ ची अमावास्या संपताच सभो-वतालचा सारा परिसर उत्साहाने ओसंडून येईल.

फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात दगदग—धावपळ सतत करावी लागेल. साऱ्या परिश्रमांचे श्रेय असे पदरी पडेल की, तुमच्या हितशत्रूंची तोंडे एकदम बंद पडतील.

दि. ३ ते ७, ११ ते १६, २१ ते २५ सर्व काही योजनेप्रमाणे घडू लागेल.

**कुंभ** :— मंगळ भाग्यस्थानी आला आहे. अशा वेळी अन्य ग्रह कसे आहेत याचा विचार करण्याचीही गरज नाही. हा एकटा मंगळही तुमच्या साऱ्या योजना सिद्धीस न्यायला समर्थ आहे.

या महिन्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रवास, बदल, स्थानांतर व स्थित्यंतर आणि अशा घटनांनीच तुमच्या चारित्र्याला उत्थान मिळेल. आगामी उज्ज्वल भवितव्याची प्रसादचिन्हे ६ फेब्रुवारीच्या गुरु-शनी त्रिकोणापासूनच दिसा-यला लागतील. निवडणूक गाजवाल. राजकारण यशस्वीपणे हाताळाल. नोकरी-धंद्यातील प्रगतीचे स्थान सहजासहजी मिळवू शकाल.

दि. २ ते ७, १५ ते २२, २५ ते २८ या कालखंडात मनात आणाल ते घडेल, मिळेल.

**मीन** :— मीन राशीची माणसे आधीच भावनाप्रधान. त्यातून, आठव्या मंगळाचा छळवाद. शनी—मंगळ साऱ्याच ग्रहांनी तुमच्याविरुद्ध बंड पुकारलेले दिसते. एकटा एक गुरूच तुमच्याशी एकनिष्ठ. जिवापाड मेहनत—धडपड केलीत आणि चारित्र्य निष्कलंक राखलेत तरच या भडकत्या आगीतून सुरूपपणे बाहेर पडाल. निवड-णुकीच्या धमालीपासून सदैव चार हात दूरच राहा. फार मोठ्या जबाबदाऱ्या उचल-ण्याच्या भानगडीत पडू नका. मुख्यत: अधिक काळजी घ्या प्रकृतीची. गुरूच्या कृपेने प्रतिष्ठेला मात्र यत्किंचितहि डाग लागू शकणार नाही.

दि. ३ ते ११, १६ ते २१ या कालात काही स्थगित कामे गती घेऊ लागतील.

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## गाढवाच्या माओवादी दुगाण्या

परमेश्वराची लीला अगाध असो किंवा नसो, माओची मात्र नक्की आहे माओच्या तत्त्वज्ञानामुळे मोटारगाडी रस्त्यावरून नीट चालू शकते आणि माओ वादामुळेच फळे ताजी राहतात. मला वाटले होते एवढ्यावर संपेल.– पण छे ! आता असा शोध लागला आहे की, माओच्या तत्त्वज्ञानामुळे लाल चीनमध्ये गाढवे आणि डुकरे यांची चांगली पैदास होत आहे ! काय गंमत आहे पाहा ! काँग्रेसच्या तत्त्वज्ञानामुळे हिंदुस्थानात गाढवे व डुकरे निपजत आहेत, असे कोणी म्हटले तर त्याच्यावर बदनामीचा खटला व्हायचा. पण हीच गाढवे-डुकरे साम्यवादी चीनमध्ये माओ–वादाचा विजय मानली जात आहेत. मला वाटते माणूस अन् साम्यवादी यांच्यातला फरक तो हाच.

चिनी साम्यवाद हा रशियन साम्यवादाची 'सुधारून' वाढवलेली आवृत्ती आहे एवढे मला माहीत होते. पण ही सुधारणा रशियन साम्यवाद फक्त माणसांपुरता मर्यादित होता तो चीनमध्ये गाढवा-डुकरांत पसरविण्याच्या थराला जाईल याची कल्पना नव्हती. आता किती साम्यवाद किंवा माओवाद नेमका गाढवांना-व डुक-रांनाच विशेष का आवडावा, हे अर्थात् माओखेरीज इतर कोणीच सांगू शकणार नाही. चीनच्या प्रत्येक पोरसवदा लाल रक्षकाच्या हातात 'माओचे तत्त्वज्ञान' या पुस्तकाची प्रत हमखास असते. तेव्हा चिनी डुकरे याच तत्त्वज्ञानाच्या चिखलात लोळतात की काय व चिनी गाढवे याच तत्त्वज्ञानात सांगितल्याप्रमाणे दुगाण्या झाडतात की काय, याचा तपास करावा लागेल.

## संगीत राजकारण

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून ललित कलांचा उत्कर्ष झाला आहे, यात शंका नाही. उदाहरणार्थ, दिल्लीच्या आलीशान हॉटेलातून हल्ली पाश्चिमात्य 'कावारे' नामक अर्धनग्न नृत्याच्या जोडीला भारतनाटयम् – कथकलीचा थयथयाटदेखील घालण्यात येतो. चित्रकलेबद्दल म्हणाल तर न झोपणाऱ्या बाळाला त्याच्या आईने

'वागुलबोवा येईल' अशी भीती दाखवण्याचे आता प्रयोजन नाही; "मॉडर्न आर्टच्या प्रदर्शनाला नेऊ का ?" अशी धमकी दिल्याबरोबर त्याची तेथल्या तेथे दातखीळ बसून रडू थांबेल. गायनकलेने तर आता याच्याही पुढे जाऊन प्रत्यक्ष देशाचे भवितव्य ठरविण्याचा चंग बांधलेला दिसतोय. कारण परवा वर्तमानपत्रांत वाचले की मुंबईच्या फिल्मी दुनियेतल्या एक-दोन प्रसिद्ध पार्श्वगायकांनी गाईलेली काही खास गाणी निवडणुकीचा फड जिंकण्यासाठी देशभर वाजविण्यात येणार आहेत. म्हणजे आतापर्यंत हिंदी सिनेमामुळे बायकांचा अंबाडा किती वर असावा व पोलक्याचा गळा किती खाली असावा, सलवार-कमीज किती घट्ट असावी व नजर किती सैल असावी, किंवा तरुणांचे केस किती विस्कटलेले असावेत आणि मुंबईच्या उन्हाळ्यात त्यांनी कुठल्या स्टाइलचा ओव्हरकोट वापरावा एवढ्या गोष्टी ठरत होत्या. त्यांच्या जोडीला आता देशाची अन्न-परिस्थिती कशाने सुधारेल किंवा भारताने अणुबाँब करावा की नाही, याही गोष्टी ठरतील.

शास्त्रोक्त चीज ऐकून कंटाळा आल्यावर हिंदी सिनेमा आणि निवडणुका यांच्या मिश्रणाने तयार झालेली अजब चीज ऐकायची म्हटली तर काय ऐकायला मिळेल ? ...ऐ मेरे दिल, तुझी धडकन् कुठल्या उमेदवारासाठी चालली आहे ? तू कुठल्या हसीन पार्टीवर स्वतःला कुर्बान करणार आहेस ? ही रंगीन फिजा, ते चांदतारे, ती काली बदरिया आपणा दोघांना कसला संदेश देत आहेत ? हाच की—व्होट फॉर......! ओ मेरे सनम, तू एक वेळ माझ्याशी बेवफाई कर,—पण पार्टीशी करू नकोस. माझ्या दिलाचे हजार तुकडे कर—पण मी तुला जी व्होटिंग स्लिप देईन तिचे करू नकोस. आपल्या पार्टीला जगात सर्वत्र शांती व प्रेम पाहिजे, म्हणून अमेरिका व रशिया, माओ व लिऊ, कारखानदार व कामगार, संपादक व लेखक, संयुक्त समाजवादी व विभक्त समाजवादी, नुसती काँग्रेस व जनता-काँग्रेस इत्यादी जन्मजात परस्पर—शत्रूंना या पार्टीचे काय सांगणे आहे ? एकच, की दादानो, जगात फक्त इष्क है, इष्क, इष्क है !" मात्र ओ सजनी, परपार्टीयोंसे ना अखियाँ मिलाना बरं का ! नाही तर 'व्होट दिया दर्द लिया' अशी तुझी स्थिती होईल. पण आपल्या पार्टीला मत दिलेस की बहारे फिर भी आयेंगी. मग बिहारमधली शेते पुनः इतकी फुलतील की आपल्याला पुनः तिकडे शुटिंगला जाता येईल. शिवाय काश्मीर भारताचे अविभाज्य अंग आहे, असे आपल्या पार्टीचे ठाम मत आहे. कारण, काश्मीरशिवाय ईस्टमन कलरमध्ये प्रेम करणे कसे शक्य आहे ? तेव्हा ऐ मेरे दिलके दिलबर, देशाच्या भल्यासाठी माझ्या सुरात सूर मिसळून गर्जना कर—याहू ऽऽऽ !

●

# पुरोगामी राष्ट्रवादाचे प्रभावी पुरस्कर्ते

## डॉ. रफिक झकारिया

[पान २३ वरून चालू]

त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. कायद्याचे सडेतोड मुद्दे अतिशय तळमळीने आणि प्रभावीपणे आपल्या जोरदार वक्तृत्वशैलीत त्यांनी मांडले. भारतीय गण-राज्याशी एकरूप होण्यासंबंधीची शेख अब्दुल्लांची पूर्वीची वक्तव्येच दाखल्यासाठी देऊन कश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग कसा आहे हे त्यांनी प्रभावीपणे सांगि-तले. " आमच्या धर्मातीत राष्ट्राचा जो मूळ पाया त्यालाच धक्का देऊ पाहणाऱ्या कोणत्याही संकटाचा आम्ही प्राणांतिक मुकाबला करू, " असे त्यांनी ठणकावून सांगितले.

आपल्या भाषणाच्या वेळी भुत्तो कसा लाल लाल होऊन श्वास टाकत होता ही आठवण ते अजून हसत सांगतात. त्यांच्या भाषणाची वृत्तपत्रांमध्ये चांगलीच स्तुती झाली. पुढे तिबेट-प्रश्नावर बोलण्याची वेळ आली तेव्हा डॉ. झकारिया यांनीच बोलावे असाच कै. शास्त्रींनी आदेश पाठविला. या सर्व आठवणी जागृती करणारी युनोतील आपल्या भाषणाची टेप आपल्या संग्रहातील अतिशय मौल्यवान वस्तू म्हणून ते मानतात.

### धर्मातीततेवर श्रद्धा

भारताच्या मूलभूत धर्मातीततेवर डॉ. झकारिया यांची श्रद्धाच आहे. एक धर्मा-तीत समाज जगापुढे उभा करण्यात आपण बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालो आहोत असे ते मानतात. सर्वसामान्यपणे जातीभेदामुळे सरकारी पातळीवरून कुणा-वर विशेष अन्याय होत नाही असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. आपल्या देशातील संसदीय कायद्यांमुळे भू-सुधारणा, शैक्षणिक सवलती, कामगार सुधारणा कायदे यांमुळे हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजांतील पददलितांना खरोखरच समान फायदा झालेला आहे असे सांगून डॉ. झकारिया या प्रश्नाविषयी बोलताना 'माणूस' प्रतिनिधीला म्हणाले, " मुस्लिमांसमोर बोलताना मी नेहमी त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करीत असतो-गेल्या अठरा वर्षांत भारतातील जातीय दंगे कितीतरी प्रमाणात कमी झाले आहेत. जे झाले ते मागच्या दंग्यांच्या मानाने फारच थोडे आणि अशा दंग्यांचा सर्व समाजांतील सर्व विचारप्रवाहांच्या लोकांनी कडाडून निषेधच केला आहे. "

थोडे थांबून डॉ. झकारिया पुढे म्हणाले, "आणि मला असे वाटते की, हिंदू-मुस्लिम दंग्यांचा स्वतंत्रपणे वेगळा विचार करणे हिताचे नाही. आपल्याकडे विद्यार्थ्यांचे दंगे, भाषिक दंगे होतातच ना? इतर अनेक तऱ्हेचे दंगे होतातच. त्याच संदर्भात या जातीय दंग्यांचा विचार झाला पाहिजे. समाजविघातक कृत्ये म्हणून या साऱ्याच दंगलींचा एकत्र विचार झाला पाहिजे आणि असे जातीय दंगे फक्त आजच आणि भारतातच होतात असे नाही. पूर्वी उत्तर प्रदेशात मुसलमानांतच शिया आणि सुन्नी पंथीयांमध्ये दंगे झालेच ना ? पाकिस्तानातही सुन्नी आणि कादीयानी या पंथांत दंगे झालेतच. तेव्हा हा समाजविघातक गंभीर प्रश्न म्हणून दंगे थांबविले पाहिजेत –"

वरवर पाहता धर्मातीतता हे जरी नवीन मूल्य वाटत असले तरी त्याचे मूळ भारताच्या इतिहासात आहे, असे डॉ. झकारिया यांना वाटते. ते म्हणतात, "पुरातन ऋषींनी शिकविलेला विशाल मानवतावाद, भगवान गौतम बुद्धाचे जीवितकार्य, सम्राट अशोकाचा मानवतावाद, आणि शिवाय आचार्य शंकर, रामानुज, कबीर, नानक, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादींची शिकवणूक यांवरून या देशातील इतिहासाचा मुख्य प्रवाह कोणत्या दिशेने वाहत होता हे स्पष्ट दिसते. या प्रवाहात कधी वळणे, कधी अडथळे आले असतील. जातीय पूर्वग्रहामुळे अडचणी आल्या असतील. परंतु एकूणच इतिहासाचा विचार करता अशा अडचणी आणि अशी वळणे केवळ प्रासंगिक होती असेच दिसते. आणि प्रारंभापासून विशाल मानवतावाद आणि उदारमतवाद यांचाच प्रभाव भारतीय लोकांच्या विचारांवर पडलेला दिसून येतो. हा आपला राष्ट्रीय वारसा आहे."

डॉ. झकारिया पुढे म्हणतात, "त्यामुळेच आधुनिक काळात जेव्हा गांधींनी आपला मानवतावादाचा आवाज उठविला तेव्हा त्यांची चटकन जनमानसाशी तार जुळली. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाचे रहस्यही यातच दडले आहे; उदारमतवाद आणि मानवतावाद. या दोघाही नेत्यांच्या नेतृत्वाशी धार्मिक बाबींचा काहीही संबंध नाही असे मला वाटते. गांधी हे स्वतः सनातनी हिंदू होते. पण त्यांची उदारमतवादी दृष्टीच जनमताची पकड घेत होती. नेहरू जरी नास्तिक होते तरीही जनतेचे त्यांच्यावर प्रेम होते याचेही कारण हेच."

## शास्त्रीजींचे नेतृत्व

स्वर्गीय शास्त्रींनी हाच वारसा पुढे चालविला, असे डॉ. झकारिया मानतात. दोन्ही जमातींमध्ये अतिशय चांगले वातावरण यशस्वीपणे निर्माण करण्याचा प्रयत्न शास्त्रीजींच्या नेतृत्वाने केला आणि आधुनिक भारताच्या धर्मातीततेत त्यांचा फार मोठा वाटा आहे असे त्यांना वाटते. "पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळी कै. शास्त्रींनी भारतीय मुस्लिमांवर जो विश्वास दाखवला त्यामुळे एक वेगळेच वातावरण निर्माण झाले. अब्दुल हमीदसारख्या जवानांनी शास्त्रीजींनी दाखविलेल्या या विश्वासाचे

सोने केले आणि आधुनिक भारताच्या धर्मातीततेचा पाया पक्का केला असे मला मनापासून वाटते. "

डॉ. झकारिया यांना कै. शास्त्रीजींच्या स्मृतीसाठी काहीतरी करावे अशी खूप तळमळ आहे. शास्त्रीजींचे एक भव्य स्मारक औरंगाबाद शहरात उभारावे या दृष्टीने त्यांची खटपट चालू आहे.

तेराव्या शतकात दिल्लीच्या गादीवर राज्य करणारी सुलतान राणी रझिया हिच्याविषयी मध्यंतरी डॉ. झकारिया यांच्या वाचनात थोडेसे लिखाण आले होते. त्यांना वाटले की ही राणी काहीतरी वेगळीच आहे. त्यांची उत्सुकता जागृत झाली. आणि सतत सात वर्षे परिश्रमपूर्वक अभ्यास करून 'रझिया, क्वीन ऑफ इंडिया' हा ऐतिहासिक परंतु कादंबरीसारखा ग्रंथ लिहून त्यांनी प्रसिद्ध केला. ग्रंथाचे डॉ. झकारिया यांच्या अपेक्षेबाहेर स्वागत झाले.

डॉ. झकारिया यांची रझिया अतिशय उदारमतवादी आणि कुशल शासनकर्ती आहे. राणी रझिया आपल्या एका सरदाराला म्हणते, " तुझे म्हणणे चुकीचे आहे, वल्बन. खरी चूक त्यांची (हिंदूंची) नसून आपलीच आहे. आपली त्यांच्याविषयीची वृतीच सहानुभूतीची नाही, आपण त्यांच्यांत मिसळत नाही, त्यांच्या सुखदु:खांशी समरस होत नाही. आपला वंश त्यांच्यापेक्षा वेगळा आहे आणि त्यांच्यापासून दूर राहण्यात आपण अभिमानच मानतो. आपण राज्यकर्ते आहोत आणि ते जित आहेत. पण म्हणून आपण त्यांच्या मनात भय का म्हणून उत्पन्न करावे ? आपण त्यांच्यांत जवळीक का निर्माण करू शकत नाही ?"

या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावतेत भारताचे माजी सरन्यायाधीश डॉ. प्र. वा. गजेंद्रगडकर म्हणतात, " आज संदर्भ वेगळा असला आणि दोन्ही समाजांची स्थिती बरीच वदलली असली तरी रझियाच्या या उद्‌गारांना आजही चांगलेच महत्त्व आहे. भारतातील वेगवेगळ्या जातीजमातींतील दूरत्व संपूर्णपणे नष्ट झाल्याशिवाय राष्ट्रीय व भावनिक ऐक्य साधता येणार नाही. भारतातील मुसलमानांनी राष्ट्रीय जीवनाशी संपूर्णपणे समरस झाले पाहिजे आणि हिंदू व इतर समाजांनी आपणहून मुसलमानांशी मिळूनमिसळून वागण्याचा, त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचा, त्यांच्या भावना समजावून घेण्याचा, त्यांच्या आशाआकांक्षा, दु:खे आणि आनंद यांच्याशी समरस होण्याचा प्रयत्न केला तरच मुसलमानही राष्ट्रीय जीवनाशी समरस होऊ शकतील --"

रझियाची सुखदु:खे चितारण्यासाठी लागणारे कविमन डॉ. झकारियांजवळ आहे. त्याचबरोबर ऐतिहासिक सत्ये कठोरपणे तपासून पाहण्याची तयारीही त्यांच्यात आहे. 'एशिया थ्रू द एजेस' या एका नव्या ऐतिहासिक पुस्तकाच्या तयारीत ते आहेत.

●

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे
४१९, नारायण पेठ, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**